म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा
दा. क्र. १०३४

BVBK-0401034

# जाईची नवलकहाणी

ॲलीस इन वण्डरलॅन्ड ह्या
जगप्रसिद्ध कथेचा अनुवाद

भा. रा. भागवत

मूल्य सात रुपये
विषय किशोर

BVBK-0401034

नितीन प्रक

प्रकाशिका :
सौ. सुधा वसंत गोगटे
नितीन प्रकाशन
११८२ सदाशिव पेठ,
पुणे - ३०

© लेखकाकडे

दुसरी आवृत्ती
दीपावली १९७४

मुद्रक :
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनवार पेठ,
पुणे - ३०



ही नवलाची जाई

चिनूला—

# १

जाई अगदी कंटाळली होती. नदीवर नुसतेच किती वेळ बसून राहायचे? तिची ताई केव्हाची एक पुस्तक वाचण्यात दंग झाली होती. जाईने त्यात डोकावून पाहाण्याचा एकदोनदा प्रयत्न केला, पण फुस्! त्यात चित्रेही नव्हती आणि संवादही नव्हते. ज्यात चित्रेही नाहीत आणि संवादही नाहीत, ते कसले पुस्तक!

त्यामुळे जाई आता असा विचार करीत होती, (म्हणजे करवेल तेवढा करीत होती. तसेच म्हणाल, तर त्या दिवशी उकाडा इतका भयंकर होता, की तिला सारखी सुस्ती येत होती आणि डोके तर इतके सुन्न झाले होते, की ते जागेवर आहे की नाही याचीच तिला शंका येत होती) की झेंडूची फुले जमवून त्यांची माळ करू या का? पण त्यासाठी जागचे उठून हिंडायला हवे, फुले तोडायला हवीत. एवढा सगळा त्रास त्या माळेसाठी करावा का?

जाईच्या मनात हे विचार येत आहेत, तोच तिच्या जवळून सप्दिशी काही तरी निघून गेले. पाहाते तो गुलाबी डोळे असलेला पांढरा ससा!

अर्थात् त्यात नवल वाटण्यासारखे काही नव्हते. आणि तो ससा जेव्हा

स्वताशी म्हणाला, “च्...च्! आता मला चांगलाच उशीर होणार!” तेव्हा ते ऐकूनही जाईला **फारसे** विचित्र वाटले नाही. (मागाहून हे सगळे तिला आठवले, तेव्हा मात्र तिला असे वाटले, की आपल्याला याचे नवल



वाटायला हवे होते. पण त्या दिवशी मात्र तिला ते सगळे सहज घडल्या सारखे वाटले) पण सशाने जेव्हा आपल्या जाकिटाच्या खिशातून चक्क

घड्याळ काढले आणि त्यात 'टाइम' पाहून तो झपाट्याने पुढे निघाला, तेव्हा मात्र जाई ताडकन् उठली. कारण तिच्या मनात एकदम असे चमकले, की जाकीट घातलेला ससा आपण कधी पाहिलेला नाही; आणि जाकिटातून घड्याळ काढणारा तर नाहीच नाही! तेव्हा 'हे आहे तरी काय प्रकरण' अशी तिला इतकी चुटपूट लागली, की जाई धावतच सशामागे गेली. शेतातून खूप धावल्यावर शेवटी एका मोठ्या थोरल्या बिळात ससा गडप झालेला जाईला ओझरता दिसला.

जाई थांबली नाही. सशाच्या मागोमाग तीही बिळात शिरली. परत बाहेर कसे निघायचे, याचा विचारसुद्धा तिने केला नाही.

सशाचे बीळ पहिल्याने सरळ आडवे गेले होते. जसा काही एखादा बोगदाच. पण मग एकदम एक वळण आले, आणि जाई अशी सपाट्याने घसरली, की ब्रस्स!

बोगद्याची एकदम विहीर बनली होती आणि त्या खोल खोल विहिरीत जाई खाली खाली पडत होती. हे सगळे इतक्या सुर्रकन् घडले, की तिला थांबावेसे वाटले असते तरी थांबता आले नसते.

विहीर चांगली खोल असावी; किंवा जाई फार हळूहळू पडत असावी! कारण खाली पडताना आजूबाजूला बघायला तिला भरपूर सवड मिळाली. आता पुढे होणार आहे तरी काय म्हणून नवल करीत जाईने सगळीकडे बघितले.

पहिल्याने तिने खाली खोलपर्यंत पाहिले....आपण कुठे चाललो आहो ते कळावे म्हणून. पण खाली इतका अंधार होता, की काही दिसेचना. मग तिने भोवतालच्या भिंतींकडे पाहिले. तेव्हा तिला असे दिसले, की भिंतींत फडताळे आहेत; फळ्या पण ठोकलेल्या आहेत. मधून मधून खुंट्याही दिसताहेत; आणि त्या खुंट्यांना टांगलेली चित्रे नि नकाशे. एका फळीवर मुरांब्याची बरणी होती, ती तिने खाली जाता जाता उचलली. बरणीवर लेबल लावलेले होते:—संत्र्याचा मुरांबा. पण बरणीत काहीच नव्हते. तेव्हा तिची निराशा झाली. तरी तिला बरणी खाली टाकवेना. कारण, समजा, खाली कुणी असले आणि त्याच्या डोक्यात ती पडली तर?....तेव्हा खाली जाता जाता एक फडताळ दिसले, त्यातच तिने ती कशीबशी ठेवली. "हुश्श्!"

जाई स्वताशीच म्हणाली. “ याला पडणं म्हणायचं, की काय म्हणायचं? आता जिन्यातून पडायला मला काहीच वाटायचं नाही. आणि घरी गेल्यावर मला सगळी जणं किती शूर म्हणतील! पण मी!—हुंः! त्यात विशेष काही आहे, असं मला वाटायचंच नाही. अगदी घराच्या छपरावरून पडले ना, तरी चुपचाप ताठ पडून राहीन मी.” (हे मात्र किती खरं आहे!)

खाली—खाली—खाली....“ हे आहे तरी काय? हे आमचं खाली पडणं संपणार तरी कधी?” जाई स्वताशी पण मोठ्याने म्हणाली. “ किती मैल पडले असेन मी? पृथ्वीच्या मध्याकडे तर चालले नसेन? म्हणजे किती खोल बरं?...हो, चार हजार मैल, नाही का? (पाहिलंत? जाईला माहिती किती होती! शाळेत किती तरी विषयांचा तिने अभ्यास केला होता. अर्थात आपल्या ज्ञानाचा पाढा वाचायची ही वेळ नव्हती म्हणा. कारण ऐकायला होतं कोण तिथे? तरी पण मधून मधून पाढा वाचणं बरं असतं. नाही का? तेवढीच उजळणी होते)—बरोबर, चार हजार मैल. पण कुठच्या अक्षांश—रेखांशावर आले असेन मी?” (खरे म्हणाल तर अक्षांश म्हणजे काय नि रेखांश म्हणजे काय याची जाईला काहीसुद्धा कल्पना नव्हती. शब्द झकास वाटले म्हणून तिने ते वापरले एवढेच.)

थोड्या वेळाने पुन्हा तिची टकळी सुरू झाली, “ कुठपर्यंत पडणार आहे मी? पृथ्वीतून आरपार तर जायची नाही? थेट खाली जाऊन पलीकडच्या बाजूला बाहेर तर निघायची नाही? अय्या! म्हणजे तिकडची माणसं खाली डोकं वर पाय करून चालत असतील. आणि मी आपली त्यांच्यांत...पण तसं झालं तर आधी त्यांच्या देशाचं नाव विचारीन मी. कसं बरं विचारू? हो!—बाईसाहेब, कोणता हो देश हा? दक्षिण अमेरिका की वेस्ट इण्डीज्? (आणि हे बोलताना ती इतक्या अदबीने खाली वाकली आणि असे काही तिने हात जोडले म्हणता...तुम्हीच कल्पना करा. विहिरीतून खाली पडताना अदबीने खाली वाकायचं आणि शिवाय नमस्कार ठोकायचा! तुम्हाला जमेल ते?) बाई बाई! मला अगदीच अडाणी पोर समजतील ते. छट्! देशाचं नावबीव विचारणं बरोबर नाही. त्यापेक्षा इकडे तिकडे नीट पाहीन. कुठे तरी लिहिलेलं दिसेलच नाव.”

खाली—खाली—खाली....दुसरे काहीच करायला नव्हते, तेव्हा जाईची

पुन्हा बडबड सुरू झाली, "आज रात्री ठिकरीला चैन पडायचं नाही हो! (ठिकरी हे तिच्या मांजरीचे नाव) सगळी चहा पितील, तेव्हा ठिकरीच्या दुधाची आठवण होईल ना त्यांना? ठिकरे, ठिकरे! तू जर माझ्याबरोबर इकडे आली असतीस, तर काय मजा झाली असती? इथे उंदीर नाहीत. अधांत्री का उंदीर असतात? पण एखादं वटवाघूळ पकडता येईल तुला. आणि वटवाघूळ म्हणजे जवळ जवळ उंदीरच! पण मांजरं वाघळांना खातात का? काय की बाई!...." आणि हे बोलता बोलता जाई इतकी पेंगायला लागली, की तिच्या तोंडातून काही तरीच उलटे पालटे निघू लागले. 'मांजरं वाघळांना खातात का? मांजरं वाघळांना खातात का?' असे बोलायचे तर मधून मधून ती आपली 'वाघळं मांजरांना खातात का?' असेच बोलायला लागली, आणि नाही तरी त्यांतल्या कुठच्याच प्रश्नाचे उत्तर तिला देता येत नव्हते; तेव्हा असे बोलले काय नि तसे बोलले काय, सारखेच होते. जाईला सुस्त सुस्त वाटायला लागले. तिला वाटले, आपण स्वप्नात आहो; ठिकरीचा हात धरून चाललो आहो (पण ठिकरीचा हात म्हणजे पायच तो!) आणि तिला विचारतो आहो, "ठिकरे, मला अगदी खरं सांग पाहू– तू कधी वाघूळ खाल्लं होतंस?"

पण तिला असे वाटायला आणि धप्प आवाज होऊन ती खाली पडायला एकच गाठ पडली.

जाईने पाहिले, तो आपण कडब्याच्या नि गवताच्या ढिगावर पडलो आहो. आपल्याला लागलेले मुळीच नाही. लगेच ताडकन् उडी मारून जाई उठली. तिने वर पाहिले, तर अंधार गुडूप. समोर पाहिले, तर आणखी एक लांबच लांब बोळ आणि त्या बोळातून पांढरा ससा अजून चाललाच आहे झपाझप, झपाझप.

जाईला वाटले, चला! एक क्षणही फुकट घालवायचा नाही. निघालीच ती वाऱ्याच्या वेगाने. हा हा म्हणता तिने सशाला गाठले. तो एक वळण घ्यायच्या बेतात होता आणि स्वताशीच म्हणत होता, "च्यॅ:! शिंचा आणखी आणखीच उशीर होतोय!" जाई अगदी त्याच्या पाठीशी होती. तिनेही झटादिशी वळण घेतले. पण मग पाहाते, तो ससा पसार झालेला.

आपण पोचलो तरी कुठे येऊन, ते जाई बघायला लागली. तेव्हा तिला

दिसले, की आपण एका लांबच लांब नि ठेंगण्या अशा दालनात आलो आहो. दालनाच्या छतापासून दिव्यांची रांगच रांग लोंबते आहे आणि त्याचा चकचकीत प्रकाश सगळीकडे पसरला आहे.



दालनाला सगळ्या बाजूंनी दरवाजे होते, पण ते बंद होते. त्यांपैकी एका बाजूने जाई थेटपर्यंत गेली आणि मग दुसऱ्या बाजूने परत पहिल्या जागी आली. वाटेतले प्रत्येक दार तिने ढकलून पाहिले, पण एकही उघडेना. तेव्हा निराश होऊन जाई दालनाच्या मध्यभागी आली. आता इथून निसटा-



जाईची

यचे तरी कसे, हेच तिला समजेना.

एकाएकी तिला एक लहानसे तीन पायांचे मेज दिसले. ते सबंध पक्क्या काचेचे केलेले होते. आणि मेजावर काय होते म्हणाल, तर फक्त एक सोनेरी किल्ली.

लगेच जाईला वाटले, की इथल्या कुठल्या तरी दाराची ही किल्ली असावी. पण छे! तिने किल्ली चालवून पाहिली तर कुठच्याच कुलपाला ती लागेना. कुलपे मोठी होती म्हणा, किंवा किल्लीच लहान होती म्हणा. पण कोणतेच कुलूप तिने उघडेना. जाईने आणखी एक फेरी मारली. तेव्हा तिला थोडा-साच उंच असा एक पडदा दिसला. मघाशी तिला तो दिसला नव्हता. त्या पडद्यामागे एक छोटेसे दार होते. छोटे म्हणजे केवढे? पंधरा इंच उंचीचे. जाईने जेव्हा त्या दाराच्या कुलपात किल्ली घालून पाहिली, तेव्हा ती बरोबर लागली आणि दरवाजा उघडला. जाईला कोण आनंद झाला!

जाईने दार ढकलले. आत पाहाते तो आणखी एक लहानसा बोळ— लहानसा म्हणजे उंदराच्या बिळाइतका चिंचोळा. जाईने गुडघे टेकले आणि बोळातून दूरपर्यंत पाहिले—दुर्बिणीतून पाहावे तसे. तिला काय दिसले? बोळाच्या पार पलीकडे एक सुंदर बगीचा होता. या कोंडलेल्या जागेतून निघावे आणि त्या बागेतल्या छानदार ताटव्यांमधून अन् कारंज्यांजवळून हिंडावे, अशी जाईला हुरहूर लागली. पण कसे जाणार तिकडे? जाईचे डोके देखील त्या एवढ्याशा दरवाज्यातून शिरेना. "आणि नुसतं डोकं शिरून काय उपयोग?" जाई म्हणाली. "डोक्यामागून खांदेही यायला हवेत. अरे अरे! मला जर एखाद्या दुर्बिणीसारखं मिटता उघडता येत असतं, तर काय मजा झाली असती! कदाचित्....कदाचित् जमेलसुद्धा मला. सुरवात कशी करायची, तेवढं एकदा कळलं पाहिजे."

आतापर्यंत इतक्या विचित्र गोष्टी घडल्या होत्या की जाईला आता असे वाटू लागले होते—अशक्य असे काही नाहीच.

त्या छोट्या दारापाशी नुसते उभे राहून काही मिळणार नव्हते. जाई पुन्हा त्या मेजापाशी गेली. मेजावर आणखी एखादी किल्ली सापडेल या आशेने म्हणा, किंवा 'दुर्बिणीसारखे अंग आत कसे ओढावे' याविषयी एखादे नियमांचे पुस्तक तिथे असेल असे वाटून म्हणा. या वेळेला मेजावर

एक लहानशी बाटली दिसली. ("मघाशी तर ही इथे नव्हती!" जाई पुटपुटली) आणि त्या बाटलीवर कागदाचे एक लेबल चिकटवलेले होते. टेबलावर सुंदर मोठ्या अक्षरांत छापलेले होते–'मला प्या.'

हुं: ! 'मला प्या' म्हणायला यांचे काय जाते? पण जाई काही बोल्याने दूध पिणारी नव्हती. ती म्हणाली, "अगोदर पाहाते, त्याच्यावर विष म्हणून छाप मारलेला नाही ना?" कारण साधे नियम पाळले नाहीत, की कसे भयंकर अनर्थ कोसळतात, ते जाईला वर्तमानपत्रांत वाचून माहीत होते. कुणाचे अंगच भाजले, तर कुणाला रानटी पशूंनी खाल्ले, एक ना दोन, किती तरी गोष्टी! आपले मित्र आपल्याला सांगतात ते ऐकले नाही, की असे होते. साध्याच गोष्टी–जसे : विस्तवात लालभडक तापवलेली सळई हातात फार वेळ धरायची नाही; हात भाजतो. चाकूवरून बोट फार कापेस्तो फिरवायचे नाही; रक्त येते. तसेच बाटलीवर 'विष' म्हणून छाप मारलेला असला आणि तरी त्यातले औषध जर तुम्ही फार प्यालात, तर केव्हा ना केव्हा तुमचे बरेवाईट व्हायची भीती असते.

पण एवढे बरे, की बाटलीवर 'विष' म्हणून छाप नव्हता. तेव्हा धीर करून जाईने बाटलीतला पदार्थ थोडा चाटून पाहिला. आणि तो तिला फारच चांगला लागला. (त्याची चव म्हणाल तर मिश्र होती. मुरांबा, अननस, नासलेले दूध, चॉकलेट अन् भाजलेला पाव या सगळ्यांचा स्वाद त्याला होता.) तेव्हा तिने ते मिश्रण फस्त केले.

"मला काही विचित्रच वाटतंय!" जाई म्हणाली. "दुर्बिणीसारखी मी मिटतेय की काय?"

आणि खरोखरच ती मिटत चालली होती. म्हणजे लहान लहान होत, आता तिची उंची फक्त दहा इंच झाली होती!

जाईची कळी एकदम खुलली. कारण तिच्या लक्षात आले, की त्या छोट्या दारातून सुंदर बगिच्यात आपण आता सहज जाऊ शकू. तरी पण तिने जरा वाट पाहिली. हो! कारण याहीपेक्षा जर आपण लहान झालो, तर होता होता कदाचित् अजिबात....अजिबात विझूनच जाऊ. मेणबत्ती कशी लहान होत होत विझते, तशी. विझून गेल्यावर आपण कशा बरं दिसू? काही केल्या जाईला याचे उत्तर सुचेना. कारण मेणबत्ती विझल्यावर तिच्या

ज्योतीचे काय होते, हे कुठे जाईला माहीत होते?

थोड्या वेळाने आणखी काहीच घडत नाही, असे जेव्हा कळले, तेव्हा आता बागेची वाट धरायची असे तिने ठरवले. पण कपाळ तिचे ! दारापर्यंत ठीक गेली आणि मग तिला आठवले, की आपण किल्ली मेजावरच विसरलो ! ती पुन्हा मेजाजवळ गेली. पण उपयोग काय? आता ती एवढी पिटुकली झाली होती, की तिचा मेजाला हात पोचणे शक्यच नव्हते. मेज काचेचे होते. त्यामुळे खालून तिला सोन्याची किल्ली स्पष्ट दिसत होती. पण ती काढायची कशी ? मेजाचा पाय धरून वर चढण्याचा तिने प्रयत्न केला; पण तो इतका गुळगुळीत होता, की तिचे हात निसटू लागले. शेवटी बसली बिचारी खाली आणि लागली मुळूमुळू रडायला.

जरा वेळाने आपणच आपल्याला दटावून म्हणते, " हं ! रडून काही व्हायचं नाही, बरं का? आत्ताच्या आत्ता डोळे पूस पाहू ! "

जाई स्वताला उत्तम उपदेश करी. तिला ती खोडच होती. अर्थात ती उपदेशाप्रमाणे वागायची क्वचितच. कधी कधी ती स्वताला इतकी खडसावून बोले, की तिच्या स्वताच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा लागत. एकदा पत्त्यांत स्वताला फसवल्याबद्दल तिने आपल्यालाच एक गुद्दा मारला होता. आपण दोघे आहोत असे समजून स्वताशी खेळायचा जाईला फार नाद होता. " पण आत्ता या क्षणाला आपण दोघं आहो असं समजण्यात अर्थ काय? " जाई म्हणाली, " आधीच मी इतकी कमी झाले आहे, की धड एक माणूस— म्हणजे बऱ्यापैकी माणूस काही भरायची नाही. दोन माणसांच्या गोष्टी हव्यात कशाला ? "

इतक्यात मेजाखाली एक लहानसा काचेचा डबा पडलेला तिला दिसला. तिने तो उचलला आणि उघडला. आत एक लाडवाची गोळी होती आणि लाडवातल्या मनुकांची सुंदर अक्षरे बनवलेली होती— ' मला खा.'

" ठीक आहे. तुला खाते. " जाई म्हणाली. " आणि जर तुला खाऊन मी मोठी झाले, तर माझा किल्लीला हात पोचेल. बरं, जर आहे त्यापेक्षा लहान झाले, तर दार उघडायलाच नको. दाराखालच्या फटीतूनसुद्धा मी आत शिरू शकेन. कुठून का होईना, मला बागेत जाता येईल. आणि मला तरी काय, तेच हवं आहे. बाकी सगळं गेलं खड्ड्यात ! "

तिने थोडासा लाडू चाखून पाहिला आणि डोक्यांवर हात दाबून ती स्वताशीच काळजी करीत बसली— कुठच्या बाजूला, कुठच्या बाजूला.... म्हणजे आपले डोके कुठच्या बाजूला चालले आहे, वर की खाली? आणि जेव्हा, डोके होते तिथेच राहिले आणि ती मोठीही झाली नाही किंवा आणखी ल्हानही झाली नाही, तेव्हा जाईला भयंकर आश्चर्य वाटले. खरे म्हणाल, तर लाडू खाल्ल्यावर नेहमी आपले जे होते, तेच जाईचे झाले होते. म्हणजे काहीच झाले नव्हते. पण एकसारखे जगावेगळे काहीतरी घडायचे अशी जाईला इतकी सवय पडली होती, की आता नेहमीसारखेच काही झाले, हा तिला शुद्ध गाढवपणा, बुद्दूपणा वाटला. . .

तेव्हा तिने तो लाडू आणखी थोडा चावला; पुन्हा चावला, पुन्हा चावला आणि अखेरीस संपवून टाकला.

## २

"अग बया!" जाई ओरडली. "हे जास्त जास्तच वीचित्र होत चाल्लं. (जाई इतकी चकित झाली होती, की कोणते अक्षर ऱ्हस्व उच्चारायचे नि कोणते दीर्घ याचेसुद्धा तिला भान राहिले नव्हते) "दुर्बीण उघडत चाल्ली वाटतं? बघा, मी कशी मोठी मोठी होत चाल्ले ....रामराम, पाय बाबू!" (कारण तिने जेव्हा वाकून आपल्या पायांकडे पाहिले, तेव्हा ते मुळी तिला दिसेचनात. दृष्टीच्या पार टप्प्याबाहेर गेले होते ते.)

"बिचारे पाय माझे! छकुल्यांनो, आता तुम्हांला चोळून धुणार कोण? मेंदी कोण लावणार? मी तरी काही करू शकणार नाही एवढं नक्की. कारण मी इतकी दूर आहे, की माझे हातच पोचणं शक्य नाही. आता तुमची

कामं तुम्हांलाच केली पाहिजेत, बरं का ?— तरी पण...." जाई जरा विचार करीत म्हणाली, " त्यांना बिचाऱ्यांना अगदीच झिडकारून उपयोगाचं नाही. हो, नाही तर मला ज्या बाजूला जायचं असेल, तिकडे हे यायचे नाहीत. दुसरीचकडे नेतील मला.— पाहू बरं ! हं, असंच करावं. प्रत्येक दिवाळीला त्यांना नव्या चपला घेऊन द्याव्या."

आणि मग ही भेट त्यांना कशी पाठवायची, याचा जाई विचार करू लागली. " कुणी तरी पोचवायला हव्यात," ती पुटपुटली. " हं: ! काय मजा आहे ! आपल्याच पायांना आपणच भेट पाठवायची ! कशी पाठवावी ? पत्ता कसा लिहावा ?

श्रीयुत जाईचा उजवा पाय—

छट् ! घोटाळाच झाला....

जाईचा श्रीयुत उजवा पाय,
पायपुसणे,
दरवाज्याचा कोपरा,
घर.

[ जाईकडून सप्रेम भेट. ]....

शी: ! काय वेडबंबूसारखी बोलते आहे मी !"

इतक्यात काय झाले—तिचे डोके दालनाच्या छताला आपटले. म्हणजे ती आता नऊ फुटांपेक्षा जास्त उंच झाली होती. लगेच मेजावरची सोनेरी किल्ली तिने घेतली आणि एक टांग मारून परत दरवाजा गाठला.

दरवाजा उघडलाही तिने. पण रामा शिवा गोविंदा ! आता त्या दरवाज्यातून शिरायचे कसे ? नऊ फुटांची जाई राक्षसीण कशी शिरणार त्यात ? एका कुशीवर पडून तिला दाराला जेमतेम डोळा लावता आला. बागेचा देखावा जेव्हा नुसताच बघायला मिळाला, तेव्हा तिला आणखीच रडू कोसळले.

" लागलीस पुन्हा रडायला ?" ती स्वतावर ओरडली. " तुला लाज वाटत नाही ? एवढी मोठी झालीस—( हो ! हे मात्र किती बरोबर बोलली ती ! ) गप्प बैस. गप्प बैस म्हणते ना ?"

पण तरी तिचे रडे काही थांबेना. ती खूप खूप रडली. खंडीभर रडली.

शेवटी तिच्या भोवती मोठे थोरले तळे साचले. चार इंच खोल तळे—आणि ते तळे पसरत पसरत अर्ध्या दालनापर्यंत गेले.

थोड्या वेळाने तिला कुठे तरी पिटुकले पाय चपचप वाजताहेत, असा भास झाला. तिने चटकन् डोळे पुसून पाहिले, तो पांढरा ससा परत येत होता. आता त्याने मोटे ऐटबाज कपडे घातले होते. त्याच्या एका हातात हातमोजे होते. आणि दुसऱ्या हातात भला मोठा पंखा होता. मोठ्या घाईघाईने तो तरातरा आला. तो स्वताशी पुटपुटत होता, "सरदारीणबाई काय म्हणतील आता? आपल्याला तिष्ठत ठेवलं म्हणून रागावणार तर नाहीत?"

जाई बिचारी इतकी अडली होती, की कुणाचीही मदत मिळेल तर तिला हवी होती. पांढरा ससा जेव्हा जवळ आला तेव्हा तिने बारीक आवाजात भीत भीत विचारले, "हे बघा, साहेब—"

ससा एकदम दचकला. त्याच्या हातातला पंखा नि मोजे खाली पडले आणि मग त्याने अंधारात कुठे सूंबाल्या केला, ते कळलेही नाही.

जाईने पंखा उचलला, हातमोजे उचलले आणि मग दालनात उकाडा फार होता म्हणून ती पंख्याने वारा घेऊ लागली. वारा घेता घेता ती स्वताशी बोलत होतीच.

"काय तरी बाई? आज सगळंच विचित्र घडतंय्! आणि कालपर्यंत सगळं सुरळीत होतं. रात्रीच्या रात्री बदलून मी जादूची झाले की काय तरी?—पाहू वरं....आज सकाळी उठले, तेव्हा मी कशी होते? नेहमी-सारखी? नाही. जरा निराळं वाटत होतं खरं, पण मी जर पूर्वीची जाई नाही, तर मग आहे कोण? मोठं कोडं आहे, ते हेच!"

आणि मग जाईला वाटले, आपण आता जाई नसून आपली एखादी मैत्रीण तर बनलो नाही? आपल्या सगळ्या मित्रांची नि मैत्रिणींची नावे ती आठवू लागली.

"मी कमू तर नक्कीच नाही. कारण कमूच्या केसांच्या लांबच लांब वळ्या पडतात. माझे केस सरळ आहेत. मी किशी पण नाही. कारण मला किती तरी गोष्टी येतात, अन् किशीला अजीबात काही येत नाही. शिवाय ती ती आहे अन् मी मी आहे. आणि....छे ग बाई! काय सगळा घोटाळा आहे हा!— असं करून पाहाते हं. पाच चोक बारा आणि सहा चोक तेरा आणि



जाईची

सात चोक– इश्श ! असेच जर मी पाढे म्हटले, तर विसापर्यंतसुद्धा पोचायची नाही. म्हणजे एकंदरीत अंकगणिताचा काही उपयोग नाही. आता भूगोलाची परीक्षा पाहू. दिल्लीची राजधानी रंगून अन् रंगूनची राजधानी कोलंबो— छे छे ! हे तर सगळंच चुकलं ! आता मात्र नक्की वाटतं, की माझी किशी झाली. पाहू बरं—एक कविताच म्हणून बघते—

रानडुक्करा, रोज सकाळी येशी गावामधे
घाण खाउनी तोंड मळविशी, लोळशि—

" इश्श ! मला नक्की वाटतं, की ही कविता अशी नाही. मी काही तरी चुकीचीच म्हटली....बरोबर ! रानडुक्कर कधी गावात येऊन घाण थोडीच खातो ? गावडुक्कर म्हणायला हवं. बरं, पण पुढे काय ?—

शरीर निळसर, शोभे झालर चिखलाची त्यावरी
पिचके डोळे लुकलुक करिती—

शी ग बाई ! हे काहीच्या बाहीच भरकटत चालले मी ! डुकराची कविता नव्हतीच की काय ती ? मग कुणाची होती ?– मगरीची ? सुसरबाईची ?

सुसरबाई– सुसरबाई ! तुझीच पाठ मऊ
गंगामाई रोज सकाळी तुला घालते न्हाऊ....

पण शीः ! असं देखील नाहीच." बिचाऱ्या जाईचे डोळे पुन्हा पाण्याने भरत चालले. " अं....अं....म्हणजे मी खरोखरच किशी झाले, असं दिसतंय्. आता मला तिच्या घरात राहायला हवं. मला तर बाई ते घर मुळीच आवडत नाही. आणि आता खेळणं बिळणं खलास ! सारखं बेकंबे नि घोक्या ! ते काही नाही. मी जर खरीच किशी झाले असेन, तर मी आपली इथेच राहाणार ! सगळीजणं मारे बोलावतील मला, ' येतेस की नाही, जाई ? ' मी साफ जाणार नाही. मी नुसतं त्यांच्याकडे पाहीन अन् म्हणेन, ' मला पहिल्याने हे सांगा, मी कोण आहे ? मी जे कोण आहे, ते माणूस जर मला आवडत असेल तर मी येईन. नाही तर इथ्थे अश्शी बसून राहीन. परत मला आवडणारं कुणी तरी होईन, तेव्हाच हालेन इथून !....पण.... अयाई ग ! हे सगळं व्याख्यान ठीक आहे ! पण मला कुठे हवं आहे इथे राहायला ? कुणी तरी बोलतील, तर बरंच होईल. एकटं राहायचा कंटाळा आला अगदी."

हे बोलता बोलता जाईने आपल्या हातांकडे पाहिले, तो एका हातात सशाचा हातमोजा चढवलेला. "हे केव्हा केलं मी?" ती आपल्याशीच म्हणाली. "अन् कसं केलं? म्हणजे मी लहान होत चालले म्हणायची!"

ती उठली आणि मेजाजवळ गेली. आपल्या उंचीचा अंदाज तिने घेतला. तेव्हा तिला कळले, की आपली उंची जवळ जवळ दोन फूट आहे आणि ती सपाट्याने कमी कमी होते आहे. मग तिच्या लक्षात आले, की या प्रकाराचे कारण म्हणजे तो पंखा. लगेच तिने हात झटकून पंखा टाकला. त्यामुळे बरे झाले! नाही तर ती अजिबातच पाताळात बुडाली असती.

"बरं झालं बाई! थोडक्यात वाचले!" जाई म्हणाली. एकदम हा जो बदल झाला, त्यामुळे पहिल्यांदा जाई घाबरली होती. पण आपण अजून **आहोत** एवढ्यानेच तिला समाधान वाटले.

"चला, आता बागेत जाऊ या." असे म्हणून ती त्या छोट्या दाराकडे धावत गेली. पण तिथे पाहाते, तो दार पुन्हा बंद झालेले आणि सोनेरी किल्ली परत काचेच्या मेजावर.

"हे तर पूर्वीपेक्षाही वाईट झालं." बिचारी जाई रडकुंडीला येऊन म्हणाली. "कारण इतकी लहान मी कधीच नव्हते. आणि व्हायला नकोही होतं मला....शीः!"

ती असे म्हणते आहे, तो तिचा पाय घसरला आणि दुसऱ्याच क्षणी.... फश्श! ती खाऱ्या पाण्यात पडली!

पहिल्याने तिला वाटले, की आपण समुद्रातच पडलो. "आणि तसं असेल—" ती आपल्याशी म्हणाली, "तर मी आगगाडीने परत जाईन." (जाई एकदाच मुंबईला गेली होती आणि तिथे तिने चौपाटीचा समुद्र पाहिला होता. तेव्हापासून तिची अशी कल्पना झाली होती, की कुठचाही समुद्र म्हटला, की त्याला चिक्कार वाळूचा किनारा असतो. त्या वाळूत विहिरी खणणारी नि किल्ले करणारी मुले असतात. काही लोक भेळ खात असतात. काही मुले पतंग उडवत असतात. आणि तिथून जवळच आगगाडीचे स्टेशन दिसते.) पण लवकरच तिच्या ध्यानात आले, की हा समुद्र नाही. आपण नऊ फूट उंच होतो, तेव्हा जी आसवे गाळली, त्यांचे हे पाणी आहे.

"मी इतकी रडले नसते, तर बरं झालं असतं." त्या तळ्यातून पोहत पोहत

वाट काढताना जाई म्हणाली, " त्याबद्दल मला आता चांगलीच शिक्षा होणार म्हणायची. कसली? तर आपल्याच आसवांच्या तळ्यात बुडायची शिक्षा!



शी: ! म्हणजे किती चमत्कारिक हे! पण आज सगळ्याच गोष्टी चमत्कारिक होताहेत."

इतक्यात जवळच दुसरे काही तरी फश्श् फश्श् करते आहे, असे तिला वाटले. लगेच ती पोहत पोहत तिकडे गेली आणि तिने पाहिले. आधी तिला वाटले, की हा एखादा वॉलरस किंवा पाणघोडा असावा. पण एकदम तिला आठवण झाली, की आपण आता अगदी लहान चिटुकली झालो आहो. म्हणजे हा काही पाणघोडा नाही. वॉलरसही नाही. हा जरी मोठा वाटतो, तरी आहे साधा पिटुकला उंदीर! आपल्यासारखा तोही पाय घसरून पाण्यात पडला असावा.

जाई म्हणाली, " आता या उंदराशी बोलावं का? काही फायदा होईल का बोलून? आज सगळंच जिथे जगावेगळं घडतं आहे, तिथे हा उंदीरही बोलणारा प्राणी कशावरून नसेल? पाहू तर खरं......"

लगेच तिने उंदराला विचारले, "उंदीरमामा, या तळ्यातून बाहेर पडायची वाट माहीत आहे का तुम्हांला? मला तर इथे पोहत राहण्याचा



कंटाळा आलाय् अगदी!" (जाईला वाटले, उंदराशी बोलायचे म्हणजे असेच, नाही का? जाई पूर्वी कधीच उंदराशी बोललेली नव्हती. पण तिने आपल्या दादाला संस्कृत वाचताना ऐकले होते. तो म्हणायचा—की मूषक म्हणजे उंदीर. तो मनुष्यासारखा चालतो. जसे—मूषकं म्हणजे उंदराला, मूषकेन म्हणजे उंदराने, हे मूषक म्हणजे अरे उंदरा! वगैरे वगैरे.)

जाईने हाक मारली, तशी उंदराने जरा चौकस दृष्टीने तिच्याकडे पाहिले. आणि एक डोळा मिचकावला. पण तो काही बोलला नाही.

"कदाचित् त्याला मराठी समजत नसेल." जाईला वाटले. "कदाचित् तो मारवाडातून आलेला असेल. हिंदी बोलू का याच्याशी?" (मारवाडी लोक हिंदी बोलतात, अशी जाईची समजूत.) जाई नुकतीच हिंदीचा पहिला धडा शिकली होती. तिला माहीत होते, की बिल्ली म्हणजे मांजर. तिने विचारले, "हमारा बिल्ली कैसा आहे?" पण छे! चुकलेच की! बिल्ली

म्हटल्यावर ‘हमारी’ म्हटलं पाहिजे. बोका असता तर ‘हमारा बिल्ला’ म्हटलं असतं. ती पुन्हा म्हणाली, “हमारी बिल्ली....”

पण तिचे वाक्य पुरे होण्याच्या आतच उंदराने जी म्हणता उडी मारली, ती थेट पाण्याच्या बाहेर! तो घाबरून थरथर कापत होता. जाईला बिचाऱ्याची दया आली. ती लगबगीने म्हणाली, “माफ करो. माफ करो. हमको भूल गया कि तुमको बिल्ली नही आवडती!”

“बिल्ली आवडत नाही?” उंदीर मराठीत किंचाळला. “तू जर माझ्या जागी असतीस, तर तुला आवडली असती का बिल्ली?”

“नाही, नाही!” जाई गयावया करीत म्हणाली, “इतकं रागावू नकोस काही. तुझं म्हणणं खरं आहे. तरीपण तुला एकदा आमची ठिकरी दाखवली असती रे! बिचारी इतकी गरीब अन् छान मांजरी आहे....” हे ती अर्धवट स्वताशीच बोलत होती आणि एकीकडे आळसटपणे पाण्यावर हात मारत होती. “इतकी चांगली आहे बिचारी. नुसती चुलीजवळ गप्प बसून राहाते. गुर्र गुर्र करते, पंजे चाटते, तोंड स्वच्छ पुसते. आणि इतकी मऊ आहे गोंजारायला— आणि उपयोगी पण इतकी पडते....उंदीर धरते!— अग बाई, जळ्ळं मेलं माझं तोंड! काय बोलून गेले परत...”

खरोखर जाईने पुन्हा तीच घोडचूक केली. घोडचूक नाही— उंदीर— चूक! त्यामुळे उंदीर इतका कापायला लागला, की त्याचा तो थरथराट पाहून जाईला फारच वाईट वाटले. ती म्हणाली, “बरं बरं! आता आपण ठिकरीचं नावच टाकू हं....”

“आपण?” उंदीर म्हणाला. अजूनही त्याचे सगळे आंग—अगदी शेपटी-पर्यंत थरथर कापत होते. “हँः! आपण म्हणे! जसा काही माझ्याच पसंतीचा विषय आहे हा. आमच्या घराण्यात कुणालाही मांजरं आवडत नाहीत. कसले ओंगळ, गलिच्छ प्राणी! पुन्हा मांजराचं नाव काढू नकोस.”

“बरं बरं!” जाई गडबडीने विषय बदलीत म्हणाली, “तू...तुला... आपलं...तुम्हांला अं...कुत्रे आवडतात का?”

उंदीर काहीच बोलला नाही. तेव्हा जाईने आपले बोलणे चालू ठेवले, “आमच्या घराजवळ किनई, एक इतका छान कुत्रा आहे म्हणून सांगू— तू कधी आलास, तर दाखवीन तुला. छोटासा, चमकदार डोळ्यांचा कुळुंगी

कुत्रा आहे. असे पिंगट अन् लांब लांब केस आहेत त्याचे...आपण काही फेकलं, की तो चटदिशी उचलून आणतो. दोन पायांवर उभा राहून जेवायला मागतो. गमती गमती करतो. मला त्यांतल्या निम्म्यासुद्धा आठवत नाहीत. त्याचा मालक शेतकरी आहे. तो म्हणतो, 'हा कुत्रा माझ्या इतका उपयोगाचा आहे, की कुणी हजार रुपये दिले तरी आपण तो देणार नाही.' तो म्हणतो, की शेतातले सगळे उंदीर तो मारतो—अयाई! पुन्हा काही तरी घोटाळा झाला..." जाई जीभ चावून म्हणते. "पुन्हा बिचाऱ्याला दुखावलं मी."

या वेळी उंदराने घाबरून पळच काढला होता. तळ्यातून पोहत पोहत तो एखाद्या माशासारखा सपाट्याने दूर निघून गेला. जाताना त्याने तळ्यात असे काही तरंग उठवले, की यंव्—

जाई त्याला हाक मारून म्हणाली, "उंदीरमामा, असा रागावू नकोस. परत ये. पुन्हा मी मांजराचं नाव काढणार नाही. कुत्र्याचं पण नाही. शप्पथ!"

उंदराने ते ऐकले, तो परत फिरला आणि हळूहळू पोहत तिच्याजवळ आला. त्याचा चेहरा अगदी पांढरा फटक पडला होता. ("रागामुळे तर नसेल?" जाई पुटपुटली) तो कापऱ्या आवाजात म्हणाला, "जाऊ दे, जाऊ दे. मला काठावर जाऊ दे. म्हणजे मी तुला माझी सबंध कहाणी सांगतो. मग तुला कळेल, मला मांजरांचा नि कुत्र्यांचाच एवढा राग का ते."

नाही तर आता तळ्याबाहेर पडायला हवेच होते. कारण तळ्यात इतकी गर्दी जमली होती, की बोलायची सोय नाही. कुठून कुठून ते प्राणी येऊन पडले होते, कुणास ठाऊक! पण त्यांत एक बदक होते, एक शहामृग होता, एक काकाकुवा होता, एक गरुडाचे पिल्लू होते आणि दुसरे लहान लहान विचित्र प्राणी किती तरी होते. जाई सर्वांची पुढारी बनली आणि तिच्यामागे पोहत पोहत जाऊन या लटांबराने किनारा गाठला.

## ३

तळ्याच्या पलीकडच्या काठावर जमलेले ते प्राणी म्हणजे एक अपूर्व मेळा होता. त्यांत पिसे विस्कटलेले पक्षी होते, अंगावरची लोकर थबथबलेली जनावरे होती. सगळे भिजून चिंब झालेले, त्रस्त, चिरचिरणारे........

आता पहिला प्रश्न असा होता, की आंग कसे सुकवायचे ? सर्वांची सभा भरली आणि सभेत या प्रश्नावर



चर्चा झाली. थोड्याच वेळात त्यांच्याशी बोलायचे जाईच्या इतके अंगवळणी

पडले, की जशी काही जन्मल्यापासूनही त्यांच्याशी हिची ओळख होती. काकाकुव्याबरोबर तिने खूपच वाद घातला. त्यामुळे तो शेवटी चिडला आणि म्हणाला, " मी तुझ्यापेक्षा मोठा आहे. मला तुझ्यापेक्षा जास्त कळतं. " पण जाई हे मुळीच कबूल करीना. ती म्हणाली, " अगोदर तुझं वय किती आहे, ते तर सांग." पण काकाकुवा ते बिलकुल सांगेना. तेव्हा बोलणेच खुंटले.

आपल्या उंदीरमामांना सर्व मंडळींत बराच मान असावा, असे दिसले. त्यांनी एकदा ओरडून सांगितले, " ऐका, ऐका. सर्वजण खाली बसा आणि मी काय सांगतो आहे, ते ऐका ! तुम्हांला मी तेव्हाच कोरडे करतो. "

लगेच सर्व मंडळी कोंडाळे करून बसली. मध्यभागी उंदीरमामा बसले. बिचारी जाई त्याच्याकडे आशाळभुतासारखी टक लावून पाहात होती. कारण आपण आणखी काही वेळ असे ओलेत्यात बसलो, तर नक्कीच आपल्याला सर्दी होईल, अशी तिला भीती पडली होती.

" हं—खः ! " उंदीर घसा खाकरून रुबाबात म्हणाला, " बसलात नीट सगळे ?....ऐका आता. इतकी रुक्ष कोरडी सभा मी पूर्वी कधी घेतली नव्हती.— कोण बोलतंय् तिथे ? सगळे गुपचूप बसा पाहू.—ऐका—संभाजीला जरी मोंगलांनी ठार मारले असले, तरी तेवढ्यामुळे मराठ्यांचा बीमोड झाला नव्हता. संभाजीचा भाऊ राजाराम याच्या नेतृत्वाखाली दोन मराठे सरदार होते. एक धनाजी जाधव आणि दुसरा संताजी घोरपडे... "

" ह-ह-ह-हः—" काकाकुवा हुडहुडत म्हणाला.

" काय म्हणालात आपण ? " उंदीरमामांनी कपाळावर आठ्या चढवून फार विनयाने विचारले.

" नाही—नाही. काही नाही ! " काकाकुवा घाईघाईने बोलला.

" काही नाही ? मला वाटतं, आपण काही शंका काढलीत. तर मग माझं भाषण मी पुढे चालू करतो. धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे या दोघांनी तलवार गाजवून शत्रूला पाणी पाजलं—"

या ठिकाणी ' पाणी – पाणी ' करीत काही सभासदांनी आपली अंगे झाडली.

" मोंगलांना असे आढळून आले—"

" आढळून आले ? " बदकाने विचारले, " पण काय आढळून आले ? "

"असे आढळून आले..." उंदीरमामा चिडून म्हणाले, "मी मोडीत बोलतोय् का?"

"पण असे म्हणजे काय? मला एखादी गोष्ट आढळून आली, की ती काय वस्तू आहे, हे मी चटकन् सांगू शकतो. कधी एखादा बेडूक आढळतो, तर कधी एखादं गांडूळ आढळतं....तेव्हा मला असं विचारायचं आहे, की त्या मोंगलांना काय आढळून आलं?"

मामांनी या प्रश्नाकडे लक्षच दिले नाही. त्यांनी आपले भाषण पुढे चालू केले, "मोंगलांना आढळून आले, की आपला असा निभाव लागणार नाही. मराठ्यांतलेच काही सरदार फोडले पाहिजेत."

हे बोलताना आपली मूठ उंदीरमामांनी जमिनीवर आपटली. पण मराठे सरदारांप्रमाणे जमीन काही फुटली नाही. तेव्हा मध्येच जाईकडे वळून ते म्हणतात, "काय ताई, तुझी कशी काय आहे प्रगती?"

जाई रडव्या सुरात म्हणाली, "पहिल्याने होती तशीच आहे. तुमच्या या उपचाराने बिलकुल सुकत नाहीत कपडे."

"असं असेल," शहामृग ताठ उभा राहून गंभीर सुरात म्हणाला, "तर आपण सभेचं कामकाज स्थगित करून दुसरे काही तरी द्रुतगतीचे उपचार..."

"मराठीत बोला!" गरुडकुमार ओरडला, "काही तरी कठीण शब्द वापरता, त्यांचा अर्थच मला कळत नाही. तुम्हांला तरी कळतो की नाही कुणास ठाऊक!"

शहामृग या बोलण्याने जरा खजील झाला. पण पुन्हा म्हणतो, "मला असं सुचवायचं होतं, की आपले कपडे सुकवायचा उत्तम उपाय म्हणून आपण निवडणूक-शर्यत खेळावी."

"ही निवडणूक-शर्यत म्हणजे काय भानगड आहे?" जाईने विचारले. म्हणजे ती भानगड समजून घ्यायची तिला मोठीशी इच्छा होती असे नाही. पण शहामृग आपले वाक्य बोलून थांबला होता. कुणी तरी शंका काढावी, असे त्याच्या मनात असावेसे दिसले. तेव्हा दुसरे कोणी बोलेना म्हणून जाई बोलली.

"त्यात काय मोठंसं?" शहामृग म्हणाला, "निवडणूक-शर्यत आपण

प्रत्यक्षच खेळू म्हणजे कळेल." (पाऊस खूप असेल अशा एखाद्या दिवशी तुम्हांलादेखील असली शर्यत खेळायला आवडेल. तेव्हा शहामृगाने ही शर्यत कशी शिकवली, ते वर्णनच करून सांगतो तुम्हांला.)

पहिल्यांदा त्याने एक रंगण आखले. म्हणजे एक वर्तुळ काढले ('त्याचा आकार फारसा महत्त्वाचा नाही,' त्याने बजावून सांगितले.) आणि सर्व मंडळी रंगणात उभी राहिली. इकडे थोडे, तिकडे थोडे, अशी. मग 'एक–दोन–ठो!' वगैरे काहीच प्रकार झाला नाही. ज्याला वाटले त्याने ज्या वाटेल त्या क्षणी धावायला सुरवात केली आणि वाटेल त्या क्षणाला वाटेल तो प्राणी खाडकन् उभा राहिला. त्यामुळे शर्यत सुरू केव्हा झाली आणि संपली केव्हा ते समजणे शक्य नव्हते. पण अर्धा तास याप्रमाणे धावल्यानंतर मंडळी पुरती कोरडी झाली, आणि मग शहामृग ओरडला, "शर्यत खलास!"

तेव्हा सर्वांनी त्याच्या भोवती गराडा घातला आणि धापा टाकीत जो तो विचारू लागला, "जिंकलं कोण?"

या प्रश्नाला शहामृगाने एकदम उत्तर दिले नाही. तो बराच वेळ विचारांत गढून गेला. किती तरी वेळ तो कपाळाला एक बोट टेकून उभा होता. (फोटोतल्या विद्वानासारखा!) इकडे बाकीचे लोक गुपचूप उभे होते. शहामृग म्हणाला, "प्रत्येकजण जिंकला. सगळ्यांना बक्षिसं मिळतील!"

"पण बक्षिसं देणार कोण?" सर्वांनी एका सुरात विचारले.

"म्हणजे काय? (जाईकडे बोट करून) ती देणार. दुसरं कोण?" शहामृग म्हणाला.

लगेच सगळ्यांनी जाईला गराडा घातला आणि 'बक्षीस–बक्षीस!' म्हणून ओरडा सुरू केला.

बिचाऱ्या जाईला समजेना की आता काय करावे? ती बुचकळ्यात पडली; आणि तिने खिशात हात घातला. तसा बचकभर तिळगूळ तिच्या हातात आला (त्यात खारे पाणी शिरले नव्हते एवढे बरे झाले!) आणि सर्वांना वाटले, प्रत्येकाच्या वाट्याला एक एक हलव्याचा दाणा येणारच.

पण उंदीर उठून म्हणतो, "तिलाही एक दाणा हवाच."

"अर्थात." शहामृगाने पोक्तपणे टेकू दिला आणि जाईला विचारले, "तुझ्याजवळ आणखी काय आहे?"

" अंगुस्तान." जाई वाकडे तोंड करून म्हणाली.

" हिंदुस्थानच्यावर आहे ते?"

" ते नाही." जाई म्हणाली, " ते पाकिस्तान, बलुचिस्तान, अफगाणिस्तान. ती सगळी राष्ट्रं आहेत. माझ्या खिशात राष्ट्रं कशी मावतील? अंगुस्तान म्हणजे शिवण शिवताना सुई बोचू नये म्हणून बोटाला घालायचं टोपण.—हे बघा!"

" आण ते इकडे." शहामृग म्हणतो.

पुन्हा सर्वांचा घोळका जाईभोवती जमला. शहामृगाने लांबट चेहरा करून जाईला अंगुस्तान नजर केले. " ही नाजुक भेट आपण स्वीकारावी अशी आमची सर्वांची विनंती आहे." असे एक छोटे भाषण त्याने केले, तेव्हा टाळ्यांचा कडकडाट झाला.

जाईला हा सगळा वेडपटपणाच वाटला. पण सारी जणे इतकी गंभीर दिसत होती, की मोठ्याने हसायची तिची छाती झाली नाही. आणि मग दुसरे काहीच बोलायला सुचेना, तेव्हा नुसते खाली वाकून तिने ते अंगुस्तान स्वीकारले. तसे करताना चेहऱ्यावर जेवढा पोक्तपणा आणता येईल तेवढा तिने आणला.

आता तो तिळगूळ खायचा. या कार्यक्रमात एवढा गोंधळ न् गडबड उडाली की विचारू नका. मोठे पक्षी होते ते चोच मुरडून म्हणाले, " पुस्! आम्हांला तर याची चवच कळत नाही." छोटे पक्षी होते, त्यांच्या घशांत दाणे अडकून बसले. त्यांच्या पाठीवर थापट्या मारून ते काढावे लागले. पण शेवटी एकदाचा हा सोहळा संपला. आणि मग पुन्हा सर्व जण कोंडाळे करून बसली आणि उंदराला म्हणतात, " मामा, आम्हांला आणखी थोड्या थापा मारा."

जाई म्हणाली, " तुम्ही आम्हांला स्वताची कहाणी सांगणार होता, आठवतं ना? आणि....आणि तुम्हांला मान्....अन् कुत्...का आवडत नाहीत ते सांगणार होतात, होय ना?" जाई मुद्दामच नुसते 'मान्' आणि 'कुत्' म्हणाली. हो, नाही तर मामा पुन्हा भडकायचे!

उंदीर जाईकडे वळून एक सुस्कारा सोडीत म्हणाला, " माझी कहाणी खूप लांबलचक आहे. डोळ्यांतून टिपं काढील ती!"

जाईचे लक्ष त्याच्या शेपटीकडे होते. ती शेपटी पण कशी लांबलचक होती! आणि तिच्याही टोकाला एक टिपूस दिसत होते.

जाई म्हणाली, "लांबलचक ठीक आहे. पण 'टिपं काढील' असं का म्हणता?"

आणि मग उंदीरमामा आपली कहाणी सांगायला लागला, तरी जाईचे मन आपले इकडेच गुरफटले होते. "लांबलचक कहाणी? टिपं गाळणारी कहाणी? उंदराच्या शेपटीसारखी कहाणी? की माझ्या या वेणीच्या शेपट्या-सारखी कहाणी? कशी बरं असेल ती? अशी तर नसेल?...

**वाघ्या कुत्रा घरात भेटे उंदिरमामाला**
**म्हणे कसा, "चल, तुजवर भरतो आजच मी खटला!**
—चल म्हणतो ना, लवकर चल रे
आत्ता कोर्टात! नाही म्हणशिल
तर मग खाशिल ही मुस्काटात!
खटला कसला? नको विचारू!
**झकास खटला हवा!**
**करमत नाही, भकास वाटे**
आज बिघडली हवा!"
उंदिर बोले, "गड्या,
छान ही युक्ति जरि बेश,
न्याय द्यायला हवे पंच
अन् तो न्यायाधीश!"
खो खो
हसुनी बोले,
"फाजिल बकवा पुरे!
न्यायाधीशन् पंचहि होइन
मीच तुझा, चल रे!
झटकन् खटला
चालवुनी तुज
पटकन् देइन शिक्षा
फाशी–फाशी–
देउनि फाशी
उतारिन
तव
नक्षा!"

"तुझं लक्ष दिसत नाही!" मध्येच उंदीर रागारागाने म्हणाला. "कसला विचार करते आहेस?"

"माफ करा." जाई गरिबीने म्हणाली, "तुमचं....तुमचं पाचवं कडवं चाललं होतं, नाही?"

"मुळीच नाही!" उंदीरमामा भयंकर संतापून किंचाळले.

"काही तरी कडवं चाललं होतं एवढं खरं—" जाई आपली बाजू सावरीत म्हणते, "पाचवंच असेल असं नाही. किती तरी कडवी आहेत तुमच्या गाण्यात—म्हणजे गाणं कडवट आहे असं नाही हो म्हणायचं मला!"

"चूप बैस!" उंदीर संतापून ओरडला आणि त्याच क्षणी उठून चालायला लागला.

"माफ करा....माफ करा!" जाई त्याच्या मागे जाऊन गयावया करीत बोलली. पण उंदीर एक अक्षरही ऐकायला तयार नव्हता. "फाजील बोलून माझा अपमान करतेस?" असे म्हणून तो ताडताड पाय आपटीत चालला.

"मामा, मामा! रागावू नका! परत या. आम्हांला तुमची कहाणी ऐकायची आहे." अशी सर्वांनी हाकाटी केली. पण मामांनी दाद दिली नाही. ते घुम्यासारखे ओठ आवळून तिथून तडकाफडकी निघून गेले. सगळे प्राणीही त्यांच्या मागे हाकाटी करीत गेले.

शेवटी जाई एकटीच राहिली. पण फार वेळ नाही. कारण तेवढ्यात दुरून पद्—पद्—पद्—पद् पावलांचा आवाज ऐकू आला. जाईने चटकन् तिकडे पाहिले. तिला वाटले, मामांचा राग मावळून ते कदाचित् परत आले असतील. पण छे! तो होता पांढरा ससा. इकडे तिकडे सचिंत नजरेने पाहात तो तरातरा येत होता.

"च् च् च्! सरदारीणबाई! सरदारीणबाई! काय म्हणेल ती मला आता? फाशी दिलं नाहीन् म्हणजे मिळवली!.... च्! कुठे बरं पडले असतील?"

जाईने तेव्हाच ओळखलं, की ही स्वारी पंखा नि हातमोजे शोधते आहे. लगेच ती स्वतः पुढे होऊन शोधायला लागली. पण सगळेच बदलले होते तिथे त्या जिनसांचा पत्ता कुठून लागणार? ते मोठे थोरले दालन, ते काचेचे मेज, तो छोटा दरवाजा— सगळेच नाहीसे झाले होते.

तरी पण जाई आपली पंखा नि हातमोजे शोधीतच होती. इतक्यात सशाचे लक्ष तिच्याकडे गेले आणि तो रागारागाने ओरडला, " कोण—शेवंती? तू इथे काय करते आहेस? घरी पळ पाहू; अन् मला हातमोजे हवेत तेवढे घेऊन ये—पळ!"

बिचारी जाई इतकी घाबरली, की सशाने बोट केले होते, त्या दिशेला धावत सुटली. ' तुझी काही तरी चूक झाली आहे.' एवढे सशाला सांगायला-सुद्धा ती थांबली नाही.

धावता धावता ती आपल्याशी म्हणते, " त्याला बहुतकरून असं वाटलं, की ही आपल्या घरी कामाला ठेवलेली पोरगी असावी. मी खरी कोण आहे ते जेव्हा कळेल, तेव्हा कसा चकित होईल!—पण आपण आपले त्याचे मोजे त्याला नेऊन द्यावेत हे बरं!—अर्थात, सापडले तर."

असे ती बोलते आहे, तोच तिला एक छोटेसे टुमदार घर दिसले. घराच्या दारावर चकचकीत पितळी पाटी लावलेली होती :

## श्री० शशिधर ससे

जाईने दार ठोकले विकले नाही. ती सरळ आत घुसली आणि तडक जिन्याने वर गेली. कारण तिला अशी भीती वाटत होती, की खरी शेवंती मोलकरीण पटकन् कुठून तरी यायची आणि ' कोण ग तू?' म्हणून आपल्याला घराबाहेर काढायची. मग कुठचे हातमोजे नि कुठचा पंखा?

" बाकी-" जाई आपल्याशी म्हणते, " सशाने आपल्याला कामं सांगायची म्हणजे किती विचित्र वाटतं, नाही! उद्या ठिकरी पण उठेल अन् मला काम सांगेल!"

आणि मग टिकरीने कामे सांगितली की कशी गंमत होईल त्याचाच विचार जाई करू लागली—" हो! असं होईल. आई म्हणेल, ' जाई, झाले का तुझे कपडे? आपल्याला बाहेर जायचंय्.' तशी मी म्हणेन, ' हो आलेच हं आई! अग, ठिकरीने सांगितलंय्, की जरा वेळ बिळावर लक्ष ठेव म्हणून. नाहीतर तेवढ्यात उंदीर निघून जायचा!"

घरात हिंडता हिंडता ती आता एका लहानशा खोलीत आली होती. खोली चांगली नीटनेटकी होती आणि खोलीत खिडकीला लागून एक मेज



जाईची

होते, त्यावर पंखा नि पांढऱ्या हातमोज्यांचे दोन तीन जोड ठेवलेले होते.

"मला वाटलंच!" जाई आपल्याशी म्हणते. तिने त्यांतला हातमोज्यांचा एक जोड उचलला आणि पंखाही घेतला. आणि आता ती खाली सटकणार तोच मेजावरच्या आरशाजवळ एक लहानशी बाटली ठेवलेली तिला दिसली. या बाटलीवर मात्र 'मला प्या' किंवा 'मला खा' वगैरे काहीसुद्धा लेबल नव्हते. पण तरी तिने तिचे बूच उघडले आणि बाटली तोंडाला लावली.

आता नक्कीच काहीतरी होणार असे तिला वाटले. ती म्हणाली, "मी काही खाल्लं, काही प्याले, तरी काहीतरी विचित्र होतंच. तेव्हा या वेळीं काय होतं ते तरी पाहू. मी जर एकदम सटदिशी मोठी झाले तर बरं होईल बुवा! मला एवढंसंसं राहाण्याचा अगदी कंटाळा आला आहे!"

आणि खरोखरच काहीतरी झाले. आणि ते फारच झपाट्याने झाले. तिने अर्धी बाटली संपवली नाही, तोच तिचे डोके छताला लागू लागले; आणि आपली मान मोडू नये म्हणून तिचारीला खाली वाकणे भाग पडले. घाईघाईने तिने बाटली खाली ठेवली आणि ती पुटपुटली, "बास् झालं! आणखी नको ग बाई वाढायला! आताच मला दाराबाहेर निघणं अशक्य आहे. इतकं प्याले नसते तर बरं झालं असतं."

पण आता 'प्याले नसते तर नि फर' करण्यात काय अर्थ! आत्याबाईला मिशा असत्या तर म्हणे काका म्हटलं असतं. पण आहेत का मिशा? एवढे थोरले औषध जाई प्याली होती, त्याचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील? भराभर भराभर ती आपली वाढतच होती. शेवटी तिने गुडघे टेकले; कारण तिला उभेसुद्धा राहता येईना. होता होता ती आणखी मोठी झाली आणि मग खोलीत मावेचना. बसता पण येईना; तेव्हा ती जमिनीवर आडवी झाली. तरी तिचे वाढणे काही संपेना. हात झाले लंबाडे; ते ठेवायचे तरी कुठे? तेव्हा एक कोपर तिने दाराला टेकले, दुसरा हात मानेखाली घातला. तरी आपली सटासट वाढतेच आहे!

शेवटी खोलीत हात मावेना म्हणून तिने तो खिडकीतून बाहेर काढला आणि एक तंगडे जे धुराड्यातून वर नेले ते थेट कौलांवर काढले.

"बाई, बाई, बाई!" ती आपल्याशी म्हणाली, 'आता होणार आहे

तरी काय माझं? याच्यापेक्षा आणखी मोठी झाले तर घराचं काय होणार या?"

पण जाई आणखी मोठी झाली नाही. तिची वाढ एकदम थांबली. पण तरी काय झाले? आत्ताच ती एवढी प्रचंड झाली होती, की बाहेर कसे निघायचे हा प्रश्नच होता. काड्याच्या पेटीत एखादा टोळ अडकवून ठेवावा तसे तिला झाले होते. भारी भारी अंग अवघडले होते तिचे.

"यापेक्षा घरीच बरं होतं." जाई म्हणाली. "तिथे निदान असला मोठं नि ल्हान होण्याचा प्रकार नव्हता. उंदरांचे नि सशांचे हुकूम ऐकावे लागत नव्हते. काय तरी बाई! कुठून मला त्या सशाच्या बिळात शिरायची बुद्धी झाली! पण— पण काही म्हणा, हे सगळं फार फार विचित्र आहे एवढं मात्र खरं हं! काय झालं असेल बरं मला? इतके दिवस मी पऱ्यांच्या गोष्टी वाचायची, तेव्हा मला वाटायचं, असं खरं होणं शक्यच नाही! पण हे काय झालं की खरं! पुस्तकात आपण वाचतो तस्सं अगदी. माझ्याबद्दलसुद्धा एक पुस्तक लिहायला हवं आता. मी मोठी झाले की मीच लिहीन.—पण, इश्श! मोठी काय व्हायची आहे आणखी? मोठी व्हायला आता इथे जागाच कुठे आहे?— ऊं: ऊं— !"

"पण—" जाईच्या मनात एकदम आले, "मी मोठी होणार नाही, म्हणजे वयाने पण वाढणार नाही की काय तरी? बाकी, तसं असेल तर वाईट नाही म्हणा. मग मी म्हातारी व्हायची नाही, कधी कधीसुद्धा. पण मग...अगबाई! सारखं ल्हानच राहायचं म्हणजे सारखा अभ्यास करायचा! तो कधी मागचा सुटायचाच नाही. नको ग बाई तो अभ्यास!"

आणि मग जाई स्वतालाच हसली आणि म्हणते, "काय मूर्ख आहेस ग! इथे अभ्यास करणं शक्य तरी आहे का तुला! ही खोली केवढी, तू केवढी? तुलादेखील ही जागा पुरत नाही, तर पुस्तक कसलं वाचतेस इथे कपाळाचं!"

आणि अशा रीतीने मग तिचा संवाद सुरू झाला. एकदा ही बाजू घ्यायची, एकदा ती बाजू घ्यायची आणि मारे आपल्याशीच भांडायची. पण इतक्यात बाहेर तिसराच एक आवाज ऐकू आला आणि जाई बोलायची थांबून कान देऊन ऐकू लागली.

"शेवंती, शेवंती! अग, गेलीस कुठे?" तो आवाज ओरडत होता,

“ माझे हातमोजे आण पाहू आत्ताच्या आत्ता ! ”

आणि लगेच जिन्यावर पटपट पाय वाजू लागले. जाईने ओळखले, की हा ससाच येतो आहे आपल्या मागोमाग ! जाई इतकी घाबरली, की थरथर कापत सुटली आणि तिच्या कापण्यामुळे सबंध घर दरदरा हालू लागले. खरे म्हणाल, तिला भिण्याचे काहींच कारण नव्हते. सशाच्या हजारपट ती मोठी होती ! पण तिच्या हे ध्यानात असेल तर ना ?

इतक्यात ससा दाराशी पोचलाच. दार उघडण्याचा त्याने प्रयत्नही केला. पण दार आत ढकलून उघडण्याचे होते; आणि आतल्या बाजूने तर जाईने पायाचा असा रेटा दिला होता की ज्याचे नाव ते !

दार जेव्हा उघडेना, तेव्हा सशाने काही तरी पुटपुट केली. जाईने कान टवकारले होते, त्यामुळे तिला ती ऐकू गेली.

“ असं असेल—” ससा म्हणत होता, “ तर मला पलीकडे जाऊन खिडकीतून आत शिरलं पाहिजे. ”

“ अरे जा रे ! ” जाई हसत आपल्याशी म्हणते, “ कसा येतोस खिडकीतून ते पाहाते. ”

आणि असे म्हणून तिने आपला हात लांब केला आणि खिडकीजवळून हवेत फिरवला. पण तिच्या हाताला काहीच लागले नाही. एक बारीकशी किंकाळी मात्र तिने ऐकली आणि मग धप्पकन् काही तरी पडले आणि काचा फुटल्याचाही आवाज झाला. जाईने ओळखले—बागेत फुलझाडांची कलमं ठेवण्यासाठी काचेचं घर केलेलं असेल, त्याचंच छप्पर फुटलं असावं !

थोड्या वेळाने पुन्हा ससोबांचे रागाचे शब्द ऐकू आले. “ खंड्या, खंड्या ! तू कुठे आहेस ? ” आणि मग एक निराळाच आवाज ऐकू आला : “ हा मी इथे आहे, शेट ! पेरू काढतोय उकरून. ”

“ पेरू काढतो आहेस—**उकरून** ? ” ससोबा उखडले. “ मुकाट्याने इकडे ये, आणि मला यातून बाहेर काढ ! ”

[ आणखी काही काचा फुटल्याचा आवाज. ]

“ खंड्या ! ते रे काय दिसतंय् खिडकीत ? ”

“ तो हात आहे, शेट. ” ( ‘ हात्त ’ असा उच्चार केला त्याने. )

“ हात ?–काय सांगतोस ? एवढा हात कधी पाहिला होता कुणी ? सबंध

खिडकी भरली आहे त्याने!"

"भरली असेल, शेट. पण तरी तो हात्तच आहे."

"बरं, असेल. पण त्याचं तिथे काय काम आहे? काढून टाक तो तिथून!"

यानंतर बराच वेळ सामसूम होती. जाईला मधून मधून फक्त हलक्या आवाजात केलेली कुजबुज ऐकू येत होती. जसे: "मला तरी हे लक्षण ठीक दिसत नाही, शेट!" "मी सांगतोय् तसं कर! भित्रा कुठचा!" आणि मग पुन्हा जाईने हात लांब केला आणि पुन्हा एकदा हवेतून फिरवला. या खेपेस दोन किंकाळ्या ऐकू आल्या आणि आणखी काही काचा फुटल्याचे आवाज झाले. "वाई, वाई!" जाई म्हणाली, "काचेची घरं तरी किती आहेत या बागेत! आता पुढे काय बरं करतील हे लोक? एवढा गोंधळ घालताहेत तर खरोखरीच मला बाहेर तरी काढा म्हणावं ओढून! मी तर अगदी कंटाळले या कोंडवाड्याला!"

काही वेळ तिने वाट पाहिली, पण काही ऐकू आले नाही. नंतर एकदाची गाडीची चाके वाजली. बरेचसे लोकही एकदम बोलायला लागले, त्यांतले जाईला जे शब्द कळले, ते असे—"दुसरी शिडी कुठे आहे?—दुसरी? वा! माझ्याकडे एकाच शिडीचं काम होतं. सद्याजवळ दुसरी असणार!—सद्या! आण पाहू ती शिडी इकडे—हं, अशी या कोपऱ्यात लाव—अंहं! दोन्ही शिड्या जोडल्या पाहिजेत एकीला एक. फुस्! अजून अर्ध्यापर्यंतसुद्धा पोचत नाही अं? बरं, चालवून घेऊ! सगळंच कसं आपल्या मनासारखं होईल?—हं, इकडे ये, सद्या. पकड ही शिडी पक्की. हं, चढ आता....बघ बरं? छपराला पेलेल ना वजन तुझं?—जपून, जपून! ते कौल निसटलं आहे हो, संभाळ! ओः! आलंच खाली! जपा रे आपापल्या टाळक्याला! (धाड—धप्प!) कुणी बरं केलं हे? सद्यानेच असणार! हं, मग कोण जाणार धुराड्यातून खाली—छे, छे! मी नाही बुवा—अं हं! नावच काढू नका!.... सद्याच गेलेला बरा. सद्या, ए सद्या! शेट म्हणतात, तूच जा धुराड्यातून खाली."

"अस्सं काय?" जाई आपल्याशी म्हणाली, "सद्या येणार काय, धुराड्यातून खाली? सगळंच सद्यावर सोपवून मोकळे होतात हे लोक!

सद्याच्या जागी आपण असतो, तर आपल्याला नसतं वा आवडलं हे! आता हे धुराडं तसं रुंद नाही म्हणा,–तरी पण–तरी पण इतपत लाथा झाडता येतील मला!"

आणि मग धुराड्यातून पाय जितका खाली ओढून घेता येईल तेवढा तिने घेतला; आणि वाट पाहात बसली. थोड्या वेळाने कोणी तरी लहानसा प्राणी धुराड्याच्या आतल्या बाजूला खरवडतो आहे, असे तिला वाटले (तो काय प्राणी असावा, ते तिला मुळीच समजेना). होता होता त्याची खसवस अगदी जवळ जवळ वाटू लागली. जाई स्वत:शीच म्हणते, "हा नक्कीच सद्या येतोय् वरं का!" आणि ओढून घेतलेली तंगडी तिने अशी झाडली म्हणता! सण-सणीत लाथ दिली तिने आणि मग जरा वेळ थांबली आता काय होते त्याची वाट पाहात.

फार वेळ नाही–थोडाच वेळ! कारण लवकरच बाहेर खूप गलबला झाला. वरीच मंडळी एकदम बोलायला लागली: "तो बघा सद्या निघाला!" आणि मग एकटा ससाच म्हणतो, "कोण उभं आहे ते कुंपणाशी?– पकड, पकड त्याला!" आणि नंतर सर्वांचा एकच गलका: "त्याचं डोकं धरा! कुणीतरी मात्रा आणा. द्या उगाळून. पाजा, पाजा!–अरे, इतकी नको–तो घुसमटेल!–हं, कसं वाटतं सदोबा आता? बोल की रे! ही काय भानगड आहे? आत काय दिसलं तुला?"

शेवटी एकदाचा सद्या कापऱ्या, खोल गेलेल्या आवाजात बोलू लागला, "काय की बुवा!–बस्, आणखी नको! पुष्कळच बरं वाटतंय् आता. पण काही चमत्कारिक गोंधळ झालाय् माझा, तेव्हा तुम्हांला नीट सांगू शकणार नाही मी. एवढंच सांगतो, की मी धुराड्यातून खाली गेलो आणि तिथे एखादं स्प्रिंगचं बाहुलं जसं ताडदिशी उभं राहातं तसं काही तरी अंगावर आलं माझ्या आणि मग बंदुकीच्या गोळीसारखा सट्कन् मी बाहेर आलो!"

"ते पाहिलं रे आम्ही...." ऐकणारे एका सुरात म्हणाले.

इतक्यात सशाचा आवाज आला: "आपण वर जाळूनच टाकू या!"

त्याबरोबर जाईही जोरात ओरडली, "असलं काही केलंत, तर ठिकरीला अंगावर सोडीन तुमच्या!"

तत्क्षणी सगळे गप्प बसले. जाई आपल्याशी म्हणते, "आता काय बरं

करतील हे आडदांड लोक? बेट्यांना एवढी अक्कल नाही, की घराचं छप्परच काढून टाकावं!"

एक दोन मिनिटे तशीच गेली. मग पुन्हा बाहेर हालचाल सुरू झाली. जाईने कान टवकारले. ससा म्हणत होता, "सुरवातीला एक गाडीभर पुरेत."

"गाडीभर काय? आणि कसली गाडी?" असा जाई स्वताशी विचार करते आहे तो खिडकीतून धडाधड दगडांचा मारा होऊ लागला. लहान लहान खडे होते. त्यांतले काही तर जाईच्या तोंडावर आपटले. ती खूप संतापली आणि म्हणाली, "याचा बंदोबस्त केलाच पाहिजे–(ओरडून) हे बघा! मुकाट्याने हे बंद करा! नाहीतर–" पण ती एवढे म्हणते आहे, तो दगडांचा वर्षाव बंद झाला आणि पुन्हा बाहेर सामसूम पसरली.

जाई त्या दगडांकडे पाहात होती. तो काय आश्चर्य! त्या सगळ्या दगडांचे लाडू बनत होते! "छान!" तिला एक कल्पना सुचली. "आता यांतला एखादा लाडू खाऊन बघते. काहीतरी चमत्कार होईलच माझ्यात. आणखी मोठी तर होणं जवळ जवळ अशक्यच. तेव्हा कुणी सांगावं, पटदिशी लहान होईन!"

आणि असे म्हणून तिने एक लाडू उचलला आणि खाऊन संपवला. आणि खरोखरच जेव्हा ती भराभर लहान होऊ लागली, तेव्हा तिचा आनंद त्या एवढ्याशा घरात मावेना.

दरवाज्यातून शिरण्याइतकी लहान होताच ती जी धावत सुटली, ती थेट घराच्या बाहेर पडली. तिथे छोट्या छोट्या प्राण्यांचे नि पक्ष्यांचे एक संमेलनच भरलेले तिला दिसले. सर्वांच्या मध्यभागी सदोबा सरडोक होते. सरड्याचा रंग बदलतो म्हणतात. ते आज जाईला प्रत्यक्ष पाहायला मिळाले. कारण सद्या अगदी काळा ठिक्कर पडला होता! दोन छोटी डुकरे त्याला दोन बाजूंनी सावरून धरीत होती आणि एका बाटलीतले काही औषध त्याला पाजीत होती. जाई घराबाहेर पडताच या सर्व मंडळींनी एकदम तिच्यावर हल्ला केला, पण जाई थांबते कशाला? धाववेल तेवढ्या जोरात तिने तिथून धूम ठोकली आणि लवकरच ती दाट जंगलात जाऊन पोचली. मग तिला जरा हायसे वाटले.

जंगलात फिरता फिरता ती आपल्याशीच म्हणाली, "आता पाहिली गोष्ट ही करायची— नेहमीचा आकार मिळवायचा. दुसरी गोष्ट म्हणजे त्या सुंदर बगिच्यात प्रवेश मिळवायचा. हाच कार्यक्रम उत्तम होईल."

पण तिचा हा 'कार्यक्रम' कितीही उत्तम असला, तरी तो पार कसा पाडायचा ही मुख्य अडचण होती. तेव्हा ती जरा इकडे तिकडे झाडीत डोकावून पाहायला लागली. कारण तिला काय करावे हे सुचत नव्हते. इतक्यात तिच्या नेमके डोक्याशी कुत्रे भुंकल्याचा आवाज आला, म्हणून तिने झटकन् वर पाहिले.

एक प्रचंड कुत्र्याचे पिल्लू आपल्या गोल जंगी डोळ्यांनी खाली तिच्याकडे पाहात होते, आणि एक पंजा ताणून तिला शिवायला बघत होते.

"बिच्चारं!" जाई हळहळत म्हणाली आणि हळूहळू शीळ वाजवून त्याला खाली बोलवायचा तिने प्रयत्न केला. पण खरे म्हणाल तर मनातून ती घाबरली होती. तिला असे वाटत होते, की या पिल्लाला भूकबीक तर लागलेली नाही? तसं असेल तर तो आपलाच चट्टामट्टा करायचा. कारण, आहे पाहा ना केवढा जंगी!

तिने अगदी सहजगत्या एक काडी उचलली आणि कुत्र्यापुढे धरली. त्याबरोबर कुत्र्याने एक आनंदाची आरोळी ठोकून एकाएकी हवेत उडी घेतली आणि तो काडी धरायला गेला. जाई पटदिशी एका काटेरी झुडपा-आड झाली म्हणून बरे, नाहीतर तो तिच्या अंगावरच पडला असता. पण ती झुडपाच्या पलीकडून पुन्हा बाहेर येते न येते तोच कुत्र्याने पुन्हा एकदा काडीकडे झेप टाकली. काडी मिळवण्याच्या गडबडीत तो कुठेतरी अडखळून पडला आणि खाली डोके वर पाय अशी त्याची स्थिती झाली. जाईला वाटले, याच्याशी खेळणे म्हणजे घोड्याबरोबर खेळण्यासारखेच आहे. केव्हा आपण त्याच्या लाथेखाली तुडवल्या जाऊ त्याचा नेम नाही. पुन्हा एकदा तिने झुडपाआड उडी मारली, तशी कुत्र्याने काडीवर पुन्हा पुन्हा हल्ले करायला सुरवात केली. त्याचे हल्ले मोठे गमतीदार होते. तो थोडासाच पुढे धावत यायचा आणि मग एकदम बराच मागे पळायचा. आणि हा प्रयोग करताना सारखा भूं भूं— भुंकायचा. शेवटी तोही दमला आणि बऱ्याच लांब अंतरावर धापा टाकीत बसला. त्याची जीभ तोंडातून चांगली हातभर

बाहेर लळलळत होती आणि त्याचे प्रचंड डोळे अर्धवट मिटलेले होते.



आपल्याला पळून जायला ही संधी बरी आहे, असे जाईला वाटले. तेव्हा लगेच ती निघाली. आणि अशी धावली, अशी धावली– शेवटी खूप दमली

भागली आणि धापा टाकायला लागली. कुत्र्याचे भुंकणे आता खूप खूप लांब अंतरावरून ऐकू येत होते.

एक मोठे मेंडीचे झाड मध्ये आले. त्याचे खोड हाताने पकडून जाई त्याला रेलून उभी राहिली आणि त्याचेच एक पान तोडून त्याने वारा घेत आपल्याशी म्हणते, "खरं म्हटलं तर किती छान होतं ते पिल्लू! मला फार आवडलं. माझा आकार हा असा, नाही तर मी त्याला गमतीगमतीचे खेळ शिकवले असते. पण सगळंच मुसळ केरात! मला परत मोठं व्हायचंय् हे विसरतेच मी. कसं वरं व्हावं मोठं? काही तरी खाल्लं पाहिजे किंवा प्यालं पाहिजे, म्हणजे जमेल ते. पण मोठा प्रश्न हा आहे, की काय खायचं, काय प्यायचं?"

खरोखरच 'मोठा प्रश्न' तो होता. जाईने सभोवती नजर फिरवली. गवताची पाती, छान छान फुले....खूप होती. पण खाण्यासारखी चीज एकही दिसत नव्हती. तिच्या अगदी जवळ एक कुत्र्याची छत्री उगवली होती. खूप मोठी होती ती— जवळजवळ तिच्याएवढी उंच. जाईने त्या छत्रीखाली जाऊन पाहिले, मग डाव्या बाजूला पाहिले, उजव्या बाजूला पाहिले, छत्रीच्या मागे पाहिले आणि मग तिला वाटले— छत्रीच्या वर देखील का पाहू नये?

लगेच ती चवड्यावर उभी राहिली आणि छत्रीची कड दोन्ही हातांनी पकडून तिने मान उंच करून वरती पाहिले.

काय दिसले तिला?

छत्रीच्या टपावर एक भला जंगी निळा सुरवंट बसला होता. त्याचे आजूबाजूला मुळीच लक्ष नव्हते. जाईने डोकावलेलेसुद्धा त्याला कळले नाही. हुक्क्याची नळी तोंडाला लावून तो शांतपणे 'गुड गुड गुड गुड' करीत बसला होता.

४

बराच वेळ सुरवंट आणि जाई एकमेकांकडे निमूटपणे पाहात होती. शेवटी सुरवंटाने हुक्क्याची नळी तोंडातून काढली आणि तो जाईशी पेंगुळलेल्या, झोपाळू आवाजात बोलायला लागला—

" तू कोण आहेस ? "

जाईला वाटले, संभाषण काही मोठेसे चांगले सुरू झाले नाही. तिने जरा लाजून उत्तर दिले, " ते मलाही नीट सांगता यायचं नाही, महाराज ! म्हणजे आत्ता मी कोण आहे हे काही मला माहीत नाही. आज सकाळी उठले तेव्हा कोण होते, एवढं फार तर सांगू शकेन. पण, त्यानंतर इतक्या वेळा माझ्यात फरक झाला आहे—"

" म्हणजे काय ? " सुरवंट दरडावून म्हणाला, " नीट स्पष्ट सांग पाहू. "

" मी स्वतःच नीट अन् स्पष्ट नाही, तर तुम्हांला काय नीट अन् स्पष्ट सांगू ? "

" म्हणजे ? मला नाही कळलं ! " सुरवंट म्हणाला.

" यापेक्षा स्पष्टपणे मला सांगता येईलसं वाटत नाही, " जाई म्हणाली. " पण थांबा. असं पाहा, तुम्ही आज सुरवंट आहात, उद्या तुमचा कोष होईल अन् परवा एखादं फुलपाखरू होऊन तुम्ही भुर्रदिशी उडून जाल. ते सगळं तुम्हांला विचित्र वाटेल, नाही का ? "

" नाही. "

" बरं, नाही. तुमचं वाटणं बिटणं कदाचित् वेगळंच असेल. पण मी तुमच्या जागी असते तर मला ते नक्कीच विचित्र वाटलं असतं ! "

" तुला ? " सुरवंट तुच्छतेने म्हणाला, " तू कोण आहेस ? "

झाले ! म्हणजे पुन्हा गाडे मूळपदावर आले. जाईला सुरवंटाचे असले थोडक्यात बोलून टोले मारणे मुळीच आवडले नाही. ती ताठ उभी राहिली आणि गंभीर सुरात बोलली, " पण मी म्हणते— **तुम्हीच** सांगा की अगोदर, **तुम्ही** कोण आहात ते ! "

सुरवंट म्हणाला, " का ? "

हे आणखी एक कोडे होते. का ? जाईला तर याचे एकही उत्तर सुचेना.

तिकडे सुरवंट तर जसा काही टोचून बोलायला टपलेला होता. तेव्हा जाईने मुकाट्याने त्याच्याकडे आपली पाठ वळवली.



"थांब, इकडे ये !" सुरवंटाने तिला हाक मारली. "मला तुला काही तरी महत्त्वाचं सांगायचं आहे."

हं. हे ठीक होते. जाई वळली आणि परत आली.

सुरवंट तिला म्हणाला, "आपला राग आवर जरा."

हे ऐकून जाईला असा राग आला, की तो गिळताना तिच्या नाकी नऊ आले.

" एवढंच ? " ती म्हणाली.

" नाही. " सुरवंट बोलला.

जाईला वाटले, थांबू या जरा वेळ. नाही तरी आपल्याला आता दुसरे काहीच काम नाही. तेव्हा थांबू या. कदाचित हा प्राणी खरोखरच काही तरी महत्त्वाचे सांगेल.

काही मिनिटे तो प्राणी तसाच 'गुडगुड गुडगुड' करीत होता. एक शब्दही त्याने तोंडातून काढला नाही. नंतर त्याने छातीशी अडकवलेले हात खाली सोडले, तोंडातून हुक्क्याची नळी काढली आणि तो म्हणाला, " हं: ! म्हणजे तुझं म्हणणं असं, की आपल्यात फरक झालाय् ! " [redacted]

" हो ! " जाई म्हणाली " त्यात शंकाच नाही. मला पूर्वी काही गोष्टी आठवत असत, त्या आता अजिबात आठवत नाहीत. दुसरं असं, की माझा आकार मिनिटामिनिटाला बदलतोय् ! "

" कोणत्या गोष्टी आठवत नाहीत तुला ? " सुरवंटाने विचारले.

" पुष्कळ. एक उदाहरणच सांगते. 'रानपाखरा, रोज सकाळी ' ही कविता मी म्हणायला लागले, तर तोंडातून काही वेगळीच आली. " जाईने खिन्न आवाजात सांगितले.

" अस्सं ! 'म्हातारा इतुका ' हे गाणं म्हण पाहू. "

जाईने हात छातीशी धरले आणि सुरवात केली," म्हातारा– अ– अ– " आणि तिथेच ती अडखळली. आणि मग तिला एक मुंबईचा म्हातारा आठवला– शीवला ती मावशीकडे गेली होती. त्याच चाळीत तो राहायचा. आणि एवढे वय झाले असूनही रोज लोकल गाडीतून भटकायचा म्हणे— अप-डाउन, अप-डाउन ! नोकरीधंदा काय करायचा, त्याचे त्याला माहीत ! शेवटी कसे तरी जुळवून घेत तिने गाणे म्हटले, ते असे—

" म्हातारबाबा, म्हातारबाबा ! पाउणशे वयमान
झाले तुमचे आज !
लठ्ठ मूळचे असुनी तुम्हा वृद्धपणा **करि रोड**
**परळ** जाहली तोंडाची अन् अन्न न लागे गोड

दंताजीचे **ठाणे** उठले, कानांचे **कल्याण** !
वरगड्ड्यांचे **दादर** चढुनी उंच निघाली मान
तरी गाठता उत्साहाची कशी तुम्ही **शीव** ?



लोकलमधुनी लटकत जाता लोकां भरते हीव !
हुरूप तुमचा लाजवि साऱ्या पोराटोरांना !
सिंहा-वाघा-हत्ती-उंटा-बकऱ्या-ढोरांना !

[ चाल बदलून ]

रात्रंदिन हे करता काय ?
खाली डोके वरती पाय ?
कसरत असली करताना
घसरुन खाली पडाल ना ! ”

यावर म्हातारबाबा म्हणतात—

[ पुन्हा पहिली चाल ]

“ बाळपणी मज भीति भयंकर कसरत करण्याची
मेंदुस पक्का पोचुन धक्का तुकडे होण्याची.
पुढे पुढे परि खात्री झाली, मेंदुच नाही मला !
भीति कशाची, धोका कसला खुशाल कसरत करण्याला ? ”

“ छट् ! बरोबर नाही म्हटलीस ! ” सुरवंट बोलला.

“ हो ना—तितकीशी बरोबर नव्हतीच. काही शब्द बदलले गेले.” जाई जरा भीत भीत बोलली.

“ काही का ? सर्वच ! सुरवातीपासून शेवटापर्यंत चुकीची म्हटलीस ! ” सुरवंटाने अगदी ठासून मत दिले आणि मग काही मिनिटे पुन्हा दोघेही गप्प होती.

मग पहिल्यांदा सुरवंट बोलला.

“ तू काय म्हणालीस ? तुला केवढं व्हायचंय् ? ”

“ अं: ! आकाराबद्दल माझा तसा आग्रह नाही ” जाई एकदम म्हणाली. “ पण असं सारखं सारखं बदललेलं कुणाला आवडेल, नाही का ? ”

“ कुणास ठाऊक ! ” सुरवंट म्हणाला.

जाई काहीच बोलली नाही. तिला वाटले, आपण काही बोला, हे सुरवंटराव आपले त्याच्याविरुद्ध ! साऱ्या जन्मात आपल्याला असा त्रास कुणी दिला नव्हता ! जाईला वाटले, हळूहळू आपला राग पोटात मावेनासा होईल आणि फटदिशी काही तरी बोलून जाऊ आपण !

सुरवंटाने विचारले, “ पण आता तर तू बदलत नाहीस ना ! मग तुझी तक्रार का ? ”

“ हं: ! ” जाई म्हणाली, “ आणखी थोडीशी जर मी मोठी झाले, तर

किती मजा होईल ! आत्ताची माझी उंची तीन इंच आहे. म्हणजे अगदीच फुसकी ! ”

“ तीन इंच उंची म्हणजे चिक्कार झाली ! ” सुरवंट रागारागाने म्हणतो. आणि असे बोलता बोलताच त्याने पाठीची कमान केली आणि मग तो चक्क ताठ उभा राहिला. ( त्या वेळी त्याची उंची पण तीनच इंच भरली. )

जाई बिचारी दीनवाणे तोंड करून म्हणाली, “ पण मला एवढ्याशा उंचीची सवय नाही हो ! ” तिला वाटले, हे आहे काय ? इथले सगळेच प्राणी असे उठता बसता रागावतात का ?

सुरवंट म्हणाला, “ सवयीचं काय घेऊन बसलीस ? होईल तुला सवय !” आणि एवढे बोलून त्याने तोंडात नळी घातली आणि पुन्हा हुक्कापान सुरू केले.

या वेळी जाई अगदी गप्प बसली. ‘ तोच पुन्हा बोलेल तेव्हा बोलू दे ’ असे तिने ठरवले. एकदोन मिनिटांतच सुरवंटाने तोंडातून हुक्क्याची नळी काढली, एक दोन जांभया दिल्या आणि आंग झाडले. नंतर तो छत्रीवरून खाली उतरला; आणि सरपटत गवतात निघून गेला. जाता जाता त्याने फक्त एवढेच शब्द उच्चारले, “ एक बाजू तुला उंच करील, दुसरी बाजू तुला ठेंगणं करील. ”

जाई स्वतःशीच म्हणते,“ एक बाजू **कशाची** ? दुसरी बाजू **कशाची** ? ”

“ छत्रीची. ” सुरवंटाने उत्तर दिले. जसे काही जाई मोठ्यानेच बोलली होती. सुरवंट तेवढे बोलला आणि हां हां म्हणता दिसेनासा झाला.

जाईने मिनिटभर आपल्याशीच विचार करीत त्या छत्रीकडे पाहिले. या गोल छत्रीच्या दोन बाजू कोणत्या, हेच तिच्या लक्षात येईना. शेवटी तिने काय केले—दोन्ही हातांचा छत्रीभोवती विळखा घातला आणि दोन्ही हातांनी छत्रीचे तुकडे मोडून घेतले.

“ आता यांतला कोणता तुकडा कशाचा समजावा ? ” ती आपल्याशी म्हणाली. आणि मग एकदम उजव्या हातातला तुकडाच तिने चटकन् चावून बघितला. तो दुसऱ्याच क्षणी काय चमत्कार ! तिची हनुवटी आपली सटकन् खाली येऊन पायाला लागली.

इतक्या सपाट्याने हा बदल घडला, की बिचारी जाई फार घाबरून गेली.

पण तिच्या एवढे लक्षात आले, की आपण फार जोराने लहान होतो आहो. एक क्षणही फुकट घालवून उपयोग नाही. लगेच तिने डाव्या हातातला तुकडा तोंडात घातला. हे तिला फारच कठीण गेले. कारण तिची हनुवटी पायाला चिकटल्यामुळे तोंड उघडणे जवळ जवळ अशक्यच होते. पण अखेरीस जमले ते; आणि मग डाव्या हातातला तुकडाही तिने घाईघाईने चावला.

"चला बुवा!" जाई आनंदाने म्हणाली, "निघालं एकदाचं माझं डोकं वर." पण तिचा आनंद फार टिकला नाही. कारण तिला आपले खांदे कुठे दिसेचनात. तिने जेव्हा खाली वाकून बघितले, तेव्हा तिला लांबच लांब अशी मान दिसली. एखाद्या उंच देठासारखी दिसत होती ती. तिच्यासभोवती किती तरी हिरव्या पानांचा खच दिसत होता; पण तोदेखील किती खाली —खूप खूप खोल! आणि त्या हिरव्या पानांच्या समुद्रातून वर आलेले हे लांबलचक कमळाचे देठ कुठचे?—तीच तर जाईची मान होती!

"कसला दिसतोय् तो हिरवा रंग?" जाई स्वताशी म्हणाली, "आणि माझे खांदे कुठे गेले? आणि–आणि माझे हात तरी कुठे दिसताहेत? बिचारे!" हे बोलता बोलता ती आपले हात हालवत होतीच. पण तिला ते मुळीसुद्धा दिसत नव्हते. तिला एवढेच दिसले, की खोल कुठे तरी त्या हिरवळीमध्ये थोडी सळसळ झाली.

आता डोक्यापर्यंत हात उचलणे शक्य नव्हतेच. तेव्हा जाईने आपले डोकेच खाली पायांपर्यंत न्यायचा प्रयत्न केला. आणि तिने जेव्हा पाहिले, की आपली मान वाटेल तिकडे वाटेल तशी सापासारखी वळू शकते, तेव्हा तिला खूप आनंद झाला. बऱ्याच प्रयत्नाने तिने मान वळवून वळवून तिला झक्क नागमोडी आकार दिला आणि मग ती पानांच्या गर्दीत सुळसुळ फिरवली. आत्ता कुठे तिच्या ध्यानात आले, की मघाशी ज्या झाडाखालून आपण हिंडलो, त्या झाडांचेच हे हिरवे हिरवे शेंडे आहेत.

इतक्यात खसकन् काही तरी आवाज झाला. जाई दचकली आणि घाई-घाईने मागे झाली. एक मोठे थोरले कबूतर उडत येऊन तिच्या तोंडावर आपटले होते; आणि आपल्या पंखांनी तिला जोरजोराने तडाखे हाणीत होते.

"साप! साप!" कबूतर ओरडले.

"मी साप **नाही**!" जाई रागावून म्हणाली, "माझ्या वाटेला जाऊ नकोस."

"मी पुन्हा म्हणतो—साप! साप!" कबूतर पुन्हा बोलले. पण तितके ओरडून नाही, जरा खालच्या सुरात. आणि मग हुंदके देत म्हणते, "मी सर्व तऱ्हेने करून बघितलं, पण त्यांना पसंतच पडत नाही!"

"तू काय बोलतो आहेस, त्यातलं अक्षर समजत नाही मला." जाई म्हणाली.

"मी झाडांचे बुंधे उकरून पाहिले, नदीकाठावरून हिंडलो, वई धुंडली—" कबूतर तिच्याकडे लक्ष न देता आपल्याशीच बोलू लागले, "पण या सापांना खूष करणं काही आपल्याला साधत नाही."

जाईला हे जास्त जास्तच कोड्यासारखे वाटू लागले. पण तिने असा विचार केला, की याला जे बोलायचे असेल ते बोलून टाकू द्या. आपण मध्ये एक शब्दही काढू नये हे चांगलं.

कबूतर पुढे म्हणाले, "नुसती अंडी घालायची हेच काम काय थोडं झालं? तर म्हणे, बस्स, आता रात्र पाहू नका, दिवस पाहू नका, सारखं सापांवर लक्ष ठेवा! तीन वार झाले, माझा डोळ्याला डोळा लागला नाही!"

"च् च्!" जाई म्हणाली. कारण आता तिला त्याच्या बडबडीचा अर्थ जरा जरा कळू लागला होता. "तुम्हांला एकंदरीत फारच त्रास झाला म्हणायचा!"

"आणि—" कबुतरीण आपला आवाज चढवून किंचाळत म्हणते, "आणि आता नुकतं कुठे हे सगळ्यांत उंच झाड मला सापडलं अन् त्याच्यावर शेंड्यावर मी माझी अंडी ठेवली. वाटलं, आता तरी सुटलो आपण त्या सापांच्या तावडीतून! पण छे! एवढं कुठचं व्हायला? आता पाहावं तर बेटे खुशाल आकाशातून उतरताहेत! हं:!—साप!"

"पण मी साप **नाही**!" जाई अगदी गयावया करीत म्हणाली, "मी—मी—"

"मी—मी—काय करतेस? सांग ना मग तू कोण आहेस ते! कळलं! काय थाप मारावी ते जुळवते आहेस ना?"

"मी—मी एक मुलगी आहे लहानशी." जाई म्हणाली. पण हे बोलताना

ती चाचरतच होती. कारण तिची तिला तरी खात्री कुठे होती? आज दिवसभरात झालेले फेरबदल तिच्या लक्षात होते ना!

कबुतराने शक्य तेवढ्या हेटाळणीच्या सुरात म्हटले, "तर–तर! थाप तरी जरा नीट मारायचीस! तुला काय वाटतं, मी मुली कधी पाहिल्या नाहीत, होय? शेकडो पाहिल्या आहेत. पण अशी लंबी लंबी मानवाली मुलगी मी कधी स्वप्नातसुद्धा पाहिलेली नाही. ते काही नाही. तू सापच आहेस. उगाच नाकारण्यात अर्थ नाही. उद्या उठशील अन् म्हणशील: आपण कधी अंडी खाल्लेली नाहीत! कुणाला खरं वाटेल तुझं असलं बोलणं?"

"मी अंडी खाल्लेली आहेत, नाही असं नाही." जाईने उत्तर दिले. कारण ती खरे बोलणारी मुलगी होती. "पण त्यात तुला एवढं काय वाटतं? साप जसे अंडी खातात, तशाच मुली पण अंडी खातात– काही काही मुली."

कबूतर मान हालवून म्हणाले, "छट्! मला नाही हे खरं वाटत. पण मी म्हणते, असलं खरं म्हणून काय झालं? मुली जर अंडी खात असतील, तर त्याही एक प्रकारच्या सापिणीच म्हणायच्या!"

जाईला वाटले, ही कल्पना अगदीच नवीन आहे. ती आपली एक दोन मिनिटे गप्प बसली. त्यामुळे झाले काय, कबुतराला आणखी चऱ्हाट वळायला संधी मिळाली. ते म्हणाले, "तू मुळी अंडीच शोधत होतीस मघाशी. माझी पक्की खात्री आहे. मला काय करायचंय् तू मुलगी आहेस की साप आहेस त्याच्याशी?"

जाई एकदम म्हणाली, "तुला काही करायचं नसलं तरी मला खूप करायचं आहे. पण तुला एवढं सांगते, मी काही अंडी शोधत नव्हते. आणि शोधत असते तरी तुझी अंडी मी घेतली नसती. मला कच्ची अंडी आवडत नाहीत."

कबूतर चिडक्या सुरात म्हणाले, "ठीक आहे. मग चालती हो इथून." आणि एवढे बडबडून ते पुन्हा आपल्या घरट्यात शिरले आणि तिथे आंग फुलवून बसले. जाई पुन्हा झाडीत वाकली आणि इकडे तिकडे करायला लागली. पण तिला फार त्रास होत होता. कारण तिची लांबलचक मान सारखी झाडांत नि वेलींत अडकत होती. त्यामुळे पुन्हा पुन्हा थांबून तिला

ती सोडवावी लागत होती.

थोड्या वेळाने तिच्या लक्षात आले, की आपल्या हातांत ते कावळ्याच्या छत्रीचे तुकडे अजून शिल्लक आहेतच. तेव्हा एकदा या हातातला तर एकदा त्या हातातला तुकडा कुरतडायला तिने सुरवात केली. त्यामुळे एकदा आणखी उंच तर एकदा ठेंगणी होत होत शेवटी ती एकदाची नेहमीइतकी उंच झाली.

हा नेहमीचा आकार तिला इतक्या वेळानंतर मिळालेला होता, की पहिल्या पहिल्यांदा तिला जरा विचित्रच वाटले. पण मग थोड्याच मिनिटांत तिला सवय झाली आणि मग नेहमीप्रमाणे तिने स्वताशी संवाद सुरू केला, "चला ! म्हणजे माझा निम्मा कार्यक्रम तर पार पडलाच. काय बाई तरी हे सगळे फेरबदल ! मी तर त्यामुळे गोंधळातच पडले. मी या क्षणाला अमूक आहे म्हणून पुढच्या क्षणाला तमूकच असेन, असं काही सांगता यायचं नाही. पण असो. आता रोजच्याएवढी तर झाले. आता त्या छानदार बागेत कसं शिरायचं ? तेवढं एकदा कळलं म्हणजे झालं !"

ती असे म्हणते आहे तोपर्यंत ती एका उघड्या जागेवर आली होती. तिथे मध्यभागी एक छोटेसे घर होते–चारच फूट उंच. "वा !" जाई म्हणाली, "आता पुन्हा ही नेहमीची उंची काय करायची ? या घरात जे कुणी राहात असेल, ते लहानसंच असणार. त्याच्यापुढे मी अशी गेले तर घाबरगुंडीच उडेल त्याची. ठीक, असं करावं—"

आणि असे म्हणून तिने उजव्या हातातला छत्रीचा तुकडा जरा चावला, आणखी चावला आणि ती जेव्हा अगदीच एवढीशी म्हणजे नऊ इंच उंच बनली, तेव्हाच त्या घराजवळ जाण्याचा धीर तिला झाला.

५

५

एकदोन मिनिटे जाई नुसती घराकडे पाहात उभी राहिली. आता पुढे काय करायचे, हे कुठे तिला सुचत होते! इतक्यात एक झकास कपडे घातलेला शिपाई (त्याचा तो लांब जरीचा आंगरखा, तिरकी पगडी नि हातातली सोन्याच्या मुठीची काठी गुंझंव पाहिल्यावर त्याला शिपाई म्हणावे, की चपरासी म्हणावे, की भालदार चोपदार म्हणावे; हा तिला प्रश्नच पडला. पण तिचे खरे मत विचाराल तर त्याचे तोंड होते माशासारखे.) जंगलातून धावत बाहेर आला आणि त्याने आपल्या बोटाच्या पेरांनी दरवाज्यावर टकटक केले. त्याबरोबर दुसऱ्या एका तशाच पोशाखातल्या शिपायाने (म्हणजे ही जोडी भालदार–चोपदार तर नव्हती?) दरवाजा उघडला. या शिपायाचे तोंड वाटोळे होते आणि डोळे बेडकासारखे बटबटीत मोठाले होते. याच्या हातात चांदीची मूठ असलेली काठी होती. हे सगळे आहे तरी काय प्रकरण, ते कळावे म्हणून जाई रानातून हळूच बाहेर आली आणि एका बाजूला उभी राहून लक्ष देऊ लागली.

पहिल्याने मासा-शिपाई पुढे आला आणि त्याने काखोटीला मारलेला एक जंगी लखोटा काढला. तो लखोटा जवळ जवळ त्याच्याएवढा मोठा होता. त्याने तो लखोटा बेडूक–शिपायाच्या हातात दिला आणि फार गंभीर सुरात म्हटले, "हे सरदारीणबाईंसाठी पत्र. राणी सरकारकडून चेंडू-दांडूच्या खेळाचं निमंत्रण." बेडूक शिपायाने ते घेतले आणि तीच वाक्ये पुन्हा तशाच गंभीर सुरात उच्चारली. फक्त इकडचे शब्द तिकडे केले. म्हणजे– "राणीसरकारचं पत्र. सरदारीणबाईंना चेंडूदांडूच्या खेळाचं निमंत्रण."

आणि मग दोघेही कंबरेपर्यंत खाली वाकले. त्यामुळे त्यांच्या पगड्यांची टोके एकमेकांना टेकली.

तो देखावा जाईला इतका गमतीदार वाटला की, तिला एकदम हसू कोसळले. आणि आपले हसणे त्यांना ऐकू जाऊ नये म्हणून ती घाईघाईने पुन्हा रानात पळाली.

पुन्हा जेव्हा तिने डोकावून पाहाण्याचा धीर केला, तेव्हा मासा– शिपाई निघून गेला होता आणि बेडूक– शिपाई आंगणातच बसून वर आकाशाकडे

बावळटासारखा पाहात होता.

जाई भीत भीत दरवाज्यापाशी गेली आणि तिने टकटक केले.



"दार ठोकण्यात काही अर्थ नाही." शिपाई बोलला. "याला कारणं दोन. एक तर तू नि मी दोघंही बाहेर आहोत. दुसरं असं, आत एवढा गलबला चालू आहे; की कुणाला ऐकू जाण्याचाही संभव नाही."

आणि खरोखरच आत भयंकर मोठी गडबड चालू होती. कुणी किंचाळत होते, कुणी शिंकत होते आणि सारखे काहीतरी आदळत होते नि फुटत

होते. किटल्या काय, बशा काय—तुकडे तुकडे होत असावेत !

"मग मला सांगा तरी—" जाई म्हणाली, "मी आत कशी जाऊ ?"

शिपाई जाईच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून पुढे म्हणतो, "तुझ्यात अन् माझ्यात दरवाजा असता नि मग तू ठोकलं असतंस, तर त्याला काही अर्थ होता. म्हणजे समज, तू जर आत असतीस अन् दार ठोकलं असतंस, तर मी उघडलं असतं नि तुला बाहेर सोडलं असतं."

हे सगळे बोलताना तो आकाशाकडेच पाहात होता. जाईला वाटले, याची रीतभात काही चांगली नाही. मग तीच स्वताला म्हणते, कदाचित्.... कदाचित् त्याचा नाइलाज होत असेल; कारण त्याचे डोळे मुळातच वर आहेत— **जवळ जवळ** डोक्यावर. तरी पण साधी प्रश्नांची उत्तरं द्यायला काय बिघडतं याचं ?

"काय हो, मी आत कशी जाऊ ?" ती मोठ्याने म्हणाली.

शिपाई म्हणाला, "मी इथे बसून राहीन...उद्यापर्यंत."

इतक्यात दरवाजा एकदम उघडला आणि एक मोठी थोरली बशी भिरभिरत आली. ती सरळ शिपायाच्या थोबाडावर आपटली आणि मग पलीकडे जाऊन एका झाडावर आपटून तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. शिपायाचे नाक जरा खरचटले.

पण तो आपला काही झालेच नाही असे दाखवीत पूर्वीच्याच आवाजात बोलत होता, "उद्यापर्यंतच का ? परवादेखील."

"मी आत कशी जाऊ ?" या खेपेस जाईने ओरडून विचारले.

"पण तुला आत जायचंच आहे का ?" शिपाई म्हणाला. "पहिला प्रश्न हा आहे. होय की नाही ?"

होय. ते खरे होते. पण असे कुणी आपल्याला सांगितलेले जाईला आवडले नाही. ती पुटपुटली, "ही मोठी पीडाच आहे. प्रत्येकजण आपला वाद घालायला लागतो. एखाद्याला वेड लागायचे यांचे वाद ऐकून !"

शिपायाला आपले मघाचे वाक्य जरा निराळे करून पुन्हा उच्चारायला ही संधी नामी वाटली असावी. तो म्हणाला, "मी इथेच बसून राहीन—खूप खूप खूप दिवस !"

"बरं रे बाबा ! पण मी काय करू ?" जाई म्हणाली.

“ तुला वाटेल ते ! ” शिपाई म्हणाला आणि चक्क शीळ वाजवीत बसला.

“ छे ! याच्याशी बोलण्यात काही अर्थ नाही. ” जाई स्वताला म्हणाली. “ हा मूर्खशिरोमणी आहे. ” आणि तिने स्वताच दरवाजा ढकलला आणि ती आत गेली.

आत एक मोठे सैपाकघर होते. त्यात या टोकापासून त्या टोकापर्यंत धूर कोंडलेला होता. खोलीच्या मधोमध एका तीन पायांच्या चौरंगावर सरदारीण-बाई बसल्या होत्या. त्यांच्या मांडीवर बाळ होते, त्याला त्या खेळवीत होत्या. सैपाकाची बाई चुलीजवळ बसली होती आणि कढईतले सांबार ढवळीत होती. कढई भयंकर मोठी होती आणि सांबाराने काठोकाठ भरलेली होती.

“ या सांबारात मिरपूड फार घातलेली दिसते ! ” जाई स्वताशी म्हणाली. तिला जबर शिंक येणार होती, पण तिने स्वताला सावरले होते.

खरोखरच हवेत मिऱ्याचा वास खूप दरवळला होता. सरदारीणबाईदेखील मधून मधून शिंकत होत्या. आणि बाळ मधूनच शिंकत होते तर मधूनच किंचाळत होते. त्या खोलीत न शिंकणारी अशी दोघेच होती. एक म्हणजे ती सैपाकीण, आणि दुसरे चुलीमागे बसलेले एक लठ्ठ मांजर. हे बोकोबा सारखे जिवणी ताणून हसत होते– या कानापासून त्या कानापर्यंत.

“ हे बघा–” जाई जरा भीत भीत म्हणाली. कारण यांची रीतभात काय असेल, याची तिला कल्पना नव्हती. आपण आधी बोलायचे की त्यांनी ? “ हे बघा, मला जरा एवढं सांगता का ? तुमचं ते मांजर असं तोंड फाकून हसतं कशाला ? ”

“ ते इराणी मांजर आहे. ” सरदारीणबाई म्हणाल्या. “ म्हणून.— डुक्कर ! ”

हा शेवटचा शब्द त्यांनी एवढ्या अचानक उच्चारला, की जाईने चमकून उडीच मारली. पण लगेच तिच्या लक्षात आले, की सरदारीणबाई ते बाळाला बोलल्या होत्या, आपल्याला नाही. तेव्हा जरा धीर येऊन ती पुढे म्हणाली, “ मला माहीत नव्हतं, की इराणी मांजरं हसतात. मांजरांना हसता येतं, हेच मला माहीत नव्हतं.”

“ सगळ्यांना येतं.” सरदारीणबाई म्हणाल्या. “ आणि बहुतेक सगळी हसतात देखील.”

"मला तरी अशी मांजरं माहीत नाहीत." जाई नम्रपणे म्हणाली. काही का असेना, संवाद सुरू झाला एवढ्यानेच तिला बरे वाटत होते.



"तुला आहे काय माहीत?" सरदारीणबाई म्हणाल्या. "फारच थोडी माहिती आहे तुला. खोटं नाही सांगत!"

सरदारणीच्या बोलण्याचा सूर जाईला मुळीच आवडला नाही. तिला वाटले, यापेक्षा आपण दुसऱ्याच एखाद्या विषयावर बोललो तर! आणि म्हणून ती दुसरा विषय आठवू लागली, तोच सैपाकीणबाईने चुलीवरचे भांडे उतरले आणि मग हाताशी येईल ती वस्तू घेऊन ती बया सरदारीणबाई-च्या नि त्यांच्या बाळाच्या अंगावर भिरकावू लागली. पहिल्याने कोळशाचा चिमटा आला, मग वाट्याताटल्या—फुलपात्रे आली, मग कपबशा— थडाथड, थडाथड! गारांचा पाऊस पडावा तसे! पण सरदारणीने तिकडे लक्षच दिले नाही. तिला भांडी लागली तरी तिने हूं की चूं केले नाही. बाळ तर काय,

आधीपासूनच किंचाळत होते. त्यामुळे त्याला लागत होते की नाही हे कळणे कठीण होते.

जाईला मात्र ते बघवेना. ती घाबरून जाऊन ताडदिशी उठली आणि ओरडली, "बाई! काय चालवलंय् तुम्ही हे?—संभाळा, संभाळा! बाप रे! त्याचं छानदार नाक उडालं की हो!" एक मोठी थोरली ताटली उडत उडत येऊन त्याच्या नाकाला घासून गेली होती. खरोखरच नाक उडाले नाही हे नशीबच म्हणायचे!

सरदारीणबाई गुरकावून म्हणाल्या, "प्रत्येकाने आपलं काम बरं नि आपण बरे असं ठरवलं तर किती चांगलं होईल. जगाचं गाडं जास्त भरभर चालेल, नाही का?"

"त्यात काही मोठासा फायदा नाही." जाईने ठोकून दिले. आपले ज्ञान दाखवण्याची संधी मिळाली म्हणून ती खुषीत आली होती. "जगाचं गाडं कसं फिरतं, माहीत आहे ना? पृथ्वी आपल्या आसाभोवती एकदा फिरायला चोवीस तास घेते. म्हणजे आमचं कऱ्हाड—"

"खरंच, कुऱ्हाडीवरून आठवण झाली." सरदारीणबाई म्हणाल्या. "आधी हिचं डोकं उडवा पाहू!"

जाईने घाबरून जाऊन सैपाकिणीकडे पाहिले. ती हा हुकूम ऐकून काही तरी करते की काय? पण ती आपली सांबार ढवळण्यात गर्क झाली होती. ती यांचे बोलणे ऐकतसुद्धा नसावी.

पुन्हा एकदा जाईने—आपले गाव तेवढे वगळून—बोलण्याचा धीर केला, "चोवीस तास घेते असं वाटतं हो मला. की बाराच तास लागतात? मी—"

"मी?" सरदारीणबाई म्हणाल्या. "अग, मला ते काही सांगू नकोस. ते आकडे म्हटले की माझं अगदी डोकं उठतं!" आणि असे म्हणून ती पुन्हा बाळाला डोलवू लागली. त्याला डोलवता डोलवता ती एक अंगाई-गीत म्हणत होती. गीत कसले? कुत्र्याचे भुंकणेच होते ते! आणि तिचे डोलवणे फार नाजूक पडले! त्यामुळे प्रत्येक ओळीच्या शेवटी बाळ दडादड गचके खात होते—

" बाळा भो भो रे ! खटियाळा ! शिंकायचा किति चाळा ?
आग्या वेताळा ! "

गाणे म्हणताना पुढे पुढे तर सरदारीणबाई सारख्या बाळाला जोरजोराने वर फेकीत होत्या नि झेलीत होत्या. आणि बिचारे बाळ मोठमोठ्याने किंचाळत होते. त्यामुळे जाईला त्यांतले शब्दसुद्धा धड ऐकू गेले नाहीत. फक्त 'भो भो रे'चे ध्रुपद सारखे कानांवर आदळत होते.

"हं—घे ! आता वाटलं तर तू खेळव जरा !" असे म्हणून सरदारीणबाईंनी मध्येच बाळाला जाईकडे फेकून दिले. "मला राणीसाहेबांकडे चेंडूदांडू खेळायला जायचं आहे. तयारी केली पाहिजे." आणि असे म्हणून त्या लगबगीने खोलीतून निघूनही गेल्या. त्या बाहेर पडताहेत तेवढ्यात सैपाकिणीने त्यांच्या अंगावर झारा फेकला; पण थोडक्यात नेम चुकल्यामुळे त्यांना तो लागला नाही.

जाईने बाळ झेलले, पण तिला जरासा त्रासच पडला. कारण बाळ म्हणजे और प्राणी होता. सर्व बाजूंनी त्याने हातपाय ताणलेले होते एखाद्या कोळ्यासारखे. जाईने त्याला झेलले, तेव्हा ते बिचारे एखाद्या वाफेच्या एंजिनासारखे फस्—फस् करीत होते, आणि सारखे आंग दुमडून काय घेत होते आणि ताणत काय होते ! त्यामुळे पहिल्याने एक दोन मिनिटे त्याला धरायला जाईला खूपच अडचण पडली.

त्याला खेळवायचे कसे हाही प्रश्नच होता. तो शेवटी जाईने सोडवला. (तिने त्याचे आंग पिरगळून त्याची पक्की गाठच मारली आणि मग त्याचा उजवा कान नि डावा पाय हे घट्ट पकडून ठेवले. आता काय बिशाद होती त्याची आंग उलगडण्याची ?) मग त्याला तिने उचलला आणि बाहेर मोकळ्या हवेत नेला.

जाईला वाटले, 'या मुलाला जर आपण आपल्याबरोबर नेले नाही, तर एक दोन दिवसांत हे लोक त्याचा जीव घेतील. त्याला मागे ठेवणं म्हणजे स्वतावर खुनाचा ठपका घेण्यासारखंच नाही का ?' शेवटचे शब्द ती मोठ्याने बोलली आणि त्याला उत्तर म्हणून बाळाने घसा खाकरला.

"असं खाकरू नये." जाई म्हणाली. "तुला काही सांगायचं असेल तर ते सांगायची ही रीत झाली का ?"

बाळ पुन्हा खाकरले. तेव्हा जाईला जरा काळजीच वाटली आणि 'याला झालंय् तरी काय?' म्हणून तिने त्याच्या तोंडाकडे निरखून पाहिले. त्याचे नकुटले फारच लहान होते हे खोटे नाही. लहानसे नि वर वळलेले होते ते; म्हणजे नाक म्हणण्यापेक्षा डुकराचा ओठ वाटत होता तो. तसेच त्याचे डोळे बारीक बारीक होत होते. लहान मुलाला बिलकूल शोभण्यासारखे नव्हते ते. एकंदरीत तो प्राणी जाईला मुळीच आवडला नाही. 'पण कदाचित्–' ती आपल्याशी म्हणाली, 'मघाशी त्याने नुसते हुंदकेच दिले असतील.' तिने पुन्हा एकदा त्याच्या डोळ्यांत निरखून पाहिले, अश्रू बिश्रू दिसतात की काय ते. पण छे! त्यांत एकही अश्रू नव्हता.

जाई जरा गंभीरपणेच म्हणाली, "हे बघ, बाळ! तू डुक्कर बिक्कर बनतो आहेस की काय? कारण तसं काही असेल तर मला तू अजिबात नकोस! ....हं हं....अरे?" पुन्हा बिचारे बाळ हुंदके द्यायला लागले, (किंवा खाकरायला लागले. काही म्हणा!) तरी जाई आपली त्याला घेऊन गपचीप चाललीच होती.

तिला आता असा प्रश्न पडला की, घरी जाऊन तरी या प्राण्याचे करणार काय? इतक्यात पुन्हा एकदा ते खाकरले. ते एवढ्या जोरात, की जाईने घाबरून जाऊन त्याच्या तोंडाकडे पाहिले.

संपलेच! या वेळी तर शंकेला जागाच नव्हती. बाळाचे आता पुरेपूर डुक्कर बनले होते. जाईने ठरवले, आता मात्र ही ब्याद आणखी पुढे नेण्यात अर्थ नाही. त्याला इथेच सोडून द्यावा हे बरे.

आणि तिने त्याला खाली सोडले. त्याबरोबर लगेच डुक्कर बाळ शेपटी हालवीत मुकाट्याने रानात निघून गेले आणि जाईला एकदाचे बरे वाटले. "त्याला जर मी वाढवलं असतं तर कसलं विद्रूप बाळ झालं असतं ते. पण आता कसं छान डुक्कर झालं आहे!"

आणि मग अशाच आणखी काही मुलांची नावे तिला आठवू लागली. ती पण मुले म्हणून रद्दी होती, पण डुकरे कशी छान शोभली असती. "त्यांना डुकरं बनवायची विद्या जर कुणाला सापडली—"

जाईच्या मनात असे विचार येत आहेत तोच थोड्या अंतरावर एका

झाडाच्या फांदीवर बसलेले इराणी मांजर तिला दिसले आणि ती चांगलीच दचकली.

" इराणी मन्या ! " ती जरा भीतभीतच बोलायला लागली. कारण हे



नाव त्या बोक्याला आवडेलच अशी काही खात्री नव्हती.

बोक्याने जेव्हा जाईला पाहिले, तेव्हा तो नुसताच हसला. जाई म्हणाली, ' हा स्वभावाने बरा दिसतो, बरं का ? '

पण त्याला खूपच लांब लांब नखे होती आणि दातही चिकार होते. तेव्हा याच्याशी जरा नमूनच वागायचे असे जाईने ठरवले.

पण बोक्याने आपली जिवणी आणखीच ताणली. जाई म्हणाली, "अरेच्या! अजून तरी हा खुषीत दिसतोय्—का हो! इथून मी कसं कसं जायचं ते सांगता का मला?"

बोका म्हणाला, "तुला जायचंय् कुठे ते सांग, म्हणजे सांगतो."

जाई म्हणाली, "तसं काही माझं ठरलेलं नाही. कुठे वाटेल तिथे!"

"तर मग—" बोका म्हणतो, "तूं कसं कसं जावंस हेही ठरलेलं नाही. वाटेल तशी जा, वाट फुटेल तिकडे!"

"ते खरं!" जाई म्हणाली, "पण कुठे तरी जाऊन पोचायला तर हवं."

"ते होईल!" बोका म्हणाला. "खूप खूप लांब चाल्लीस म्हणजे पोचशील कुठेतरी!"

हे काही खोटे नव्हते. तेव्हा जाईने दुसराच प्रश्न त्याला विचारला—

"इथे कोण लोक राहातात हो?"

"त्या तिकडच्या बाजूला—" बोका आपला उजवा पंजा फिरवीत म्हणाला, "एक टोपीवाला राहातो. आणि तिकडे त्या बाजूला एक ससा राहातो. त्यांतल्या वाटेल त्याच्याकडे जा तू. दोघांनाही वेड लागलेलं आहे."

जाई म्हणाली, "पण मला नाही बा जायचं वेड्या लोकांकडे."

"असं बोलून चालायचं नाही!" बोका म्हणाला. "आम्ही सारेच वेडपट आहोत. मी वेडा आहे. तू पण वेडी आहेस."

"तू कशावरून म्हणतोस, मी वेडी आहे म्हणून?"

"असलीच पाहिजेस!" बोका म्हणाला, "नाही तर इथे कशाला आली असतीस?"

जाईला वाटले, हे काही तरीच बोलणे आहे. पण ती आपली एवढेच म्हणाली, "बरं! आणि तू वेडा आहेस, हे कशावरून कळलं तुला?"

"त्याचं असं आहे," बोका म्हणाला, "तुला हे तर माहीत आहे ना, की कुत्रा वेडा नसतो?"

"बरं, मग?"

बोका म्हणाला, "आणि तुला हेही माहीत आहे, की कुत्रा रागावला की गुरगुरतो आणि खुषीत आला की शेपटी हालवतो. उलट माझं कसं

आहे? मी खुषीत आलो की गुरगुरतो आणि रागावलो की शेपटी हालवतो. याचा अर्थ मी वेडा आहे."

"ते काही गुरगुरणं नाही. ते फुरफुरणं!" जाई म्हणाली.

"तू त्याला काय वाटेल ते नाव दे—" बोका म्हणाला. "काय ग, आज तू राणीसाहेबांबरोबर चेंडूदांडू खेळणार आहेस?"

"खेळावंसं वाटतंय मला," जाई म्हणाली, "पण मला अजून बोलावणं कुठे आलंय्?"

"तिथे भेटेन मी तुला!" बोकोबा म्हणाले आणि एकदम दिसेनासे झाले.

जाईला फारसे नवल वाटले नाही. कारण विचित्र गोष्टींची तिला सवयच होत चालली होती. पण ज्या जागेवर ते मांजर इतका वेळ होते तिकडे ती सहज पाहात होती, तो ते आपले एकदम पुन्हा प्रगट झाले.

"खरंच—" बोका म्हणाला, "त्या बाळाचं काय झालं? मी विचारायचं विसरलोच."

"त्याचं डुकर झालं!" जाई सहज बोलून गेली. जसे काही मुलाचे डुक्कर होणे ही रोजचीच गोष्ट होती.

"मला वाटलंच होतं!" बोका म्हणाला आणि परत दिसेनासा झाला.

थोडा वेळ जाईने वाट पाहिली. हो, त्याचा काय नेम! पुन्हा प्रगट व्हायचा! पण पुन्हा काही तो आला नाही. तेव्हा एकदोन मिनिटांनी ती चालायला लागली. शिमग्यातला ससा जिकडे राहातो म्हणून बोक्याने सांगितले होते, तिकडेच निघाली जाई. 'कारण—' ती म्हणाली, 'मी टोपीवाले पुष्कळ पाहिले आहेत. पण शिमग्यातला ससा बघायला गंमत वाटेल मला. आणि पुन्हा शिमग्याला अजून अवकाश आहे. तेव्हा अजून तो तितकासा वेडा नसेल झालेला.'

आणि हे बोलत असताना तिने वर बघितले. तो एका झाडाच्या फांदीवर इराणी बोका पुन्हा हजर!

"तू डुक्कर म्हणालीस, की शक्कर म्हणालीस?" बोक्याने विचारले.

"डुक्कर. पण तू असा एकसारखा गडप होतोस नि पुन्हा उपटतोस, हे काही चांगलं नाही. अशी टक्कर दिलीस की मला चक्कर येते."

"बरंय्— बरंय्!" बोका म्हणाला. आणि या खेपेस तो एकदम गडप

झाला नाही; हळूहळू गेला. शेपटीच्या टोकापासून गडप व्हायला सुरवात झाली, आणि सर्वांत शेवटी त्याचे हसू गडप झाले. म्हणजे सबंध बोका नाहीसा झाला, तरी ते हसू किती तरी वेळ झाडावर लटकत होते.

जाई म्हणाली, 'ज्यांना हसूच माहीत नाही, असले बोके मी किती तरी पाहिलेले आहेत. पण ज्याला बोकाच नाही, असलं हसू हे पहिल्यानेच बघते आहे! जन्मात असला चमत्कार मी पाहिलेला नाही.'

आणखी फारसे अंतर चालून गेली नाही तोच जाईला, शिमग्यातल्या सशाचे घर दिसले. हेच ते घर असावे, हे जाईने कसे ओळखले? कारण घराची धुराडी होती ती कानांच्या आकाराची होती, आणि घराचे छप्पर लोकरीने शाकारलेले होते. घर एवढे मोठे होते, की जाईला एकदम जवळ जायची छाती झाली नाही. अगोदर तिने डाव्या हातातला छत्रीचा तुकडा थोडा चावला. तेव्हा तिची दोन फूट उंची वाढली. आणि तरीसुद्धा ती जरा भीत भीतच घराजवळ गेली. ती स्वताशी म्हणत होती, 'पण– पण त्याला वेडाचा भयंकर झटका तर नसेल आलेला? छे बाई! यापेक्षा टोपीवाल्या-कडे गेले असते तरी बरं झालं असतं!'

# ६

घराच्या समोरच एका झाडाखाली टेबल मांडले होते आणि तिथे शिमग्यातला ससा नि टोपीवाला वेडा यांचे चहापान चालले होते. दोघांच्या मधल्या जागेवर एक रानउंदीर गाढ झोपी गेला होता आणि हे दोघे खुशाल त्याचा उशीसारखा उपयोग करीत होते. मध्येच त्याच्या अंगावर ते आपली कोपरे टेकीत आणि त्याच्या डोक्यावरून एकमेकांशी बोलत.

'बिचारा उंदीर!' जाई आपल्याशी म्हणाली. 'किती त्रास होत असेल त्याला. तरी झोपेत आहे, तेव्हा इतकं वाटत नसेल!'

टेबल खूपच मोठे होते आणि तरी ते तिघे एका कोपऱ्यापाशीच गर्दी करून बसले होते. जाई दिसल्याबरोबर त्यांनी एकदम "जागा नाही! जागा नाही!" म्हणून गिल्ला सुरू केला.

जाई रागावून म्हणाली, "जागा काय नाही? कित्तीतरी जागा आहे!" आणि असे म्हणून टेबलाच्या दुसऱ्या टोकाला एक मोठी खुर्ची होती, तिच्यावर ती बसली.

"घ्या, थोडं सरबत घ्या!" शिमग्यातला ससा आग्रहाने म्हणाला.

जाईने टेबलावर सगळीकडे पाहिले, पण तिथे फक्त चहाचे सामान मांडलेले होते.

"मला तर इथे सरबत दिसत नाही?" ती म्हणाली.

"नाहीच आहे मुळी!" शिमग्यातला ससा बोलला.

"मग 'सरबत घ्या' कशाला म्हटलंत?" जाई रागारागाने म्हणते. "हा काय सभ्यपणा झाला वाटतं?"

"तू इथे बोलावल्याशिवाय येऊन बसलीस, हा तरी सभ्यपणा झाला वाटतं?" सशाने टोला दिला.

"मला माहीत नव्हतं, हे **तुमचं** टेबल आहे म्हणून." जाई म्हणाली. तुम्ही तिघे आहात अन् इथे तर किती तरी खुर्च्या मांडलेल्या दिसतात."

टोपीवाला वेडा बराच वेळ जाईकडे मोठ्या चौकसपणाने पाहात होता. तो आता पहिलेच वाक्य बोलला—

"तुझे केस विस्कटलेत."

आता मात्र जाई खूप गरम झाली आणि म्हणाली, " एखाद्याच्या रूपावरून टीका करणं चांगलं नाही. याला उद्धटपणा म्हणतात." हे ऐकून टोपीवाल्या वेड्याने आपले डोळे खूप विस्फारले. पण तो एवढेच म्हणाला, " कावळा आणि घडवंची यांत काय सारखेपणा आहे ? "

' हं, हे बरं झालं ! ' जाई आपल्याशी म्हणाली. ' हे कोडीबिडी वाल्गार असतील तर गंमत येईल. ' आणि मग तिने मोठ्याने म्हटले, " मला येईल हे ओळखता ! "

" म्हणजे तुला याचं उत्तर सांगता येईल असं म्हणायचंय् ? " शिमग्यातल्या सशाने विचारले.

" होय. अर्थातच ! " जाई म्हणाली.

" मग तुला जे म्हणायचं असेल, तेच का बोलत नाहीस ? "

" बोलते की ! " जाई लगेच म्हणाली. " किंवा— किंवा असं म्हणा वाटलं तर, की मी जे बोलते, तेच मला म्हणायचं असतं. एकूण एकच, नाही का ? "

" मुळीच नाही ! " टोपीवाला वेडा चटकन् म्हणतो, " तसं असेल तर, उद्या एखादा असंही म्हणेल, की ' मी जे जे खातो, ते ते बघतो ' म्हटलं काय अन् ' मी जे जे बघतो, ते ते खातो ' म्हटलं काय, सारखंच. "

" उद्या एखादा असंही म्हणेल," शिमग्यातल्या सशाने टेकू दिला, " की ' मला जे जे मिळतं, ते ते आवडतं ' म्हटलं काय अन् ' मला जे जे आवडतं, ते ते मिळतं ' म्हटलं काय, सारखंच. "

" उद्या एखादा असंही म्हणेल, " रानउंदीर मध्येच म्हणतो, ( बहुतकरून तो झोपेत बोलत असावा ) " की ' मी झोपलेला असतो, तेव्हा श्वास घेत असतो ' म्हटलं काय अन् ' मी श्वास घेतो, तेव्हा झोपलेला असतो ' म्हटलं काय, सारखंच. "

" तुझ्या बाबतीत ते सारखंच आहे. " टोपीवाला म्हणाला आणि मग संभाषण तिथेच संपले. सर्व मंडळी मिनिटभर गप्प बसली. तेवढ्या वेळात जाईने ' कावळा ' आणि ' घडवंची ' यांच्याबद्दल जे जे काही आठवण्यासारखे होते तेवढे आठवायचा प्रयत्न केला. पण असे विशेष काही नव्हतेच. घडवंची म्हणजे सामान ठेवायचे एक स्टूल खरे. पण...पण....

बराच वेळ सगळे शांत होते. मग टोपीवाला वेडा पहिल्याने बोलला. जाईकडे वळून त्याने विचारले, "महिन्याचा कितवा दिवस आहे हा?" त्याने आपले घड्याळ खिशातून बाहेर काढले होते आणि सचिंतपणे त्याच्याकडे पाहात होता; मधून मधून ते तो हालवत होता आणि कानाशी धरत होता.

'म्हणजे याला तारीख हवी आहे!' जाई स्वताशी म्हणाली. आणि जरा विचार केल्यावर तिने सांगितले, "चौथा दिवस."

"म्हणजे दोन दिवसांची चूक आहे म्हणायची!" टोपीवाल्याने एक उसासा सोडला आणि शिमग्यातल्या सशाकडे रागारागाने पाहात म्हटले, "तुला सांगितलं नव्हतं मी, लोण्याने ते आणखी बिघडेल?"

शिमग्यातला ससा गरिबीने म्हणाला, "पण ते **साजूक** लोणी होतं."

"असेल," टोपीवाला कुरकुरत म्हणाला, "पण त्यात पावाचे कण बीण गेले असतील. पाव कापायच्या सुरीने का लोणी लावलंस?"

शिमग्यातल्या सशाने घड्याळ आपल्या हातात घेतले आणि खिन्न नजरेने त्याच्याकडे पाहिले. मग त्याने ते आपल्या चहाच्या कपात बुडवले आणि पुन्हा एकदा पाहिले. पण एवढे करूनही त्याला जास्त काही सांगायचे सुचेना. तो पुन्हा म्हणाला, "पण ते **साजूक** लोणी होतं."

जाईला त्या घड्याळाची फार गंमत वाटली आणि सशाच्या खांद्यावरून ती डोकावून पाहायला लागली.

"काय मजेदार घड्याळ आहे!" ती म्हणाली. "महिन्याचा दिवस ते सांगतं, पण वाजले किती ते मात्र त्याला सांगता येत नाही!"

"काय म्हणून सांगेल?" टोपीवाला बोलला. "तुझं घड्याळ तुला वर्ष कोणतं ते सांगतं का?"

"अर्थात् नाही!" जाई म्हणाली. "पण त्याचं कारण असं, की वर्ष फार मोठं असतं—किती तरी दिवस तेच वर्ष असतं."

"मग माझ्या घड्याळाचंही तसंच आहे!" टोपीवाल्याने उत्तर दिले.

त्या उत्तरामुळे जाई खूप गोंधळली. टोपीवाल्याच्या उत्तराला काही अर्थच नव्हता. पण तसे पाहिले तर ते शुद्ध मराठी वाक्य होते. मग असं का व्हावं?

तिने त्यालाच नम्रपणे सुचवले, "हे बघा, तुम्ही काय बोलताय् ते मला

 जाईची

नीटसं कळत नाही."

"पुन्हा झोपला हा रानउंदीर!" टोपीवाला म्हणाला आणि त्याने किटलीतून थोडा गरम गरम चहा त्याच्या नाकावर ओतला.

हा प्रकार पाहून जाई चमकून उभी राहिली आणि जरा मागे सरून तिने खुर्चीच्या पाठीवर हात टेकले.

उंदराने पटकन् आपले डोके हालवले; पण डोळे न उघडता तो म्हणतो, "अर्थात्-अर्थात्! मीसुद्धा तेच म्हणणार होतो."

टोपीवाला पुन्हा जाईकडे वळून म्हणाला, "कोडं सुटलं की नाही तुला?"

"नाही बाई!" ती म्हणाली, "मी हरले! सांगा पाहू तुम्हीच उत्तर!" आणि असे म्हणून ती पुन्हा खुर्चीवर येऊन बसली.

"मला तरी कुठे माहीत आहे? अगदी रामा शिवा गोविंदा!" टोपीवाला म्हणाला.

आणि शिमग्यातला ससा म्हणाला, "मलादेखील अजिबात माहीत नाही!"

या आचरटपणाला जाई कंटाळली होती. ती म्हणाली, "ज्यांची उत्तरं-सुद्धा माहीत नाहीत, असली कोडी घालत बसण्यापेक्षा तुम्ही वेळेचा निराळा उपयोग का करत नाही?"

"**वेळेचा** उपयोग?" टोपीवाला म्हणाला. "की **वेळाचा** उपयोग? वेळ बाई नाही, पुरुष आहे, हे माहीत नाही वाटतं तुला?"

"काय बोलताय् तुम्ही, तुमचं तुम्हांला तरी समजतं का?"

"अर्थात्!" टोपीवाला मान उडवून म्हणाला. "तुला मात्र समजत नाही! मला नाही वाटत तू कधी काळाशी म्हणजे **वेळाशी** बोलली आहेससं—"

जाई स्वताशी म्हणते, 'खरंच! वेळ स्त्रीलिंगी की पुल्लिंगी? काळ आला पण वेळ आली नाही म्हणतात! पण काळ म्हणजेच वेळ अन् वेळ म्हणजेच काळ! मग काळ का पुल्लिंगी अन् वेळ का....'

"काळाशी जर तू दोस्ती करून घेतलीस," टोपीवाला बडबडत होता, "तर तो तुझ्यासाठी काय वाटेल ते करील. म्हणजे समज, सकाळचे नऊ वाजले आहेत. अभ्यासाला बसायची वेळ झाली आहे. तू काळाला नुसतं

हळूच खुणेनं सांगायचं, की चाललं घड्याळ भराभर पुढं. साडेबारा वाजले—जेवायची वेळ!"

(शिमग्यातला ससा पुटपुटला, 'खरोखरच ही जेवायची वेळ असती तर?')

जाई म्हणाली, "असं असेल तर फार मजा होईल खरी! पण नुसते घड्याळात साडेबारा वाजवून मला भूक थोडीच लागणार आहे!"

"एकदम नाही लागायची," टोपीवाला म्हणाला, "पण घड्याळात तसेच खूप खूप वेळ साडेबारा ठेवले की लागेल."

"**तुम्ही** असंच करता वाटतं?" जाईने विचारले.

टोपीवाल्याने रडवे तोंड करून मान हालवली.

"**मी** नाही." तो म्हणाला, "गेल्या शिमग्यात हा नि मी भांडलो, (हे सांगताना त्याने सशाकडे चमच्याचे टोक केले होते.)—म्हणजे याचं डोकं फिरायच्या **जरा** आधी. बदामच्या राणीने मोठा जलसा केला होता. जलशात मी पण गायलो—

उंद्रोबा, उंद्रोबा, भागलास का?
चहाच्या किटलीत लपलास का?

तुला माहीत आहे ना हे गाणं?"

"असंच काही तरी ऐकलेलं आहे खरं मी... " जाईने सांगितले.

"तेच!" टोपीवाला म्हणाला. "पुढच्या ओळी अशा आहेत—

चहाची किटली खडबडीत
मामा होता गडबडीत!"

या ठिकाणी रानउंदराने आपले आंग झाडले आणि तोही झोपेत गायला लागला—

"मामा होता गडबडीत!
गडबडीत– गडबडीत– गडब– डीत!"

आणि मग तो इतका वेळ तेच तेच घोळत बसला, की शेवटी त्यांनी त्याला चिमटे काढून गप्प बसवले.

"पुढे ऐक." टोपीवाला म्हणतो. "मी गाण्याचं पहिलं कडवं म्हटलं न म्हटलं, तो राणी ताडदिशी उभी राहिली आणि म्हणते, "काळाचा खून

करतोय् हा! पकडा– पकडा त्याला! उडवा त्याचं डोकं!"

"काय ग बाई तरी दुष्टपणा!" जाई म्हणाली.



"आणि तेव्हापासून–" टोपीवाला म्हणतो, "काळाचं नि माझं वाकडं! तो माझ्यासाठी इकडची काडी तिकडे करीत नाही. आमच्याकडे सारखे चार वाजलेले असतात!"

जाईच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. "अस्सं– अस्सं–" ती म्हणाली. "म्हणून एवढी चहाची भांडी मांडली होय इथे?"

“ हो ना ! ” टोपीवाला एक सुस्कारा सोडून म्हणतो. “ सारखेच चार वाजलेले. सारखंच मुळी चहापान ! आम्हांला कपबशा धुवायलाही वेळ मिळत नाही. ”

“ मग तुम्ही काय करता ? जागा बदलत राहता ? ” जाईने विचारले.

“ हो ना ! ” टोपीवाला म्हणाला. “ एक कपबशी खराब झाली की सरक पुढे, दुसरी घे— असं करतो आम्ही. ”

“ पण सबंध टेबल फिरून झालं अन् परत पहिल्या जागी आलात, की काय करता तुम्ही ? ”

या ठिकाणी शिमग्यातल्या सशाने एक भली मोठी जांभई दिली आणि म्हटले, “ आपण हा विषय बदलू या का ? मला तर कंटाळा आला ! माझी अशी सूचना आहे, की या मुलीने आपल्याला एक गोष्ट सांगावी. ”

“ बाप रे ! ” जाई घाबरून म्हणाली, “ मला नाही हो गोष्ट बिष्ट येत. ”

“ बरं तर मग.... ” दोघेही एकदम ओरडले. “आपला रानउंदीरच सांगेल गोष्ट. ऊठ रे, उंदरा, ऊठ ! ” आणि असे म्हणून त्याला दोघांनी दोन बाजूंनी चिमटे घेतले.

रानउंदराने हळूहळू डोळे उघडले आणि तो खोल गेलेल्या घोगऱ्या आवाजात म्हणाला, “ मी काही झोपलो नव्हतो. तुम्ही लोक बोलत होता, ते शब्दन् शब्द ऐकलं मी ! ”

“ आम्हांला गोष्ट सांग ! ” शिमग्यातला ससा म्हणाला.

“ खरंच सांग ! ” जाईनेही त्याला टेकू दिला.

“ आणि हे बघ, ” टोपीवाला म्हणाला, “ ताबडतोब सुरू कर. नाही तर तेवढ्यात पुन्हा झोपशील ! ”

“ आटपाट नगर होतं... ” रानउंदीर गडबडीने सांगायला लागला, “ तिथे होत्या तीन लहान मुली. एकीचं नाव सखी, दुसरीचं नाव मिकी, तिसरीचं नाव चिकी. त्या तिघी विहिरीच्या तळाशी राहात असत—”

“ आं ? ” जाई मध्येच म्हणाली, “ आणि त्या खायच्या काय ? ” खाण्यापिण्याच्या गोष्टीत जाईला नेहमीच गोडी वाटायची.

रानउंदराने एकदोन मिनिटे विचार केला आणि म्हटले, “ काकवी खात असत. ”

“ नुसती काकवी कशी खातील ? ” जाईने शांतपणे विचारले. “ आजारी पडल्या असत्या.”

“ मग पडल्याच की ! ” रानउंदीर म्हणाला, “ खूप आजारी पडल्या.”

हे विहिरीच्या तळाशी राहाणे नि सारखे काकवी पिऊन आजारी पडणे म्हणजे जाईला अगदीच चमत्कारिक वाटले. ‘ त्यांच्या जागी मी असते तर ? ’ ती आपल्याशी म्हणाली. पण छे ! तिला कल्पनाच करता येईना.

शेवटी तिने विचारलेच, “ पण त्या विहिरीच्या तळाशी का राहात होत्या ? ”

शिमग्यातला ससा तिला प्रेमळपणे म्हणाला, “ आणखी थोडा चहा पी ना ! ”

“ आणखी थोडा ? ” जाई जरा रागीटपणे म्हणाली, “ मी अजून प्यालेच नाही आहे, तर जास्त कसा पिणार ? ”

“ म्हणजे ? ” टोपीवाला म्हणतो, “ तुला ‘ कमी कसा पिणार ? ’ असं म्हणायचंय् का ? तू जर मुळीच प्यालेली नाहीस, तर थोडा जास्त पिऊ शकतील; पण ‘ मुळीच नाही ’ पेक्षा कमी कसा पिणार ? ”

“ **तुझं** मत कोणी विचारलं नव्हतं, माकडा ! ” जाई फणकाऱ्याने म्हणाली.

“ आता कोण टीका करतंय्—रूपावरून ? ” टोपीवाल्याने मोठ्या तोऱ्यात विचारले.

त्याला काय उत्तर द्यायचे हे जाईला समजेना. तेव्हा तिने आपला थोडासा चहा ओतून घेतला आणि पावाच्या एका फाकीला लोणी लावून ती रानउंदराकडे वळली आणि पुन्हा मघाचा प्रश्न तिने विचारला, “ त्या विहिरीच्या तळाशी कशाला राहात ? ”

रानउंदराने एकदोन मिनिटे विचार केला आणि ठोकून दिले, “ ती काकवीची विहीर होती.”

“ काकवीची विहीर नसतेच कधी ! ” जाई संतापून बोलणार होती. पण त्याच वेळी टोपीवाला आणि शिमग्यातला ससा यांनी एकदम ‘ श्यू—’ केले आणि रानउंदीर तिरसटपणे म्हणाला, “ तुझ्यात एवढासुद्धा सभ्यपणा नसेल तर तूच का नाही गोष्ट पुरी करत ? ”

" नाही, नाही ! चुकले ! " जाई बिचारी नम्रपणे म्हणाली. " पुन्हा नाही गोष्टीत अडथळा आणणार. **एखादी** विहीर असेलही काकवीची. मी नाही म्हणत नाही."

" **एखादी** म्हणे ! " रानउंदीर पुन्हा उखडला. पण गोष्ट पुढे सांगायचे त्याने एकदाचे कबूल केले—

" तशी काय झालं—या तिघी बहिणी होत्या ना, त्या काढायला शिकत होत्या—"

" काय काढायला शिकत होत्या ? " जाईने मध्येच विचारले. इतक्या लवकर आपले वचन ती विसरली !

" काकवी काढायला ! " रानउंदराने पटकन् सांगितले. या वेळेस त्याने विचारसुद्धा केला नाही.

टोपीवाल्याने मध्येच तक्रार केली, " मला स्वच्छ कप हवा. सरका एकेक जण ! "

आणि हे बोलतानाच तो एक जागा सरकला. तेव्हा रानउंदराने त्याची जागा घेतली. शिमग्यातला ससा उंदराच्या जागेवर बसला आणि सशाची जागा बिचाऱ्या जाईच्या वाट्याला आली. यात फायदा फक्त टोपीवाल्याचा झाला. जाईचा तर तोटाच जास्त झाला; कारण शिमग्यातल्या सशाने आपल्या जागेवर दुधाचे भांडे उपडे करून ठेवले होते.

रानउंदराला पुन्हा राग बीग येऊ नये म्हणून जाईने जपून विचारले, " पण मला हे नीटसं कळलं नाही. त्या काकवी कुठून काढत असत ? "

" पाण्याच्या विहिरीतून जसं पाणी काढतात, " टोपीवाला म्हणाला, " तशीच काकवीच्या विहिरीतून काकवी काढायची, एवढंही समजू नये ?— मूर्ख ! "

जाईने त्याचा तो शेवटचा शब्द न ऐकल्यासारखे केले आणि रानउंदराला विचारले, " पण विहिरीच्या आतच होत्या ना त्या ? "

" अर्थात् ! " रानउंदीर म्हणतो, " आताच्या विहिरीत. "

या उत्तरामुळे जाई आणखीच बुचकळ्यात पडली. तिला हे कळेना, की त्या तिघी जर ' तेव्हा ' राहात होत्या तर विहीर ' आताची ' कशी असेल ? या घोटाळ्यातून वाट निघेना, तेव्हा तिने असे ठरवले, की रानउंदराला काय

सांगायचे असेल ते सांगू द्या. आपण मध्ये बोलू नये हेच चांगले.

रानउंदीर पुढे म्हणाला, "त्या काढायला शिकत होत्या." पण हे बोलता बोलताच त्याला झोप येऊ लागली, तेव्हा डोळे चोळीत आणि जांभया देत तो पुढे म्हणाला, "आणि काय काय काढायच्या त्या! पण सगळ्या 'च'पासून सुरू होणाऱ्या जिनसा—"

"'च'च्याच काय म्हणून?" जाईने विचारले.

"काय म्हणून नाही?" शिमग्यातल्या सशाने उलट विचारले. आणि जाई गप्प बसली.

इकडे उंदराने डोळे मिटलेही होते; आणि तो पुन्हा पेंगायला लागला होता. पण पुन्हा जेव्हा दोन्ही बाजूंनी चिमटे बसले, तेव्हा तो मोठ्याने किंचाळत जागा झाला आणि म्हणाला, 'सगळ्या 'च'पासून सुरू होणाऱ्या गोष्टी. जसे : चिचुंद्री, चंबू, चिंच, चंद्र, चांदण्या, चेंगटपणा. चेंगटपणाचं चित्र काढलेलं पाहिलं आहेस तू कधी?"

"नाही बा!" जाई गोंधळून म्हणाली. "मला नाही वाटत—"

"वाटत नाही, तर बोलतेस कशाला?" टोपीवाल्याने फाडकन् विचारले.

हा उर्मटपणा मात्र जाईला आवडला नाही. आतापर्यंत तिने कशी तरी कळ सोसली होती. आता ती वाकडे तोंड करून उठली आणि मुकाट्याने चालती झाली. त्याच वेळी रानउंदीर गाढ झोपी गेला आणि जाईने जाता जाता एकदोनदा मागे वळून पाहिले. (तिला वाटत होते, की हे आपल्याला बोलावतील.) पण त्या दोघा वेड्यांनी तिच्याकडे लक्षही दिले नाही. पुन्हा एकदा शेवटचे म्हणून तिने वळून बघितले, तर ते दोघे रानउंदराला किटलीत कोंबत होते.

"माझं तरी कुठे अडलंय् डाव्या पायाचं खेटर!" जाई जंगलातून वाट काढताना म्हणाली, "पुन्हा बोलावलंत तरी यायची नाही मी! असले महामूर्ख चहाबाज मी साऱ्या जगात पाहिलेले नाहीत!"

ती एवढे बोलते आहे, तोच तिला वाटेत एक झाड दिसले. त्याला खरो-खरीचा दरवाजा होता.

'विचित्रच आहे!' ती स्वताशी म्हणाली. 'पण आज सगळंच विचित्र आहे. जाऊन पाहावंच आत.'

आणि असे म्हणून ती त्या दारातून झाडात शिरली.

पाहाते, तो पुन्हा एकदा आपण एका जंगी दालनात आलो आहो—



दालनात इतकंच नाही, तर त्या काचेच्या मेजाजवळ.

जाई म्हणाली, 'या खेपेस मी चुकायची नाही.'

आणि तिने ती सोनेरी किल्ली काढून घेतली, किल्लीने तो छोटा दरवाजा उघडला; आणि मग कावळ्याच्या छत्रीचा तुकडा परत थोडा चावला. (खिशातच ठेवला होता तो तिने.) लगेच तिची उंची कमी कमी होत ती एक फूट उंच झाली. मग त्या चिंचोळ्या बोळात तिला शिरता आले. बोळातून जात जात ती त्या सुंदर बगिच्यात पोचली. तिथे जिकडे तिकडे फुलझाडांचे सुरेख ताटवे होते आणि कारंज्यांतून थंडगार पाणी उडत होते.

# ७

बागेच्या फाटकाशीच एक मोठे गुलाबाचे झाड होते. त्याला पांढरी फुले लागलेली होती. पण त्यांना तांबडा रंग फासण्यात तीन माळी गर्क झाले होते. जाईला हे फारच विचित्र वाटले आणि ते नीट दिसावे म्हणून ती त्यांच्या आणखी जवळ गेली.

ती जवळ पोचली, त्याच वेळी त्यांच्यातला एक जण दुसऱ्याला म्हणत होता, "तुझं लक्ष कुठे आहे, पंज्या? माझ्या अंगावर रंग उडवलास की!"

पंज्या तिरसट सुरात म्हणाला, "मी काय करणार? सत्त्याने माझ्या कोपराला धक्का दिला."

त्याबरोबर सत्त्याने वर पाहिले आणि म्हणतो, "हे चांगलं आहे, पंज्या! दर वेळी तू आपला दुसऱ्यावर ढकल."

पंज्या म्हणाला, "एक शब्द बोलू नकोस. कालच राणीसाहेब म्हणत होत्या, की सत्त्याचं डोकं छाटलं पाहिजे."

"का म्हणून?" पहिल्यांदा जो बोलला होता, त्याने विचारले.

"तुझा यात काय संबंध आहे, छक्क्या? तू गप्प बैस." सत्त्या ओरडला.

"होय, त्याचा संबंध आहे!" पंज्या म्हणाला. "आणि मी त्याला सांगणार सगळं—सैपाकासाठी कांदे आणायचे सोडून बटाटे आणले म्हणून ह्या राणीसाहेबांचा राग आहे! डोक्यात येईल ते आणतो मुळी!"


सत्त्याने कुंचला खाली टाकला आणि म्हणतो, "असं आहे काय? माझ्यावर खोटानाटा—" पण तो एवढे बोलतो आहे तोच त्याची नजर जाईकडे गेली आणि तो एकदम थांबला. जाई आपली त्यांच्याकडे पाहात उभी होती.

सत्त्याने पाहिल्यावर पंज्याचे नि छक्क्याचेही तिच्याकडे लक्ष गेले. आणि सर्वांनी एकदम खाली वाकून जाईचे स्वागत केले.

जाई जरा भीत भीत म्हणाली, "मला एवढं सांगता का?—हे गुलाब रंगवताय् कशाला तुम्ही?"

पंज्या नि सत्त्या काही बोलले नाहीत. त्यांनी छक्क्याकडे पाहिले. छक्का अगदी हलक्या आवाजात म्हणाला, "खरी गोष्ट अशी आहे, ताई—हे

झाड तांबड्या गुलाबाचंच असायला पाहिजे. आम्ही चुकून त्याला पांढरा चुना फासला. राणीसाहेबांना हे कळलं तर त्या आमची डोकी उडवतील. तेव्हा त्या यायच्या आत—"



इतक्यात काय झाले, पंज्या बागेत चहूकडे घाबऱ्या घुबऱ्या पाहात होता, तो एकाएकी ओरडला, "राणीसरकार—राणीसरकार !"

लगेच तिघेही माळी धाडदिशी भुईसपाट पडले. पुष्कळशा पावलांचा

आवाज झाला, तशी जाईने राणीसाहेबांना पाहण्यासाठी चटकन् मान वळवली.

अगोदर दहा सैनिक हातांत दंडुके घेऊन आले. ते सर्व या माळ्यांसारखेच होते— लांबट आणि चपटे. त्यांचे हात नू पाय कोपऱ्याला होते. नंतर दरबारी लोक आले. त्यांचे पोशाख हिऱ्यांनी मढवलेले होते आणि ते सर्वजण जोडीजोडीने चालत होते—त्या सैनिकांप्रमाणेच. त्यांच्या मागून राजपुत्र नि राजकन्या आली. हे बाबालोक एकंदर दहा होते, आणि ते हातांत हात घालून जोडीजोडीने, उड्या मारीत नि गाणी गात मजेने येत होते. त्यांचे कपडे बदामांनी मढवलेले होते. नंतर पाहुण्यांच्या स्वाऱ्या आल्या. पाहुण्यांतले बहुतेक पुरुष राजे आणि बहुतेक बायका राण्या होत्या. त्यांच्यात जाईच्या ओळखीचा पांढरा ससा होता. तो बावरल्यासारखा घाईघाईने काही तरी बडबडत होता. जाईकडे त्याने पाहिलेही नाही; तसाच निघून गेला. त्याच्या मागे बदामचा गुड्डू आला. त्याने एक तबक हातात धरले होते आणि तबकात लाल मखमालीच्या रुमालावर राजाचा मुकुट ठेवलेला होता. त्याच्या पाठोपाठ, या बादशाही मिरवणुकीच्या शेवटच्या टोकाला सरकारस्वाऱ्या चालत होते— बदामचा राजा आणि बदामची राणी.

एकदा जाईच्या मनात आले, या माळ्यांप्रमाणे आपणदेखील जमिनीवर सपाट पडलं पाहिजे की काय? पण मिरवणुकीचा असा नियम असतो, असे काही तिने कधी ऐकलेले नव्हते. 'आणि पुन्हा—' ती आपल्याशी म्हणाली, 'मिरवणूक जवळ आली की जमिनीला नाक लावून खाली पडायचं याला काही अर्थ आहे का? मग लोकांनी मिरवणूक पाहायची कशी? आणि मिरवणूक पाहायची नसेल तर तिचा उपयोग काय?'

तेव्हा ती आपली होती तिथेच उभी राहिली.

मिरवणूक जाईच्या अगदी जवळ आली, तव्हा ती सर्वजण थांबली; आणि राणीने कठोर आवाजात विचारले, "ही कोण?"

तिने ते बदामच्या गुड्डूला विचारले होते, पण तो गुलामाचा नुसता कंबरेपर्यंत खाली वाकला आणि हसला.

"मूर्ख नाही तर!" राणीसाहेब चिडून मान उडवीत म्हणाल्या; आणि जाईकडे वळून त्यांनी विचारले, "तुझं नाव काय, बाळ?"

"माझं नाव जाई, राणीसरकार!" तिने अतिशय अदबीने उत्तर दिले. पण ती हळूच स्वताशी म्हणाली, "अं: ! हे मुळी कागदी पत्ते आहेत सगळे ! त्यांना भिण्याचं मला काय कारण?"



"आणि हे कोण?" राणीने त्या तिघां माळ्यांकडे बोट करून विचारले. कारण ते तिघेही खाली तोंड करून पडले होते, त्यामुळे त्यांच्या पाठी दिसत होत्या. आणि पाठी काय, सगळ्या पत्त्यांच्या सारख्याच. मग राणीला तरी कसे कळणार हे माळी आहेत, की सैनिक आहेत, की दरबारी लोक आहेत, की आपल्याच मुलांपैकी कुणी तरी आहेत हे?

"मला काय माहीत?" जाई म्हणाली. "माझा काय त्यात संबंध आहे?"

आपल्याला एवढे बोलायचा धीर झाला, याचे तिला आश्चर्यच वाटले.

राणीसाहेब रागाने लाल झाल्या. एक क्षणभर त्यांनी एखाद्या जंगली

जनावराप्रमाणे जाईकडे डोळे वटारून पाहिले, आणि त्या किंचाळल्या, "उडवा....उडवा हिचं डोकं!—"

"हुड्डुत्! " जाई जोराने आणि ठासून बोलली.

तेवढ्यात राजाने राणीच्या खांद्यावर हात ठेवला आणि जरा भीत भीत म्हटले, "लाडके, जरा विचार कर! ती मुलगी केवढी—"

राणीसाहेबांनी रागारागाने नवऱ्याचा हात झटकून टाकला आणि दुसरीकडे वळून त्या गुलामावर खेकसल्या, '—उलट, त्या तिघांना उलट!"

गुलामाने तिघां माळ्यांना पायाच्या चवड्याने फार जपून उलटले— म्हणजे सुलटे केले.

"उठा!" राणीसाहेब मोठ्यांदा कर्कश आवाजात किंचाळल्या; आणि लगेच तिघेही माळी ताडकन् उठून उभे राहिले आणि लगेच पुन्हा खाली वाकले. राजा, राणी, राजपुत्र, राजकन्या, दरबारी लोक आणि बाकीचीही झाडून सर्व मंडळी, या सगळ्यांना त्यांनी पटापट मुजरे केले.

"बस्स् करा आता!" राणीसाहेब किंचाळल्या. "माझं डोकं फिरतं तुमच्या अशा करण्याने!" आणि मग त्यांचे गुलाबाच्या झाडाकडे लक्ष गेले आणि त्या म्हणाल्या, "इथे काय करत होता तुम्ही?"

"मेहेरबान राणीसरकार!" छक्का एक गुडघा टेकून अगदी गरिबीच्या सुरात म्हणाला, "आम्ही असा विचार केला........"

"अस्सं!" राणीसाहेब गुलाबाची फुले पाहण्यात रंगल्या होत्या, त्या एकदम ओरडल्या, "उडवा रे यांची डोकी!"

आणि इथला मुक्काम संपवून मिरवणूक एकदम पुढे चालू झाली. तिघे सैनिक मागे राहिले. कारण शिक्षा पार पाडण्याचे काम त्यांच्याकडे होते. गरीब बिचारे माळी घाबरून गेले आणि पळत पळत जाईकडे येऊन त्यांनी आसरा मागितला.

जाई म्हणाली, "कोण तुमची डोकी उडवतो, पाहते!" आणि असे म्हणून तिने त्यांना उचलले आणि जवळच एक मोठे फुले ठेवायचे पात्र होते त्यांत कोंबले.

सैनिकांनी एकदोन मिनिटे इकडे तिकडे शोधल्यासारखे केले आणि मग मुकाट्याने धावत जाऊन ते परत मिरवणुकीला मिळाले.

"उडवली का डोकी त्यांची ?" राणीसाहेब ओरडल्या.

"त्यांची डोकी पार पार उडून गेली, सरकार !" तियांनीही ओरडून उत्तर दिले.



"ठीक !" राणीसाहेब गुरगुरत म्हणाल्या, "तुम्हांला चेंडूदांडू येतो ?"

सैनिक काहीच बोलले नाहीत. गप्प बसले. कारण हा प्रश्न बहुतकरून राणीसाहेबांनी जाईला विचारलेला असावा.

"येतो !" जाई ओरडली.

"चल तर मग !" राणीसाहेब आणखी मोठ्याने ओरडल्या. तशी जाई पण मिरवणुकीबरोबर चालू लागली. अर्थात् पुढे काय होणार याची काही-सुद्धा कल्पना तिला नव्हती.

चालता चालता भित्र्या आवाजात उच्चारलेले कुणाचे तरी शब्द तिला ऐकू आले—

" आज हवा फार सुरेख पडली आहे, नाही ?"

" फारच ! " जाई म्हणाली. " सरदारीणबाई दिसत नाहीत ?"

" शू: ! " ससा गडबडून जाऊन हलक्या आवाजात म्हणाला. त्याने भीत भीत खांद्यावरून मागे वळून पाहिले आणि मग चवड्यांवर उभा राहून जाईच्या अगदी कानाशी तोंड देऊन म्हणतो, " त्यांना फाशीची शिक्षा झाली आहे. "

" ती का म्हणून ? " जाईने विचारले.

" काय म्हणालीस तू ?—फार वाईट झालं ? "

" नाही, मी मुळीच तसं म्हणाले नाही. आणि यात फार वाईट झालं असं मला वाटतही नाही ! मी असं विचारलं, की का म्हणून त्यांना शिक्षा झाली ? "

" सरदारीणबाईंनी राणीसाहेबांच्या कानावर ठोसा दिला म्हणून ! " ससा सांगायला लागला. ते ऐकून जाईला एकदम हसू कोसळले आणि ससा परत भेदरून जाऊन हळूच म्हणाला, " गप्प बस की. राणीसाहेब ऐकतील !—त्याचं असं झालं, सरदारीणबाईंना यायला थोडा उशीर झाला. तसं राणीसाहेब म्हणाल्या—"

इतक्यात राणीसाहेब अवाचित तिथे आल्या आणि ओरडल्या, " सारे जण आपापल्या जागेवर जा. "

एवढ्या प्रचंड आवाजात त्या ओरडल्या, की जसा काही ढगांचा गडगडाटच ! त्यामुळे सगळे लोक घाबरून सैरावैरा पळायला लागले; आणि पळता पळता एकमेकांना अडखळून पडायला लागले. पण तरी, एकदोन मिनिटांतच त्यांनी आपल्याला सावरले आणि मग खेळाला सुरवात झाली. जाईला वाटले, चेंडूदांडूच्या खेळाचे असले मैदान आपण जन्मात कधी पाहिलेले नाही. जिकडे तिकडे मुळी खड्डे नि उंचवटे होते. चेंडू कसले होते म्हणाल, तर जिवंत साळूंचे. दांडू म्हणजे जिवंत करकोचे. आणि ज्या कमानींखालून चेंडूचे टोले हाणायचे, त्या कमानी कशा तयार केल्या होत्या ? तर सैनिकांनाच वाकायला लावून त्यांच्या पाठीच्या कमानी केल्या होत्या.

सुरवातीला जाईला मुख्य अडचण पडली ती आपला करकोचा सावरून धरताना. कसे तरी करून करकोच्याला व्यवस्थित काखोटीला तर मारले तिने. आणि त्याच्या तंगड्याही खाली लोंबत्या ठेवल्या. पण मग खेळताना काय व्हायचे ? ती खेळे झक्कपैकी. त्याची मान ओढून लांब करायची आणि त्याच्या डोक्याने चेंडूला टोला हाणायला निघायची. तोच—



करकोचा पटदिशी मान वळवायचा आणि ती खूप पिरगळून वर डोके करून जाईच्या तोंडाकडे पाहायचा. त्या वेळी तो चेहरा असा बुचकळ्यात

पडल्यासारखा करी, की जाईला हसूच कोसळे. आणि पुन्हा त्याचे डोके खाली वळवून ती दुसरा तडाखा हाणायला निघते, तो तिकडे साळूने आपले गुंडाळलेले आंग सोडवून घेतलेले असायचे, इतकेच नाही तर ती सुर्रकन् कुठे तरी पळून जात असायची. त्यामुळे जाईला अगदी चिडल्यासारखे व्हायचे. शिवाय एवढ्याने झाले नाही. ज्या बाजूला चेंडू हाणावा असे जाईला वाटे, त्या बाजूला नेमका एखादा खड्डा नाही तर उंचवटा मध्ये यायचा. आणि ते सैनिक तर सारखे इकडून तिकडे नि तिकडून इकडे 'आगे बढो' करीतच होते. त्यामुळे शेवटी जाईची खात्री झाली, की हा खेळ एकंदरीत भयंकरच कठीण आहे !

सर्व खेळाडू एकदमच खेळायचे. आळीपाळीने खेळणे त्यांना माहीतच नसावे. सारखे भांडत काय होते; 'ही माझी साळू' 'ती माझी साळू' काय करीत होते ! त्यामुळे थोड्याच वेळात राणीसाहेब भयंकर संतापल्या आणि पाय आपटीत इकडून तिकडे नि तिकडून इकडे धावायला लागल्या. तोंडाने मिनिटा–मिनिटाला 'उडवा त्याचं डोकं !' किंवा 'उडवा तिचं डोकं !' असा घोष चाललेलाच होता.

जाईला कसेसेच वाटायला लागले. म्हणजे तिचा स्वताचा राणीशी अजून काही खटका उडालेला नव्हता. पण तो केव्हा उडेल त्याचा नेम नाही हे तिला माहीत होते. 'आणि एकदा तसं झालं–' ती आपल्याशी म्हणाली, 'म्हणजे माझं होईल तरी काय ? या लोकांना तर डोकी उडवायची भयंकर चटक लागलेली. इतकी तरी लोकं अजून जिवंत आहेत हे आश्चर्यच म्हणायचं !'

कोणाला पत्ता न लागू देता कुठून तरी पळून जाता येईल का म्हणून ती पाहात होती. तोच हवेत अधांतरी एक चमत्कारिक प्रकार तिला दिसला. पहिल्याने तिला त्याचा अर्थच कळेना. नंतर तिने ओळखले, की हे ते हसू आहे. 'अरेच्या !' ती म्हणाली, 'म्हणजे इराणी मांजर येतंय् वाटतं ! छान. आता मला बोलायला तरी एक सोबती मिळाला.'

लवकरच हसूच्या भोवती तोंड तयार झाले आणि त्या तोंडातून शब्द निघाले, "काय, कसं काय चाललंय् ?"

जाईने एकदम उत्तर दिले नाही. त्याचे डोळे प्रकट होईपर्यंत ती थांबली.

आणि मग तिने नुसते मानेनेच 'ठीक' केले. 'कारण,' ती आपल्याशी म्हणाली, 'याचे कान जोवर आलेले नाहीत, तोवर याच्याशी बोलण्यात काय अर्थ आहे? त्याला ऐकूच जायचं नाही!"

आणखी मिनिटभरात त्याचे सबंध डोके दिसायला लागले. तेव्हा जाईने आपला करकोचा खाली ठेवला आणि ती आपली हकीकत सांगायला लागली. कोणी तरी ऐकायला मिळाले याचा तिला एवढा आनंद झाला होता, की विचारू नका.

ती म्हणाली, "हे लोक एवढे खेळताहेत ना, पण त्यांना खऱ्याखोट्याची काहीच चाड नाही रे! आणि भांडत तर इतके असतात, की आपलं आपल्याला बोललेलं ऐकू येत नाही. शिवाय त्यांचे नियम बियम काहीच दिसत नाहीत. किंवा असले तर ते कुणी पाळीत नाही. आणि दुसरं असं—हे चेंडू जिवंत, ते दांडू जिवंत—त्यामुळे असा काही घोटाळा उडतो म्हणून सांगू! आता हेच बघ—ती जी कमान दिसते ना, ती मला ओलांडायची आहे आत्ता. पण ती एका जागी राहील तर ना? चालत चालत ती केव्हाच पलीकडच्या टोकाला जाऊन पोचली. मघाशी काय झालं, मी चुकून राणीच्याच साळूला टोला देणार होते. बरं तर बरं, तेवढ्यात माझी साळू तिथे आली अन् तिला पाहून राणीची साळू पळून गेली!"

"तुला राणीसाहेब कशा काय वाटतात?" बोक्याने विचारले.

"मला ती बिलकूल आवडत नाही!" जाईने साफ सांगितले. "ती इतकी—" पण इतक्यात राणी आपल्या मागेच उभी राहून ऐकते आहे असे तिच्या लक्षात आले. तेव्हा ती म्हणते, "इतकी हुशार आहे, की ती जिंकणार हे जवळ जवळ ठरलेलंच. मग खेळण्यात तरी काय अर्थ आहे?"

राणीसाहेब हसल्या आणि पुढे निघून गेल्या.

तेवढ्यात राजेसाहेब आले आणि बोक्याच्या तोंडाकडे पाहात म्हणाले, "कुणाशी बोलते आहेस तू?"

"हा माझा एक मित्र आहे" जाई घाईघाईने म्हणाली. "थांबा, ओळखच करून देते. याचं नाव इराणी मन्या."

"मला तो मुळीच आवडत नाही!" राजेसाहेब म्हणाले. "पण—पण त्याला वाटलं तर माझ्या पायांवर डोकं ठेवू दे."

" काही जरूर नाही ! " बोका म्हणाला.

" उर्मटपणाने बोलू नकोस ! " राजेसाहेब उखडले. " आणि माझ्याकडे असं पाहू नकोस. "

आणि असे बोलत बोलत राजेसाहेब जाईच्या मागे झाले.

जाई म्हणाली, " हे काही तरीच ! मांजराने राजाकडे पाहू नये असा नियम मुळीच नाही. मी वाचलेलं आहे पुस्तकात. "

इकडे राजेसाहेबांनी मनाशी काही तरी पक्के ठरवले आणि ते म्हणतात, " त्याला इथून उडवूनच लावलं पाहिजे. " आणि त्याच वेळी तिथून राणीसाहेब चालल्या होत्या. त्यांना ते म्हणाले, " लाडके ! या मांजराला तू उडवून लावलंस तर बरं होईल. "

लोकांना उडवून लावायचे याचा अर्थ राणीसाहेबांच्या कोशात एकच होता. त्यांची डोकी उडवायची ! त्यांनी नुसते मागेसुद्धा वळून पाहिले नाही. त्या म्हणाल्या, " उडवा त्याचं डोकं ! "

राजा घाईघाईने म्हणाला, " तसं नको; मीच जाऊन आणतो मारेकऱ्याला ! " आणि तो लगेच पळालाही.

जाईला वाटले, आपण आता परत जावे आणि खेळ कसा काय चालला आहे ते पाहावे. कारण राणीसाहेब तावातावाने किंचाळत असल्याचा लांबून आवाज येत होता. कुणाचीही खेळाची पाळी चुकली, की त्याला फाशीची शिक्षा द्यायची, असे राणीने ठरवले होते. आणि आतापर्यंत तिघांना अशा शिक्षा ठोठावल्या होत्या. हा सगळा प्रकार जाईला बिलकूल आवडला नाही. कारण खेळात इतका गोंधळ उडालेला होता, की आपली पाळी आली की नाही हे तिला कळणेच शक्य नव्हते. तेव्हा आपली साळू पहिल्याने हुडकून काढावी म्हणून जाई तिथून निघाली.


पण तिच्या साळूची नि दुसऱ्या एका साळूची मारामारी चालली होती.

" एका दृष्टीने बरंच आहे. " जाई म्हणाली. " आता मी हिचा टोला तिला देईन अन् तिचा टोला हिला देईन. "

पण टोले द्यायला दांडू कुठे जागेवर होता ? तिचा करकोचा बागेच्या पार दुसऱ्या टोकाला जाऊन पोचला होता. जाईने पाहिले, तो तिथल्या एका झाडावर चढून बसायची त्याची व्यर्थ धडपड चालली होती.

कसा तरी एकदाचा तिने तो पकडला आणि पहिल्या जागी आली. पण तोपर्यंत साळूंची मारामारी संपली होती आणि दोघीही कुठे तरी पसार झाल्या होत्या!

"पण काही हरकत नाही म्हणा!" जाई म्हणाली. "कारण तसं म्हटलं तर या बाजूच्या सगळ्या कमानीदेखील पसार झाल्या आहेत." आणि असे म्हणून तिने करकोचा पुन्हा काखोटीला मारला आणि आपल्या दोस्ताबरोबर आणखी थोड्या गप्पा माराव्यात म्हणून ती परत तिकडे गेली.



पाहते तो इराणी मांजराभोवती ही गर्दी जमलेली! राजा, राणी आणि मारेकरी यांच्यात कशावरून तरी तंटा निघाला होता आणि म्हणून तिघेही

एकदम बोलत होती. बाकीची सर्वजणे बिचारी जागच्या जागी चुळबूळ करीत स्वस्थ उभी होती.

जाई तिथे आल्याबरोबर तिघांनीही तिच्याचकडे तक्रार केली. प्रत्येकाने आपली बाजू तिच्यापुढे मांडली. पण तिघांनीही एकदमच बोलणे सुरू केले. त्यामुळे ते नक्की काय बोलताहेत हे कळायला जाईला फार त्रास पडला.

मारेकऱ्याचे म्हणणे असे होते, की एखाद्याचे डोके उडवायचे म्हणजे त्याला डोक्याखालचा भागही असायला पाहिजे. ज्याला धड नाही अशा प्राण्याचे डोके आपण जन्मात कधी उडवलेले नाही; आणि इतक्या म्हातारपणी असले नवीन करायची आपली तयारी नाही !

राजा म्हणत होता, " डोकं असलं की ते उडवणं सोपं आहे. उगाच मूर्खासारखी बडबड करू नकोस !"

राणी म्हणत होती, " या प्रश्नाचा ताबडतोब काही तरी निकाल लावला पाहिजे. नाही तर मी तुमची सगळ्यांचीच डोकी उडवीन !" (तिच्या या धमकीमुळे सर्वांचे चेहरे लांबट, सचिंत बनले होते.)

याच्यावर निकाल तरी काय देणार? तेव्हा जाई शेवटी एवढेच म्हणाली, " हे मांजर सरदारीणबाईचं आहे; तुम्ही त्यांनाच विचारलेलं बरं."

" ती तर तुरुंगात आहे. जा रे, तिला घेऊन ये !" राणीने मारेकऱ्याला फर्मावले. मारेकरी बाणासारखा सुर्रकन् निघाला.

त्याच वेळी मांजराचे डोके पुसट पुसट होत चालले आणि मारेकरी परत येईपर्यंत पार दिसेनासे झाले. तेव्हा तो भडकला आणि राजेसाहेबही भडकले. आणि दोघेही हातपाय आपटीत मांजराच्या शोधासाठी धावपळ करू लागले.

इकडे बाकीच्या लोकांनी पुन्हा खेळ सुरू केला.

## ८

" बाळ ! तू आता पुन्हा भेटलीस, त्यामुळे मला किती किती आनंद झालाय् म्हणून सांगू ? " सरदारीणबाई जाईच्या हातात हात घालून प्रेमाने बोलत होत्या.

त्या इतक्या खुषीत आहेत हे पाहून जाईला फार बरे वाटले. ' कदाचित् ' ती आपल्याशी म्हणाली, ' मघाशी सैपाकघरातल्या त्या मिरपुडीमुळे हिचं पित्त भडकलं असेल. एरवी ती वाईट नसावी !....मी जर कधी सरदारीण झाले, ( कशाला होतेय् म्हणा !) तर सैपाकात मिरपूड वापरणार नाही, काय वाट्टेल ते झालं तरी ! मिऱ्यांमुळेच लोक इतके तापट बनत असावेत, ( जाईला वाटले, वा ! काय शोध लावला आपण !) मग पुढे असंही असेल, की चिंचेमुळे लोक आंबटशोकी बनत असावेत, हिंगामुळे लोक कडवट बनत असावेत आणि गुळामुळे लोक गोड बनत असावेत ! खरं म्हणजे किती सोपी आहे ही माहिती ! पण लोक समजून घेतील तेव्हा ना— '

सरदारीणबाईंना ती एव्हाना पार विसरून गेली. त्यामुळे जवळूनच त्यांचा आवाज ऐकू आला, तेव्हा ती चपापली.

सरदारीण म्हणत होती, " तू कशाबद्दल तरी विचार करत होतीस, हो ना बाळ ? म्हणूनच तू बोलायचं विसरलीस !— याचं— याचं तात्पर्य काय बरं ?— जाऊ दे ! आठवलं की सांगेन तुला ! "

" तात्पर्य नसेलच त्याला ! " जाईने बोलायचा धीर केला.

" हॅट् ! " सरदारीण म्हणाली. " प्रत्येक गोष्टीला तात्पर्य असतं. आपण ते शोधून काढायला हवं ! " आणि असे बोलत ती जाईच्या अगदी जवळ आली आणि तिला खेटून बसली.

' इश्श् ! ' जाई मनात म्हणाली. ' आपल्याला नाही बा ही घाणेरडी बाई आवडत. '

आणि खरोखरच ती अतिशय विद्रूप होती. आणि उंचीला जाईपेक्षा नेमकी जराशीच जास्त, त्यामुळे खुशाल जाईच्या खांद्यावर हनुवटी टेकून बसली होती. आणि तिची हनुवटी होती टोकदार, त्यामुळे जाईला अगदी कसेसे होत होते.

काही तरी बोलायचे म्हणून जाई म्हणाली, " आता खेळ बरा चाललाय्. "

" होय. " सरदारीणबाई म्हणाल्या. " हं, आत्ता आठवलं ते तात्पर्य–"

" हं: ! " जाई म्हणाली, " आणि थोड्याच वेळापूर्वी कुणी तरी बोललं होतं, की आपण बरे नि आपलं काम बरं असं प्रत्येकाने केलं, तर जग किती सुखी होईल ! "

" त्याचाच अर्थ तो ! " सरदारीणबाईंनी ठोकून दिले आणि बोलता बोलता आपली टोकदार हनुवटी तिच्या खांद्यात खुपसली. " आणि **याचं** तात्पर्य हे, की वाचमर्थोनुधावति ! म्हणजे आपण बोलायचं ते बोलावं, अर्थ मागून धावत येतो. "

' सगळ्यांतूनच बेटी तात्पर्य काढते आहे ! ' जाई स्वताशी म्हणाली.

थोड्या वेळाने सरदारीणबाई म्हणतात, " ए ! तुझ्या त्या करकोच्याची मला भीती वाटते. एखाद् वेळेस चोच बीच मारायचा. करकोचा आणि बूट दोन्ही बेटे चावतात ! म्हणजे यातलं तात्पर्य असं, की ' समसमां संयोग की जाहला ! ' "

" करकोच्याचा नि बुटाचा संयोग झालेला मी कधी पाहिलेला नाही ! "

" अगदी बरोबर ! किती ग झक्क बोलतेस तू ! " सरदारीण लगेच म्हणते. " अन् त्याचं तात्पर्य हे, की पायातली वहाण पायातच बरी. "

जाई जोरात म्हणाली, " करकोच्याने कधी वहाणसुद्धा पायात घातलेली मी पाहिलेली नाही. "

" बरोबर ! " सरदारीणबाई म्हणतात.– सगळेच बरोबर ! जाई कधी चूक करील हे त्यांना खरेच वाटत नसावे.– " त्याचंच तात्पर्य असं, की ' दिसतं तसं नसतं. ' किंवा याहून सोप्या भाषेत बोलायचं म्हणजे अमूक माणूस असा असा आहे, असं एखाद्याला जरी वाटत असलं, तरी असलं वाटणं तितकंसं बरोबर नसतं; कारण तो तमूक माणूस असा असा खरोखर नसून बराचसा तसा तसा असतो, असं शेवटी कळून चुकतं. "

" लिहून घेऊ का मी ? " जाईने नम्रपणे विचारले. " म्हणजे माझ्या लक्षात तरी राहील. तुम्ही बोलत असताना काही कळलं नाही मला. "

" अग, हे तर काहीच नाही ! " सरदारीणबाई खूष होऊन म्हणतात,

" मी आणखीसुद्धा कित्ती कित्ती बोलते."

" माफ करा ! यापेक्षा जास्ती बोलायची तसदी घेऊ नका."

" तसदी ?" सरदारीणबाई म्हणाल्या. " त्यात कसली तसदी आली ? मी जे बोलले, ते सगळंच तुला बक्षीस देते, मग तर झालं ?"

'वा रे बक्षीस !' जाई मनात म्हणाली. पण मोठ्याने तसे बोलायचा धीर तिला झाला नाही. 'वाढदिवसाला असली बक्षिसं कुणी देत नाही एवढं बरं.'

" काय ग ?" परत एकदा तिच्या खांद्याला टोकरीत सरदारीण म्हणते, " पुन्हा लागलीस वाटतं विचार करायला ?"

आता मात्र जाई जरा रागावून म्हणाली, " मला विचार करायचा पूर्ण अधिकार आहे."

" काय विचारता !" सरदारीणबाई म्हणतात. " डुकराला जितका उडण्याचा अधिकार आहे, तितकाच ! आणि याचं तात्—"

पण आपले तात्पर्य सांगण्याचे आवडते काम तिने पुरे केले नाही. त्यामुळे जाईला भयंकर आश्चर्य वाटले. बोलता बोलता सरदारीण थांबली होती. जाईच्या हातात घातलेला तिचा हात थरथर कापत होता.

जाईने चटकन् वर पाहिले, तो राणीसाहेब पुढ्यात उभ्या. त्यांनी छातीशी हातात हात अडकवले होते आणि कपाळावर आठ्यांचे जाळे पसरून त्या रागारागाने पाहात होत्या.

" नमस्ते राणीसाहेब !" सरदारीण उठून उभी राहात चाचरत चाचरत म्हणाली. पण त्या राणीसाहेबांनी जमिनीवर थाडदिशी पाय आपटले आणि त्या ओरडल्या, " हे बघ, तुला बजावून ठेवते. एक तर तुला तरी उडवीन किंवा तुझं डोकं तरी उडवीन. बोल, तुला यांतलं काय पसंत आहे ?"

सरदारणीने याचे उत्तर पायांनीच दिले. ती तिथून धूम पळत सुटली; जसे काही तिला खरोखरच कोणी तरी उडवले होते.

राणीसाहेब जाईला म्हणतात, " हं, चल. आपण परत आपला डाव खेळू या."

जाई बिचारी इतकी भ्याली होती, की ती मुकाट्याने त्यांच्याबरोबर गेली.

इकडे राणी गैरहजर होती तेवढ्यात बाकीचे पाहुणे सावलीत बसून

राहिले होते. पण राणीसाहेबांनी " एकेकाचं डोकं उडवीन ! " म्हणून धमकी देताच ते सगळे उठून मैदानावर खेळायला धावले.

खेळ चालू असतानासुद्धा राणी पाहुण्यांशी भांडत होती आणि मधून मधून " उडवा त्याचं डोकं ! " किंवा " उडवा तिचं डोकं ! " असे ओरडत होती. ज्यांना ज्यांना तिने शिक्षा फर्मावली, त्यांना सैनिकांनी पकडून कैदेत टाकले. सैनिक म्हणजेच कमानी, तेव्हा हे काम करताना कमानी मोडल्या हे सांगायला नकोच. म्हणजे अर्ध्यापाऊण तासात तिथे एकही कमान उरली नाही. शेवटी राजा, राणी नि जाई सोडून बाकी सगळे खेळाडू जेव्हा तुरुंगात पडले, तेव्हा राणीनेही खेळ बंद केला आणि धापा टाकीत ती जाईला म्हणते, " तू खोटा कासव पाहिला आहेस ? "

" खोटा कासव ? म्हणजे काय ? "

" खोटा म्हणजे खऱ्याच्या उलट. नकली, बनावट. खरा कासव माहीत आहे ना तुला ? अग, कासव म्हणजे कूर्म. ज्याचं कूर्मासव करतात, ते कूर्म. "

" कूर्मासव ? "

" कुमारी आसव पाहिलं आहेस का तू ? "

" पाहिलं आहे. मी चाखलंही आहे. " जाई म्हणाली.

" झालं तर. तसंच कुमारासव पण असतं. कुमारासव म्हणजेच कूर्मासव. कूर्म म्हणजे कासव. कासवाचं आसव. "

" अस्सं ! " जाई कंटाळून जांभया देत म्हणते.

" त्याचे दोन प्रकार आहेत. खरं नि खोटं. खोटं कूर्मासव ज्याचं करतात, तो खोटा कासव. चल, तुझी त्याची ओळख करून देते, म्हणजे तो तुला आपली कहाणी सांगेल. "

दोघी जणी निघाल्या. जाता जाता राजाने सर्व लोकांना हळूच काही तरी सांगितलेले जाईला ऐकू आले. तो म्हणत होता, " तुम्हांला सर्वांना शिक्षा माफ केली आहे. "

" वा, छान ! " जाई स्वताशी म्हणाली. नाही तरी इतक्या सगळ्या लोकांना राणीने फाशीची शिक्षा दिली म्हणून तिला फार वाईट वाटत होते.

इतक्यात त्यांना वाटेत एक विचित्र प्राणी भेटला. धड पक्षीही नाही, धड पशूही नाही; अर्धा गरुड नि अर्धा सिंह.

"ऊठ रे आळश्या !" राणी त्याच्यावर ओरडली. "या मुलीला खोट्या कासवाकडे घेऊन जा. या गरुडसिंगाबरोबर जा नि ऐक कासवाची कहाणी,



बरं का ग? मला गेलं पाहिजे. काही लोकांना फाशीच्या शिक्षा दिल्या आहेत, त्या बघते अमलात आल्या की नाहीत ते !"

झाले! राणीसाहेब निघून गेल्या आणि त्या चमत्कारिक प्राण्याजवळ जाई एकटीच राहिली. तिला तो प्राणी आवडला नाहीच अर्थात. पण तिला वाटले, त्या दुष्ट राणीपेक्षा काही हा वाईट नसेल.

गरुडसिंग उठून बसला होता आणि डोळे चोळीत होता. राणी अगदी दिसेनाशी झाल्यावर तो हसला आणि अर्धवट जाईला नि अर्धवट स्वताशी म्हणतो, "काय मजा आहे !"

"कसली मजा ?" जाईने विचारले.

"ही बाई ग !" तो म्हणतो, "नुसती कल्पना करीत असते. तुला काय वाटतं, इतक्या लोकांची डोकी उडवतात इथे?—छट्? हं, चल पाहू !"

जाईला वाटले, आता हा पण हुकूम द्यायला लागला ! ज्याने उठावे त्याने हुकूम द्यावेत म्हणजे काय?

पण ती गरुडसिंगाबरोबर निघाली. फार दूर गेली नाहीत, तोच त्यांना

काही अंतरावर खोटा कासव एका खडकावर उदासवाणा बसलेला दिसला. आणखी जवळ पोचल्यावर जाईला त्याचे उसासेही ऐकू आले. बिचाऱ्याचे ते दुःख पाहून एखाद्याचे काळीज फुटले असते.

जाई अगदी कळवळून गरुडसिंगाला म्हणाली, "काय झालंय् याला?"

गरुडसिंग पुन्हा पहिल्यासारखे म्हणाला, "नुसती कल्पना करत असतो. त्याला कसलंही दुःख झालेलं नाही. नकल्या आहे एक नंबरचा!"

गेली दोघे त्या नकल्याजवळ. त्याने अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी त्यांच्याकडे पाहिले, पण तो एक अक्षर बोलला नाही.

गरुडसिंगानेच सुरवात केली, "कच्छू! (हे खोट्या कासवाचे लाडके नाव) या– या मुलीला तुझी सबंध कहाणी ऐकायची आहे."

खोट्या कासवाने खोल गेलेल्या आवाजात म्हटले, "बरं, सांगतो. दोघंही खाली बसा आणि माझी कहाणी संपेपर्यंत मध्ये बोलू नका."

त्याप्रमाणे दोघे खाली बसली आणि काही मिनिटेपर्यंत कोणी एक अक्षर बोलले नाही. जाई मनात म्हणाली, "हे आहे काय? हा कहाणी सुरूच करत नाही, तर ती संपणार कशी?"

पण तरीदेखील तिने आणखी काही वेळ वाट पाहिली.

"एका काळी–" खोटा कासव मोठा सुस्कारा सोडून म्हणतो, "मी खरा कासव होतो."

आणि एवढे बोलून तो जो पुन्हा थांबला, तो थांबलाच. बराच वेळपर्यंत सर्व सामसूम होती. फक्त गरुडसिंग मध्येच 'गुर्रर्र–' करी आणि खोटा कासव भले मोठे हुंदके देई, त्यांचा आवाज होई तेवढाच. जाई इतकी कंटाळली, की तिला वाटले, आता उठावे आणि 'फारच सुंदर आहे तुझी कहाणी, धन्यवाद!' असे म्हणून निघून जावे. पण पुन्हा तिला वाटले, खरोखरच याची गोष्ट ऐकण्यासारखी असेल तर? थांबूच या जरा!

शेवटी एकदाचा कच्छूने घसा मोकळा केला!

"आम्ही लहान असताना–" तो रडत म्हणाला, "कच्छच्या आखातात आमची शाळा होती. एक मगरी आमची मास्तरीण होती. तिला आम्ही सुसरबाई म्हणायचो."

" ती जर **मगर** होती, तर तिला तुम्ही **सुसर** का म्हणायचात ? " जाईने विचारले.

कारण तिला शिकवायची **सुरसुरी** होती." कच्छू रागावून म्हणाला, " एवढं पण कळत नाही ? मूर्ख कुठची ! "

गरुडसिंगदेखील म्हणाला, " असले बावळट प्रश्न विचारतेस याची तुला लाज वाटली पाहिजे ! " आणि मग दोघेही गप्प बसले. बिचाऱ्या जाईला असे झाले, की धरणीमाई आपल्याला पोटात घेईल तर बरे होईल ! शेवटी कच्छूने एकदाचे फिरून भाषण सुरू केले, " आम्ही समुद्रात शिकत असायचो. तुला कदाचित् हे खरं वाटणार नाही—"

" मी कधी म्हटलं, खरं वाटणार नाही ? "

" म्हटलंस ! " कच्छू ठासून बोलला.

" गप्प बैस ! " जाई काही बोलणार त्याच्या आधीच गरुडसिंग ओरडला.

कच्छू पुढे म्हणतो, " आम्हांला पहिल्याने खुळाक्षरं शिकवली आणि मग बाराधड्या—"

" बाराखड्या असतील—"

" बाराधड्याच. समजत नाही, तर मध्येच बोलू नये. आम्हांला रोज एक धडा शिकवत. आज कधडा शिकवायचा, उद्या खधडा शिकवायचा, परवा गधडा शिकवायचा—"

" इश्श ! " जाई नाक मुरडून म्हणाली, " मला कुणी गधडा शिकवायला असता, तर मी पळून गेले असते. शाळा बुडाली तर बुडाली ! "


कच्छू रडत रडत म्हणाला, " आमची शाळा समुद्रात होती. त्यामुळे ती आधीच बुडालेली होती. "

गरुडसिंग म्हणाला, " डोळे पूस. आणि हे बघ, ते अभ्यासाचं राहू दे. आता खेळाबद्दलच सांग. "

९

खोट्या कासवाने एक लांबच लांब उसासा टाकला आणि आपल्या फताड्या पायाने डोळे पुसले. मग जाईकडे पाहात तो बोलायला सुरवात करणार तो हुंदक्यांमुळे त्याला बोलणेच अशक्य झाले.

गरुडसिंग म्हणाला, " याच्या घशात एखादं हाडूक अडकलंय् की काय ? " आणि त्याला गदगदा हालवून त्याच्या पाठीत त्याने अदाबद बुक्के मारले. तेव्हा एकदाचा त्याचा घसा सुटवला आणि तो पुढे सांगायला लागला—



" तू समुद्रात फारशी राहिलेली नाहीस–( " फारशी का ? " जाई म्हणाली. " मुळीच नाही. " ) त्यामुळे तुला शिंगाडा माहीत नसेल ( " तो का ? आमच्याकडे तर दर एकादशीला–" ) आणि शिंगाड्याचा नाचही तू कधी पाहिलेला नसशील. "

" शिंगाड्याचा नाच ? "

गरुडसिंग म्हणाला, " हा शिंगाडा निराळा. समुद्रात राहतो. मासा आहे एका जातीचा. तुला एकादशीला चालायचा नाही ! "

"मी बाई सोंगाड्याचा नाच पाहिलाय्. शिंगाड्याचा नाच कसा असतो?"

"बघायचाय् तुला?" खोट्या कासवाने विचारले. आणि तेवढ्यात काही आठवण होऊन तो म्हणतो, "माफ कर हं!" मला 'शेवंडाचा नाच' असं म्हणायचं होतं. शिंगाड्याचा नि शेवंडाचा घोटाळा झाला! या समुद्रात बेटे इतके प्राणी असतात, की नेहमीच असे घोटाळे उडतात. शेवंड माहीत आहे तुला? शिंगाडा म्हणजे एका जातीचा मासा, तर हा शेवंड असतो खेकड्यासारखा प्राणी. लांब लांब कांटेरी मिशा असतात त्याला. या शेवंडाचा हात धरून नाचायचं. मध्येच शेवंडाला उचलायचं नि दूर समुद्रात फेकून द्यायचं. मग दुसऱ्या शेवंडाचा हात धरायचा अन् पुन्हा नाच सुरू!"

"शेवंड नाहीत तर आपणच नाचू या." गरुडासिंग म्हणाला. "पण गाणं मात्र तू म्हटलं पाहिजेस. मी सगळं विसरून गेलो."

"बरं" असे म्हणून कच्छूने गरुडसिंगाचा हात धरला आणि दोघांनी जाईच्या भोवती नाचायला सुरवात केली. मध्येच ते जाईच्या इतके जवळून जात, की तिच्या पायावर कुणाचा तरी पाय पडे. कच्छूने हातवारे करीत रडगाणे म्हटले, ते असे होते—

झिंगा म्हणतो, "गोगलगाई, चल चल बाई! झपा झपा!
पाठीवर बघ टपली मगरी, हाणिल रट्टे रपा रपा!
पहा उडाली समुद्रकाठी गर्दी मोठी लोकांची
जिकडे तिकडे कासव-खेकडे, वाव-कालवे, माशांची!
हात हलवुनी स्वागत करिती, म्हणती 'या या– बसा बसा!'
चल चल बाई, गोगलगाई! नाच नाचु या सुरेखसा!
येतिस का?
चलतिस का?
माझ्या संगे नाचतिस का?
येच गडे
नाच गडे
समुद्रकाठी याच गडे!"

गोगलगाइस हुरूप कुठला नाच–कवायत–दंग्याला?
मान हलवुनी, डोळे पुसुनी, रडत बोलली झिंग्याला—

"उंहूं–उंहूं!
क्या मैं कहूँ?
नाचुन दुखतिल पाय बहू!
नको नको!
नाच नको
तुझा मला हा जाच नको!"

झिंगा आला रंगामध्ये पिंगा घाली पाण्यात
पुन्हा पुन्हा करि गोगलगाइस तीच विनंती गाण्यात...

"येतिस का?
चलतिस का?
माझ्या संगे नाचतिस का?"
"नको नको!
नाच नको
तुझा मला हा जाच नको!"

"येच गडे"–"उं हूं, उं हूं!"!–"नाच गडे!"–"क्या मैं कहूँ?
नाचुन दुखतिल पाय बहू!"
"समुद्रकाठी—" "नको नको! नाच नको अन् बीच नको!
मला तुझा हा जाच नको!"

आणि मग खूप वेळा 'उं हूं–उं हूं–' आणि 'नको–नको' म्हणून झाल्यावर एकदाचा हा नाच संपला; आणि जाईला फार बरे वाटले. पण ती म्हणाली, "फारच छान होता बरं का नाच! पण काय हो? याला शिंगाड्याचा नाच कशाला म्हणायचं? त्यात शिंगाड्याचं नावसुद्धा नाही."

"अग शिंगाड्याचा नाही, शेवंडाचा! ते आहे–पुढे तिसऱ्या कडव्यात आहे." खोटा कासव कपाळ पुशीत बसला होता, तो पुन्हा जागचा उठत म्हणाला. "म्हणून दाखवू का?"

"नको, नको!" जाई घाईघाईने म्हणाली; आणि मग मनातच म्हणते, 'तुझा मला हा जाच नको!' मोठ्याने मात्र—"कशाला उगीच? तुम्हांला

दमायला होईल."

"बरं तर." कच्छू पुन्हा खाली बसून म्हणतो "ते समुद्रकाठावर जमलेले प्राणी असतात ना, ते शेवंडांना उचलतात नि सटासट समुद्रात फेकतात. म्हणून तर झिंग्याला काठावर जायची घाई लागली होती. म्हणजे त्यालाही मिळालं असतं समुद्रात पडायला."

'पण तो स्वतः समुद्रातच तर होता!' जाई पुटपुटली आणि मग गप्प बसली. कारण या लोकांशी वादविवाद घालण्यात काही अर्थच नव्हता.

आता पुढे काय करायचे हा प्रश्न होता. गरुडसिंगाने सुचवले, "तू गाणं म्हणून दाखव ना एखादं?"

"कोणतं म्हणू?" जाईने विचारले आणि अगदी खिन्न चेहरा केला. "खरं सांगू? मी जे जे गाणं म्हणते, ते ते चुकतं! असं का होतं समजत नाही, पण गाण्याची चाल तेवढी आठवते अन् शब्द मात्र भलतेच तोंडातून निघतात!"

"ते कसं?" खोट्या कासवाने आपली कळीची मान हळूहळू तिच्याकडे वळवीत विचारले.

"कसं नि काय, कुणास ठाऊक?" जाई म्हणाली, "तुम्हांला उदाहरणंच देते म्हणजे कळेल. पहिल्याने मी 'रानपाखरा, रोज सकाळी येसी माझ्या घरा—' हे गाणं म्हणायला लागले. तर आपलं 'रानडुक्करा—'च तोंडातून निघालं!"

"हं:!" कच्छूने आपल्या हाताच्या तळव्याने नाक पुशीत म्हटले. फार वेळ पाण्याबाहेर राहिल्यामुळे त्याला सर्दी झाली होती.

"दुसरं गाणं 'म्हातारा इतुका—' ते पण चुकलं माझं!"

"आश्चर्यच आहे!" गरुडसिंग शेपटी ताठ उभी करून, पंख पसरून तिच्याकडे आपल्या चोचीवरून पाहात म्हणतो. "तू असं कर ना— आणखी एक गाणं म्हणून बघ. म्हणजे आम्हांलाही कळेल तुझं डोकं बिघडलंय् की काय ते!"

"कोणतं म्हणशील? 'हे कोण बोलले बोला'...." कच्छू आपली मान आत ओढून कॉलरीआड दडवीत म्हणाला. "शेवंडाग्रजांचं प्रसिद्ध गाणं!"

काय मेल्याचं वाङ्मयाचं ज्ञान पण!' जाई आपल्याशी म्हणाली. त्याला

'गोविंदाग्रज म्हणायचं होतं!'

मग ती घसा साफ करून भीत भीत गायला लागली. तिची खात्रीच होती की आपण पुन्हा चुकणार....

"हे कोण बोलले बोला
शिंगाडा माझा निजला!!—"

"घोटाळा आहे, सगळाच घोटाळा आहे!" कच्छू मान पुन्हा बाहेर काढून ती दोन्हींकडे हालवीत म्हणाला.

जाई गाल फुगवून खाली बसली.

"मी म्हणतच नाही परती!" दोन्ही हातांनी गाल धरून ती फणकाऱ्याने म्हणाली. "जे म्हणावं ते मुळी चुकतं."

गरुडसिंग म्हणाला, "च्–च्! अशी रुसू नकोस. हे बघ, आपण या खोट्या कासवालाच गायला सांगू. त्याला कूर्मासवाचं गाणं कसं छान येतं.—कासवसुतांनी केलेलं. म्हणतोस रे?"

"म्हणतो." कच्छू तोंड वेंगाडून रडक्या आवाजात म्हणाला.

"तुला फार आवडेल ते गाणं." गरुडसिंगाने सांगितले. "कूर्मासवाचं महत्त्वही कळेल तुला. कूर्मासव म्हणजे अमृतावर ताण असं औषध आहे. ते प्याल्यावर भयंकर शक्ती येते अंगात."

'कुमारी आसव असणार' जाई पुटपुटली. आणि मग तिने मोठ्याने विचारले,— "तुम्ही एजंट आहात त्या कंपनीचे?"

"एजंट बिजंट नाही." गरुडसिंग म्हणाला. "मला तू ओळखत नाहीस वाटतं? गरुड म्हणजे पक्ष्यांचा राजा आणि सिंह म्हणजे पशूंचा राजा. मी 'गरुडसिंह' म्हणजे पशुपक्ष्यांचा राजा आहे. मी एजंट कशाला होईन?"

"अगबाई!" जाई म्हणाली. "म्हणजे सगळे पशुपक्षी तुमचं ऐकत असतील?"

"**ऐकत** नाहीत माझं. ते **पाहतात** माझ्याकडे. ते म्हणतात, आपला राजा **पाहण्यालायक** आहे."

'ते खोटं नाही...' जाई स्वताशी म्हणाली. 'मी तरी असला प्राणी आत्ताच पाहते आहे.'

गरुडसिंग पुढे म्हणाला, "गरुड असताना मी अमृत खूप प्यायलो आहे.

पण मला कूर्मासव आवडतं. तुलाही आवडेल. लाल लाल रंगाचं, कढत कढत—"

"कढत कढत?" जाई कपाळाला आठ्या घालून म्हणाली. "औषधं कधी कढत असतात? मी कुमारी-आसव घेते ते तर बाटलीत असतं भरलेलं."

"हे पण बाटलीतच असतं. म्हणजे याच्यात बाटली आहे. गाण्यात.— हं, म्हण रे कच्छू!"

कच्छू उठला. दोन्ही बाह्यांनी दोन्ही डोळे पुसून त्याने एक कर्कश सुस्कारा सोडला आणि मग भसाड्या सुरात गायला सुरवात केली—

"एक बाटली द्या मज आणुनि!
बसून खड्कावरी मी
पिईन कूर्मासव हे नामी
लालभडक अन् कडक औषधी
पिताच पळतिल आधीव्याधी
ताकद वढेल नसांनसांमधि!

"एक बाटली द्या मज आणुनि!
फुंकिन जी मी स्वप्राणाने
फोडुन टाकिन सगळी भुवने
दीर्घ अशा मम डरकाळीने!
किल्ल्यावरचा राक्षस मारिन
किल्ल्या घेऊन तुरुंग उघडिन
राजकुमारीला मग उचलिन—
—ला मग उचलिन
—ला मग उचलिन—"

आणि हे गाता गाता खोटा कासव इतका रंगात आला, की '—ला मग उचलिन' म्हणत म्हणत त्याने जाईलाच उचलून पाठीवर टाकले. पण जाईला त्याची ती कठीण पाठ खुपायला लागली आणि ताडदिशी उडी मारून ती खाली उतरली.

खोटा कासव अजूनही गदगदलेल्या कंठाने गाणे म्हणतच होता. तो

तसाच घामाघूम होऊन खडकावर बसणार, इतक्यात गरुडसिंगाला एकदम कसली तरी आठवण झाली आणि जाईचा हात पकडून तो म्हणतो, "खटला— खटला!"

"खटला?"

"खटला आहे ना आत्ता! चल लवकर." जाई बिचारी त्याच्यामागे धावत निघाली होती. आणि तरी तो आपला सारखा तिला ओढीत ओरडतच होता, "चल लवकर! चल लवकर!"

जाई धापा टाकीत फरफटत त्याच्यामागे निघाली. जाता जाता खडकावंर बसून गाणाऱ्या कच्छूचे बेसूर रडगाणे त्यांना ऐकू येतच होते—

"एक बाटली द्या मज आणुनि।
द्या मज आणुनि ।
द्या मज आणुनि ।
द्या मज......."

# १०

कोर्ट म्हणजे राजाचा दरबारच होता. ही मंडळी तिथे जाऊन पोचली, तेव्हा बदामचा राजा नि बदामची राणी उंच सिंहासनावर बसलेली होती. दरबारात खूप लोक जमले होते. त्यांत किती तरी जातींचे पशुपक्षी होते आणि पत्त्यांचा सबंध गड्डा होता. सिंहासनासमोर गुड्डू उभा होता. त्याच्या दोन्ही हातांत बेड्या होत्या. आणि दोन बाजूंना दोन सैनिक पहाऱ्याला उभे होते. राजेसाहेबांच्या उजव्या हाताला पांढरा ससा उभा होता. त्याच्या एका हातात कागदांचे भेंडोळे होते नि दुसऱ्या हातात बिगुल होते. दरबारात मध्यभागी एक मेज होते आणि मेजावर चिक्कीने भरलेली बशी ठेवलेली होती. चिक्की इतकी खमंग वाटत होती, की जाईच्या तोंडाला पाणी सुटले, आणि तिच्या पोटात कावकाव सुरू झाली.

'कधी एकदाचा यांचा खटला संपतो नि हे फराळाला बोलावतात, असं झालंय् मला !' ती आपल्याशी म्हणाली.

पण खटल्याचे काम लवकर आटपण्याची लक्षणे नव्हती. तेव्हा तिने वेळ घालवण्यासाठी आजूबाजूला पाहिले.

जाई यापूर्वी कधी कोर्ट-दरबारात गेलेली नव्हती; पण तिने पुस्तकातून त्याबद्दल वाचले होते. त्यामुळे तिथे जमलेल्या सर्व पात्रांची नावे आपल्याला माहीत आहेत, असे जेव्हा तिच्या लक्षात आले, तेव्हा तिला फार अभिमान वाटला.

'तो तिथे बसलाय् तो न्यायाधीश' ती स्वताला सांगू लागली. 'त्याच्या टोपावरूनच ओळखतं.'

राजा स्वतःच न्यायाधीश होता आणि आपल्या टोपाच्यावर मुगूट चढवून तो बसला होता. त्यामुळे त्याला— खरे म्हणाल तर— फारच अवघडल्यासारखे झाले होते; आणि दिसायलाही तो मोठासा छान दिसत होता असे नाही !

'आणि ते बारा प्राणी पंच असावेत !' जाई आपल्याशी म्हणाली. (खरोखरच ते 'प्राणी' होते; काही जण पशू तर काही जण पक्षी.) 'पंच' शब्द तिने दोनतीन वेळा स्वताशीच उच्चारला. आपल्याला

जाईची

कायद्याची भाषा येते याची तिला मोठी ऐट वाटली. पण तिला वाटले, 'पंच म्हणजे तर पाच आणि हे लोक आहेत बारा. बारा लोक पंच कसे?— जाऊ द्या झालं!'

बारा पंचांच्या हातांत बारा पाट्या होत्या आणि प्रत्येक जण आपल्या पाटीवर काही तरी लिहीत होता.

"काय लिहिताहेत हे?" जाईने गरुडसिंगाच्या कानात विचारले. "अजून खटल्याला सुरवातही झालेली नाही अन् हे टिपणं कसली करताहेत?"

गरुडसिंग तिच्या कानात चोच घालून म्हणतो, "ते आपली नावं लिहिताहेत पाटीवर. त्यांना अशी भीती वाटते, की समजा, खटला संपेपर्यंत आपण आपलं नावगाव विसरलो तर!"

हे ऐकून जाई मोठ्याने ओरडली, "मूर्ख . शिरो...मणी!"

पण ती 'मणी' म्हणत असतानाच पांढरा ससा एकाएकी गरजला, 'खामोश!" (म्हणजे 'गप्प बसा.') राजेसाहेबांनीही आपला चष्मा चढवला आणि दरबारात बोलायचा गुन्हा कोणी केला म्हणून ते सगळ्यांकडे पाहू लागले.

जाईला नक्की वाटले, की हे पंच लोक आपल्या पाट्यांवर आता 'मूर्खशिरोमणी' हा शब्द लिहीत असावेत. इतकेच काय, त्यांच्यातल्या एकाला 'शिरोमणी'तली 'शी' ऱ्हस्व की दीर्घ लिहायची ते माहीत नव्हते; म्हणून तो शेजारच्याला विचारीत होता. तेही जाईच्या लक्षात आले.


'छान!' ती स्वताशी म्हणाली. 'हा खटला संपेपर्यंत यांच्या पाटीवर किती कोंबड्या नाचलेल्या असतील, कुणाला ठाऊक!'

पंचांपैकी एकाची पेन्सिल चरचर वाजत होती. त्याने जाईचे कान किटले. ती मुकाट्याने उठून त्या पंचाच्या मागे गेली आणि तिने हळूच त्याच्या हातातली पेन्सिल काढून घेतली. त्या बिचाऱ्या बावळट प्राण्याला (सद्या सरडोक होता तो!) कळेना आपली पेन्सिल कुठे गेली ते. त्याने बरीच शोधाशोध केली आणि शेवटी बोटानेच पाटीवर गिरवीत बसला. अर्थात त्यामुळे पाटीवर एकही टिप्पण लिहिले गेले नाही.

राजेसाहेब म्हणाले, "ललकाऱ्या! आरोपीला त्याच्यावरचा आरोप

वाचून दाखव."

लगेच पांढऱ्या सशानं तीन वेळा बिगुल फुंकले आणि मग हातातलं



कागदाचे लांबलचक भेंडोळे उलगडून तो वाचू लागला—

" बदामराणी करि गुडदाणी,
चिक्की, लाडू ऐन दुपारी
बदाम गुड्डू खाउनि लड्डू,
घेउनि पळतो चिक्की सारी !"

"ऐकलात आरोप?" राजेसाहेब पंचांकडे वळून म्हणाले. "बोला, आता तुमचं मत काय आहे?"

पांढरा ससा घाईघाईने म्हणतो, "एवढ्याने झालं नाही, सरकार. आणखी बरंच वाचायचं आहे."

पण राजेसाहेब तसेच पुढे म्हणाले, "पहिला साक्षीदार बोलवा."

पांढऱ्या सशाने पुन्हा तीन वेळा बिगुल वाजवून पुकारा केला, "पहिला साक्षीदार!"



पहिला साक्षीदार होता टोपीवाला वेडा. तो एका हातात चहाचा कप नि दुसऱ्या हातात पावाची फाक घेऊन पुढे आला आणि म्हणाला, "महाराज! हे आणल्याबद्दल माफ करा. आपलं बोलावणं आलं, तेव्हा

आमचा चहा संपलेला नव्हता."

"मग पिऊन यायचं होतंत." राजेसाहेब म्हणाले, "सुरवात केव्हा केलीस?"

टोपीवाल्या वेड्याने मागे पाहिले. त्याचे दोस्त शिमग्यातला ससा नि रानउंदीरही मागोमाग कोर्टात आले होते. टोपीवाला म्हणतो, "मला वाटतं, फाल्गुन शुद्ध दशमी होती, तेव्हा आम्ही चहापानाला सुरवात केली."

"एकादशी होती." शिमग्यातला ससा मध्येच म्हणाला.

"द्वादशी होती." रानउंदरानेही मध्ये तोंड घातले.

राजेसाहेब पंचांना म्हणाले, "लिहून घ्या!" तेव्हा पंचांनी भराभर आपापल्या पाटीवर त्या तिन्ही तिथ्या लिहून घेतल्या. मग तिन्ही आकड्यांची बेरीज करून त्याचे रुपये-आणे-पै किती होतात हे त्यांनी पाहिले.

राजेसाहेब मध्येच म्हणाले, "तुझी ती टोपी पाहू जरा."

टोपीवाला म्हणाला, "ती माझी नाही, सरकार."

"तुझी नाही?" राजेसाहेब म्हणाले, "म्हणजे चोरलेली असणार!– लिहून घ्या."

लगेच पंचांनी पाटीवर लिहून घेतले.

टोपीवाला पुढे म्हणाला, "माझी स्वताची टोपीच नाही. मी टोपीवाला आहे. टोप्या तयार करून मी विकीत असतो."

इतक्यात राणीसाहेबांनी आरशी चढवली आणि टोपीवाल्या वेड्याकडे त्या टक लावून पाहू लागल्या. टोपीवाला बिचारा पांढराफटक पडला आणि चुळबूळ चुळबूळ करू लागला.

"साक्ष दे पाहू!" राजेसाहेब ओरडले. "आणि हे बघ—गोंधळून जाऊ नकोस. नाही तर तुला फासावर चढवीन."

यामुळे साक्षीदार बिचारा आणखीच बावरला आणि एकदा या पायावर तर एकदा त्या पायावर उभा राहू लागला. मध्येच तो घाबऱ्या घाबऱ्या राणीसाहेबांकडे पाहायचा. आणि एकदा तर पाव खायचे सोडून त्याने कपाचा मोठा टवकाच चावून गिळला.

इकडे जाईला एकाएकी विचित्र वाटायला लागले. आपल्याला असे काय होते हे तिला पहिल्याने समजेना. मग तिच्या लक्षात आले, की आपण पुन्हा

मोठ्या मोठ्या होत आहो. एकदा तिला वाटले, आता इथे राहण्यापेक्षा आपण कोर्टातून निघून जावे हे बरे. पण मग तिने ठरवले, की जोपर्यंत आपण इथे मावतो आहो तोपर्यंत अशाच बसू या ना ठिय्या देऊन !

रानउंदीर तिच्या शेजारी बसला होता. तो एकदम म्हणतो, "ए ! इतकं रेटू नकोस. मला श्वासही घ्यायला मिळत नाही."

"मी काय करणार ?" जाई म्हणाली, "मी सारखी वाढते आहे."

"काय म्हणून ?" रानउंदीर म्हणाला. "इथे वाढाविढायचं काम नाही."

"शहाणा आहेस फार !" जाई म्हणाली. "सगळीच वाढतात. चोवीस तास वाढतात. तू पण वाढतो आहेस—या क्षणाला !"

"पण मी बेतावेताने वाढतोय्. तुझ्यासारखा ताळ सोडलेला नाही मी !"

आणि असे म्हणून उंदीर तिरसट मुद्रा करून उठला आणि कोर्टात दुसऱ्या टोकाला जाऊन बसला.

इकडे राणी आपली एकसारखी टोपीवाल्याकडे टक लावून पाहात होती. रानउंदीर पलीकडे चालला होता त्या वेळी ती एका हुजऱ्याला म्हणाली, "मागच्या वेळी जलशात ज्यांनी भाग घेतला होता त्यांची नावं आण पाहू."

हे ऐकल्याबरोबर बापड्या टोपीवाल्याचे पाय लटपट कापू लागले आणि त्याच्या दोन्ही पायांतले बूट गळून पडले.

राजेसाहेब संतापून ओरडले, "साक्ष देतोस की टांगू फासावर ?"

टोपीवाला थरथर कापणाऱ्या आवाजात बोलायला लागला, "महाराज—सरकार ! मी एक गरीब प्राणी आहे आणि नुकता कुठे मी चहा प्यायला बसलो होतो.... आठच दिवस झाले असतील.... आणि— आणि.... आमचा पाव इतका रद्दी होता अन् लोणी इतकं पातळ होतं.... आणि चार म्हणाऱ्या आत—"

"आं ? चार ?"

"आमच्या चार वाजण्याची सुरवात चहाने होते, सरकार !" टोपीवाला म्हणाला.

"बरोबर आहे !" राजेसाहेब मान डोलवीत राणीसाहेबांकडे वळून म्हणाले, "चारची सुरवात नाही तरी चानेच होते हे तू आम्हांला शिकवा-

यला नको ! पुढे बोल—"

"सरकार, मी गरीब आहे." टोपीवाला पुढे म्हणाला, "शिमग्यातला ससा एकदा बोलला—"

"मी कधीच बोललो नाही !" शिमग्यातला ससा गडबडीने उठून किंचाळला.

"बोललास !"

"बिलकूल नाही !"

राजेसाहेब म्हणाले, "तो नाही म्हणतो ना? सोडून दे ! पुढे बोल."

टोपीवाला वेडा पुढे म्हणतो, "मग रानउंदीर बोलला—अगदी नक्की रानउंदीर बोलला—" आणि हे बोलताना त्याने भीत भीत पलीकडे नजर फेकली. हो ! नाहीतर रानउंदीरही साफ 'नाही' म्हणायचा !

पण रानउंदीर काहीच बोलला नाही. कारण आपल्या नव्या जागेवर तो गाढ झोपी गेला होता.

"आणि मग" टोपीवाला म्हणाला, "मी आणखी एक पावाची फाक कापली."

"पण रानउंदीर काय बोलला ?" पंचांपैकी एकाने विचारले.

"ते मला नाही आठवत !"

"आठव !" राजेसाहेब खेकसले, "नाही तर फाशी देईन तुला."

बिचाऱ्या टोपीवाल्याच्या हातातून कप आणि पाव गळून पडले आणि तो एक गुडघा टेकून गयावया करीत म्हणाला, 'सरकार, मी गरीब माणूस आहे !"

"याला दुसरं काही बोलताच येत नाही का ?" राजेसाहेब उद्‌गारले. कोर्टात मागच्या बाकावर डुकराची दोन पिल्ले बसली होती. त्यांच्यापैकी एकाने राजेसाहेबांचे आत्ताचे उद्‌गार ऐकून 'वा वा !' म्हणत टाळ्या पिटल्या. लगेच एका शिपायाने धावत जाऊन त्याचा बंदोबस्त केला. (म्हणजे काय केले ? शिपायाजवळ एक मोठी गोणपाटाची पिशवी होती आणि तिच्या तोंडावर सरकवून लावायचा बंद होता. शिपायाने पिल्लू उचलून त्या पिशवीत टाकले, बंद लावून टाकला आणि मग त्याने आणखी गडबड करू नये म्हणून शिपाई स्वतः त्या पिशवीवर बसला.)

"बरं झालं, हे प्रत्यक्ष वघायला मिळालं!" जाई स्वताशी म्हणाली, "आतापर्यंत वर्तमानपत्रात पुष्कळदा मी वाचलेलं आहे, की खटल्याचे काम चालू असताना कोणी तरी गडबड केली पण तावडतोब त्याचा बंदोबस्त करण्यात आला. हा बंदोबस्त कसा असतो ते आत्ता कळलं."

"तुला जर दुसरं काहीच बोलता येत नसेल–" राजेसाहेब म्हणत होते, "तर मग तू खाली उभा राहा!"

टोपीवाला म्हणाला, "मी खालीच उभा आहे, साहेब....जमिनीवर. आणखी खाली कसा उभा राहू?"

"मग खाली बस." राजेसाहेब ओरडले.

या वेळी डुकराच्या दुसऱ्या पिल्लाने 'वा वा!' केले आणि टाळ्या पिटण्यासाठी तो हात हालवतो आहे तोच शिपायाने उचलून त्याला पिशवीत टाकले.

"चला, ही डुकरांची कटकट संपली एकदाची! आता तरी खटला नीट चालेल."

"मी तेवढा चहा पिऊन येऊ का?" टोपीवाल्याने बोलण्याचे धाडस केले. मात्र हे बोलताना राणीसाहेबांकडे डोळ्यांच्या कोपऱ्यांतून त्याने भीत भीत पाहिलेच.

राणीसाहेब अजूनही जलसेवाल्यांची यादी वाचीत होत्या.

राजेसाहेब म्हणाले, "ठीक, ठीक! जा तू आता."

टोपीवाला वेडा धावत पळत कोर्टाबाहेर निघाला. पायात बूट चढवायलाही तो थांबला नाही.

राणीसाहेबांनी तेवढ्यात मान वर केली आणि एका शिपायाला हुकूम दिला, "तो बाहेर पडला की त्याचं डोकं उडव तेवढं!" पण शिपाई बाहेर पोचायच्या आत टोपीवाला दिसेनासा झाला होता.

"पुढचा साक्षीदार बोलवा!" राजेसाहेब ओरडले.

पुढचा साक्षीदार म्हणजे सरदारीणबाईंची सैपाकीण. तिच्या हातात अजूनही मिरपुडीचे बकम होते. तिने कोर्टात प्रवेश केल्याबरोबर लोक शिंकायला लागले; तेव्हाच जाईने कोण येत आहे ते ओळखले.

"साक्ष दे!" राजेसाहेब ओरडले.

"देत नाही!" सैपाकीण ओरडली.

राजेसाहेब गोंधळून गेले आणि पांढऱ्या सशाकडे पाहू लागले. पांढरा ससा त्यांच्या कानात म्हणाला, "उलट-तपासणी घ्या, सरकार, उलट-तपासणी!"

"घ्यायलाच हवी असेल तर घेतो." राजेसाहेब भकास तोंड करून म्हणतात. आणि मग छातीशी हात एकात एक अडकवून, कपाळावर आठ्या चढवून, त्यांनी सैपाकीणबाईकडे टवकारून पाहिले आणि खोल आवाजात प्रश्न केला, "बोल! चिक्की कशाची करतात?"

"मिऱ्यांची." सैपाकीणकाकूंनी उत्तर दिले.

तिच्या मागून कुणीतरी पेंगलेल्या आवाजात म्हटले, "काकवीची."

"पकडा! पकडा त्या हरामखोराला!" राणीसाहेब किंचाळल्या. "उडवा त्याचं डोकं! पिशवीत कोंबा त्याला!— उपटा त्याच्या मिशा!—"

झाले! रानउंदराला कोर्टाबाहेर हाकलून देण्यात बराच वेळ गेला. मग तो विधी एकदाचा उरकल्यावर कोर्टाच्या कामाला पुन्हा सुरवात होणार तो—

सैपाकीणबाईच कुठे दिसेना. या गडबडीत तिने बहुतकरून कोर्टाच्या हातांवर तुरी दिल्या होत्या.

राजेसाहेब एक उसासा सोडून म्हणाले, "हं:! जाऊ द्या झालं. पुढचा साक्षीदार बोलवा." आणि मग राणीसाहेबांना ते एकीकडे म्हणतात, "आता पुढच्या साक्षीदाराची तरी उलट-तपासणी घ्यायलाच हवी. ती तू घे, बरं का? माझं तर कपाळ दुखायला लागलं!"

पांढरा ससा यादी चाळत होता. जाई त्याच्याकडे आतुरतेने पाहायला लागली. "अजून यांना फारसा पुरावा मिळालेलाच नाही" ती आपल्याशी म्हणाली. "तेव्हा आता आणखी कोण साक्षीदार हुडकून काढतात, पाहू या!"

पण त्या साक्षीदाराचे नाव जेव्हा तिला खरोखर ऐकायला मिळाले तेव्हा तिला किती आश्चर्य वाटले असेल याची तुम्हीच कल्पना करा. कारण थोड्याच वेळात पांढऱ्या सशाने कर्कश आवाजात नाव पुकारले, "जाई!"

## ११

"हजर !" जाई एकदम ओरडली. एकंदर गडबडीत, आपण किती उंच वाढलो आहो याचाही तिला विसर पडला. तिला हाक मारल्यावरोबर ती अशी ताडकन् उठून उभी राहिली, की सज्जात वसलेल्या पंचांना तिच्या परकराचा फळकारा लागला आणि तेवढ्या धक्क्याने ते सर्व धडाधड खाली प्रेक्षकांच्या डोक्यावर कोसळले. नंतर बराच वेळ कोर्टाच्या जमिनीवर इकडे तिकडे ते बाराजण अस्ताव्यस्त पडले होते.


तो प्रकार पाहून जाईला पाच सहा दिवसांपूर्वी झालेल्या एका ल्हानशा अपघाताची आठवण झाली. त्या वेळी असाच जाईचा धक्का लागून तिपाई-वरचे काचेचे मत्स्यपात्र उपडे झाले होते आणि त्यातले सोनेरी मासे खाली पडून त्यांची खोलीभर तडफड चालली होती.

"माफ करा—माफ करा हं !" जाई म्हणाली आणि भराभरा खाली पड-लेल्या पंचांना उचलायला लागली. अजूनही तिच्या मनात तो सोनेरी माशांचा अपघातच घोळत होता आणि तिला जणू असेच वाटत होते, की हे खाली पडलेले प्राणी म्हणजे जसे काही मासेच आहेत. त्यांना झटपट उचलून पाण्यात टाकले तरच ते जगतील, नाही तर ते मरतील. अर्थात् पाण्यात टाकायचे म्हणजे वर चौकात त्यांच्या जागेवर फेकायचे.

त्याप्रमाणे तिने सर्व पंचांना त्यांच्या त्यांच्या जागेवर ठेवले तेव्हा कुठे तिचे समाधान झाले ! पण राजेसाहेबांचे मात्र समाधान झाले नाही. ते जाईकडे मुद्दाम रोखून पाहात म्हणाले, "प्रत्येक पंच आपल्या जागेवर बसल्याशिवाय खटल्याचं काम पुढं चालणार नाही....**प्रत्येक** पंच !"

जाईने चौकात नजर फेकली. आणि मग तिच्या लक्षात आले की या सगळ्या लगीनघाईत आपण सद्या सरडोकला त्याच्या खुर्चीत उलटा कोंबला आहे. म्हणजे त्याचे तोंड मुळी दिसतच नाही. शेपटी मात्र नारदाच्या शेंडीसारखी उभी असून कठड्यावरून आता ती खाली वाकते आहे. लगेच तिने पटदिशी शेपटी धरून त्याला उचलले आणि सारखे बसवले. 'म्हणजे यामुळे काही फरक होणार आहे असं नाही !' ती आपल्याशी म्हणाली. 'या बावळट पंचाला डोकं असेल तर तो वापरणार ना ?'

राजेसाहेबांनी प्रश्न विचारायला सुरवात केली,
" बोल. तुला या प्रकाराबद्दल काय माहिती आहे ? "



" काही नाही. "
" अजिबात काही नाही ? "
" अजिबात काही नाही. " जाईने ठासून सांगितले.

"वा ! ही साक्ष फारच उपयोगी ठरणार." राजेसाहेबांनी पंचांकडे वळून म्हटले. पंच लगेच पाटीवर लिहायला लागणार, तो पांढरा ससा मध्येच म्हणाला, "सरकारस्वारींच्या मनातून निरुपयोगी म्हणायचंय्, होय ना ?"

पांढरा ससा हे फार अदबीने बोलला खरा; पण त्याच्या कपाळावर मात्र आठ्यांचे जाळे पसरले होते आणि मधून मधून तो तोंडही वाकडे करीत होता.

"अर्थात् !" राजेसाहेब घाईघाईने म्हणाले. मला **निरुपयोगीच** म्हणायचं होतं." आणि मग त्यांनी स्वतःशीच पुटपुट चालवली, 'उपयोगी–निरुपयोगी....' जणू काय, यांतला कोणता शब्द कानांना जास्त चांगला लागतो हे त्यांना पाहायचे होते.

पंचांपैकी काहींनी 'उपयोगी' लिहून घेतले; तर काहींनी 'निरुपयोगी' लिहून घेतले. जाईला हे सर्व वाचता आले. कारण तिचे डोके आता त्यांच्या पाट्यांच्या अगदी जवळ आले होते.

राजेसाहेब एवढा वेळ एका टिप्पणवहीत काही तरी लिहिण्यात गुंतले होते. ते एकाएकी ओरडले, "खामोश !" आणि मग आपल्या वहीतून त्यांनी वाचून दाखवले, "नियम नंबर बेचाळीस—एक मैलापेक्षा जास्त उंचीच्या इसमांनी कोर्टाबाहेर जावे."

प्रत्येक जण जाईकडे डोळे वटारून पाहू लागला.

"मी काही मैलभर उंच नाही !" जाई रागावून म्हणाली.

"आहेस !" राजेसाहेब म्हणाले.

"एक का ? दोन मैल उंच आहेस तू !" राणीसाहेब म्हणाल्या.

जाई म्हणाली, "काय वाटेल ते असो, मी इथून हालायची नाही. आणि असा नियम पण नाही. तुम्ही आत्ता तो तयार केलात !"

राजेसाहेब म्हणाले, "मुळीच नाही. आमच्या पुस्तकातला सर्वांत जुना नियम आहे तो."

सर्वांत जुना असेल तर त्याचा नंबर एक पाहिजे. बेचाळीस काय म्हणून ?" जाईने जोरात विचारले.

हे ऐकून राजेसाहेब पांढरे फटक पडले आणि त्यांनी घाईघाईने आपली वही मिटली. मग थरथर कापणाऱ्या आवाजात ते पंचांना म्हणाले, "बोला.

तुमचं मत सांगा. ”

पांढरा ससा लगबगीने पुढे आला आणि एक कागद फडफडावीत म्हणाला, “ थांबा, थांबा ! आणखी एक पुरावा सापडला आहे. हा कागद बघा. ”

“ काय आहे त्यात ? ” राणीसाहेबांनी विचारले.

“ माहीत नाही ” ससा म्हणाला. “ मी अजून तो उघडलेला नाही. पण पत्र असावंसं वाटतं. आरोपीने कुणाला तरी ते लिहिलेलं असावं. ”

“ मलाही हे बरोबर वाटतं. ” राजेसाहेब म्हणाले. “ ते जर कुणालाच लिहिलेलं नसेल, तर ते पत्र कसचं ? होय की नाही ? ”

एक पंच म्हणाला, “ त्याच्यावर पत्ता असेल की !

“ पत्ता नाही ना ! ” पांढरा ससा म्हणतो. “ या कागदाच्या बाहेरच्या बाजूला **अजिबात** काही लिहिलेलं नाही ! काय डांबिसगिरी आहे ! ” आणि असे बोलत बोलत त्याने पत्र उलगडून पाहिले.

“ ओहो ! ” तो ओरडला. “ हे पत्र नाहीच मुळी, या कविता दिसताहेत ! ”

एक पंच—“ आरोपीच्या हस्ताक्षरात आहेत का त्या ? ”

“ नाहीत. ” पांढरा ससा एक एक डोळा एवढाला करून म्हणतो. “ तोच तर चमत्कार आहे मोठा ! ”

सगळ्याच पंचांना हा मोठा चमत्कार वाटला.

राजेसाहेब मध्येच बोलले, “ बहुतकरून आरोपीने दुसऱ्या कुणाच्या तरी अक्षराची नक्कल केली असेल. तसा तो वस्ताद आहे ! ”

गुड्डू आपले बेड्या घातलेले हात जोडून म्हणाला, “ महाराज सरकार राजाधिराज ! मी ते पत्र मुळीच लिहिलेलं नाही. तसा कुणाजवळ पुरावाही नाही. पत्राच्या शेवटी माझी सही पण नाही. ”

राजेसाहेब म्हणाले, “ सही नाही हे आणखीच वाईट. याचा अर्थ तुझ्या मनात काळंबेरं होतं. तुझा हेतू सरळ असता तर तू सही केली असतीस ! ”

राजेसाहेबांचे हे पांडित्य ऐकल्याबरोबर सगळ्या दरबारी लोकांनी टाळ्या पिटल्या. एवढी अक्कलहुशारी राजेसाहेबांनी त्या दिवशी प्रथमच दाखवली होती.

“ गुन्हा शाबीत झाला. ” राणीसाहेब म्हणाल्या. “ तेव्हा आता

आरोपीचं—"

पण जाई मध्येच म्हणाली, "काही शाबीत झालेलं नाही. त्या कविता कशासंबंधी आहेत हेसुद्धा तुम्हांला अजून माहीत नाही."

"वाचून दाखवा पाहू." राजेसाहेबांनी हुकूम दिला.

सबंध कोर्टात सामसूम पसरली. पांढऱ्या सशाने कागद उघडून डोळ्यांपुढे धरला आणि पुढील कविता वाचून दाखवल्या—

सांगितले त्यांनी मजला
जे तुम्ही म्हटले तिजला
ती मला 'चांगला' म्हणते
परि 'पोहत नाही' लिहिते!
'मी गेलो नाही' निरोप हा
खरा किती ते तुम्ही पहा!
तिने घातले लक्ष जरी
उडेल तुमची भंबेरी!

[ चाल बदलून ]

मी एक दिली तिज, देते ती त्या दोन
जरि तुम्ही देता तीन
त्या साऱ्याही त्याच्याकडुनी तुमच्या
घरि आल्या परि नच माझ्या
जरि कटात या सापडलो आम्ही ना?
तो सांगिल, 'सोडा यांना!'

"वा छान!" राजेसाहेब हात चोळत म्हणाले. "आतापर्यंतच्या पुराव्यांत हा पुरावा सर्वांत उपयोगी म्हटला पाहिजे. चला, पंच लोक! आता द्या तुमचा निर्णय!"

'काय गाढव लोक आहेत!' जाई आपल्याशीच म्हणाली. 'यांतल्या एका तरी कवितेचा अर्थ यांच्यापैकी एकाला जरी सांगता आला तरी मी त्याला चार आणे देईन! (कारण तेवढेच तिच्याजवळ शिल्लक होते.) मला तर बाई त्यातलं अक्षर कळलं नाही! आणि त्यात कळण्यासारखं काही नाहीच मुळी!'

सर्व पंचांनी आपल्या पाट्यांवर लिहून ठेवले : 'साक्षीदार म्हणतो, आपल्याला यातलं अक्षर कळत नाही.' पण त्यांतल्या एकाही पंचाने कवितांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला नाही.

"त्यात जर अर्थ नाही–" राजेसाहेब गंभीरपणे म्हणाले, "तर एका दृष्टीने बरंच झालं. अर्थ लावायची कटकट चुकली! आणि तरीसुद्धा— मला हे समजत नाही की—" असे बोलत बोलत राजेसाहेबांनी तो कवितांचा कागद आपल्या गुडघ्यांवर उलगडून ठेवला आणि डोळ्यांच्या कोपऱ्यांतून त्याच्याकडे पाहात त्यांनी वाचले, "परि 'पोहत नाही' लिहिते— तुला पोहता येत नाही, हे खरं ना?"

गड्डूने अतिशय दुःखाने आपली मान हालवली.

"मी पोहण्यालायक प्राणी आहे असं वाटतं का तुम्हांला?"

(खरोखरच तो पोहण्यालायक नव्हता. कागदाचा पत्ता का कधी पाण्यात उतरायचे धाडस करील?)

"येथपर्यंत ठीक जमलं!" राजेसाहेब म्हणाले आणि पुढच्या काही ओळी पुटपुटू लागले, "खरा किती ते तुम्ही पहा— तुम्ही म्हणजे पंचांना उद्देशून असणार हे. पुढे– तिने घातले लक्ष जरी– ही ती म्हणजे अर्थात् आमच्या राणीसरकार!–उडेल तुमची भंबेरी! वा! वा! हे पटलं आपल्याला! पुढे काय?– मी एक दिली तिज, देते ती त्या दोन...हे अर्थात् चिक्कीबद्दल असणार! अशा रीतीने या पठ्ठ्याने वड्यांची वासलात लावलेली दिसते!"

जाई म्हणाली, "पण पुढे तर वाचा.– त्या साऱ्याही त्याच्याकडुनी तुमच्या घरि आल्या, परि नच माझ्या!"

"त्या पाहा ना!" राजेसाहेब विजयी सुरात म्हणाले. "सगळ्या वड्या इथे ताटात आहेत." असे म्हणून त्यांनी मेजाकडे बोट दाखवले.

पण राणीसाहेबांबद्दल कवितेत जे लिहिले होते त्यामुळे त्या भयंकर संतापल्या. त्यांनी जवळची एक दौत उचलली आणि सद्या सरडोकच्या डोक्यावर फेकली. (बिचाऱ्या सद्याने पाटीवर नुसते बोट फिरवण्याचा उद्योग आता सोडून दिला होता; कारण तसे करून पाटीवर काहीच उमटत नव्हते पण त्याच्या डोक्यावरून आता जेव्हा शाईचे ओघळ वाहू लागले तेव्हा घाईघाईने त्यात बोट बुडवून त्याने लिहायला सुरवात केली.)

राजेसाहेब मोठ्याने ओरडले, " पंच हो, तुमचं मत सांगा ! "

आतापर्यंत वीस वेळा तरी त्यांनी हे वाक्य उच्चारले असेल, पण आतापर्यंत एकाही पंचाचे मत तोंडाबाहेर पडले नव्हते.



राणीसाहेब मध्येच म्हणाल्या, " छे छे ! हे उपयोगाचं नाही. अगोदर शिक्षा द्या. मग पंचाचं मत घ्या ! "

"काय गाढवपणा आहे!" जाई मोठ्याने उद्गारली. "म्हणे आधी शिक्षा द्या—"

"चूप बैस!" राणी किंचाळली.

"बसणार नाही!" जाई पण ओरडली.

"असं आहे काय?" राणी अगदी घसा खरवडून बोंबलत सुटली. "कोण आहे रे तिकडे? उडवा हिचं डोकं! उडवा! उडवा!"

पण कोणीसुद्धा जागचे हालेना.

"विचारतंय् कोण तुम्हांला?" जाई तुच्छतेने म्हणाली. (आतापर्यंत ती पूर्णपणे मोठी थोरली झाली होती.) "फडतुस कुठचे! पत्त्याची पानं तर आहात तुम्ही!"

हे ऐकल्याबरोबर पत्त्यांतली पाने सगळी उभी राहिली आणि हवेतून उडत उडत तिच्या अंगावर येऊन पडली. थोडे रागावून थोडे घाबरून तिने किंकाळी फोडली आणि हाताने पानांना दूर सारण्याचा प्रयत्न केला....

१२

पण हात लावून पाहते तर ती पाने पत्त्यांतली नव्हतीच मुळी. झाडांची वाळकी पाने होती ती, आणि वाऱ्या-बरोबर उडत उडत तिच्या तोंडावर येऊन पडत होती. आणि ते जवळ बसलेले कोण होते?

अरेच्या! ही तर आपली ताई!

तिच्या तोंडावरची पाने दूर सारीत ताई म्हणाली, "ऊठ की ग जाई! किती वेळ झोपायचं इथे उघड्या हवेत!"

जाईने पाहिले तर आपण खरेच नदीकाठावर आहो!

"म्हणजे?" जाई डोळे चोळीत म्हणाली. "सगळं स्वप्नच का होतं ते? काय तरी बाई, भारीच विचित्र स्वप्न!"

आणि मग तिने ते विचित्र स्वप्न सुरुवातीपासून शेवटपर्यंत आपल्या ताईला सांगितले. जाईची ती नवलकहाणी ऐकून तिला काय वाटले, कुणास ठाऊक! तिने एकदम आपल्या छोट्या बहिणीला जवळ ओढून कुरवाळले आणि म्हटले, "विचित्र आहे खरं सगळं. पण जाई, गडे! तुझा चहा निवतोय् ना घरी? जा लवकर अन् पिऊन ये बरं."

जाई उठली आणि धावत पळत चहा प्यायला गेली. त्या वेळी तिला कुणाची आठवण झाली असेल बरं?

अर्थात् टोपीवाला वेडा नि शिमग्यातला ससा या चहाबाज जोडीची!

इकडे जाई गेली तरी ताई नदीवरच बसली होती. जाईने रंगवून सांगितलेली नवलकहाणी सारखी तिच्या डोक्यात घोळत होती. तिने आपले डोळे मिटले मात्र, तिलाही वाटले की आपणदेखील अशाच अद्भुत नवल-सृष्टीत निघालो आहो....ते पाहा त्या गवतात नाही तरी सळसळ वाजते आहे. पांढरा ससा आला! त्या तळ्यातून कुणी उडी मारली? ओहो! हाच की तो भित्रा उंदीर! आणि ही कपबश्यांची किणकिण कुठून ऐकू येते आहे? दुसऱ्या कुठून? दोन वेडे पीर चहापान करताहेत! इतक्यात! धडाधड धडाधड बशा फेकल्याचा आवाज आला....सूं सूं... ऑक्छि! कुणी तरी शिंकतंय् वाटतं? दुसरं कोण शिंकणार? सैपाकीणबाई आणि ते कारटं! आणि ते चरचर काय वाजतंय्?....हात्तिच्या, ही तर सद्या सरडोकची पेन्सिल! आणि तो पाहा गरुडसिंग कर्कश ओरडतोय्, अन् तो पाहा खोटा

कासव मुळूमुळू रडतोय् ! ढोंगी लेकाचा !

इतक्यात जिकडे तिकडे एकच धावपळ चाललेली दिसली आणि एकच आरडाओरडा चाललेला ऐकू आला. हा काय प्रकार आहे म्हणून ताई पाहते तो....

तिच्या कानात कर्कश हुकूम थडाथड आदळले, “उडवा त्याचं डोकं ! उडवा तिचं डोकं !– उडवा– उडवा– उडवा– उडवा...!”

जाईच्या ताईने कानांत बोटे घातली. ती आपल्याशीच म्हणाली, “छे ग बाई ! सगळं खरं थोडंच आहे ! जरा वेळाने मी डोळे उघडीन तेव्हा सारं बदललेलं दिसेल. मऊ मऊ हिरवं गवत सळसळत असेल; पण ते सशाच्या धावण्यामुळे नाही— वारा वाहतो आहे म्हणून. अन् तळ्याच्या पाण्यावर तरंग उठलेले दिसतील; पण ते उंदराच्या पोहण्यामुळे नाहीत– वाऱ्यामुळेच ! आणि ती कपबश्यांची किणकिण ? अग, ती गुरं चरताहेत ना कुरणात, त्यांच्या गळ्यांतली घुंगरं वाजताहेत हो ती ! म्हणे वेड्याचं चहापान ! बदामची राणी वसावसा ओरडतेय् म्हणतेस ? किती ग भोळी तू ? अग, हा आपला महादू गुराखी ढवळ्या– पवळ्यांना हाका मारतोय्. त्या डुक्करबाळाच्या शिंका अन् गरुडसिंगाच्या किंकाळ्या— सगळं सगळं खोटं बरं ! पक्ष्यांची किलबिल अन् बेडकांचं डरांव डरांव आहे ते ! आणि ते लांबून ऐकू येतंय ना, ते काही खोट्या कासवाचं मुळूमुळू रडणं नाही. ती गुरं हंबरताहेत गुरं !”

आणि मग तिला वाटले, ‘ही आपली छोटी बहीण जाई—काही वर्षांनी ती पण मोठी होईल. चार मुलांची आई होईल की ही ठमाई ! पण तरी तिचा हा बाळपणचा भोळसटपणा अन् गोड स्वभाव काही जायचा नाही. आपल्याभोवती खूप मुलं जमवील ती, अन् कित्ती तरी गोष्टी त्यांना सांगेल. त्या गोष्टी ऐकताना मुलं कशी रंगून जातील ! कदाचित् ही नवलकहाणी पण जाई त्यांना सांगेल......

‘नाही तरी आपली जाई किती गुणी मुलगी आहे ! त्या लहानग्या बाळांना काय हवं, काय नको, ते तिला छान कळेल. त्यांना काय दुखतं, काय रुपतं, त्यांना कशात गंमत वाटते, हे ती छान ओळखील. कारण, आपण एका काळी अशाच लहान होतो आणि किती तरी गमतीदार

चमत्कारिक गोष्टी आपण पाहिल्या होत्या हे ती कधी–कधी विसरणार नाही.

‘खरंच! जाईसारखी भाबडी भावंडं ज्यांना आहेत ती मुलं किती भाग्यवान्!’

रा. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. १०३४ दिनांक ....
विषय किशोर .५.३२.

BVBK-0401034